सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २८ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८१ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



'सायमन गो बॅक'चा नारा देऊन ब्रिटिश सरकारची झोप उडविणारे पंजाबकेसरी लाला लजपतराय यांचा आज जन्मदिन

# उत्तराखंडात समान नागरी कायदा लागू

## • देशातील पहिलेच राज्य • विवाहांची नोंदणी करणे अनिवार्य




उत्तराखंड येथे समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीची घोषणा डेहराडून येथे सोमवारी झालेल्या कार्यक्रमात करताना मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी

◆ **डेहराडून, २७ जानेवारी**

उत्तराखंडात सोमवारपासून समान नागरी कायदा लागू करण्यात आला. समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे. हा कायदा लागू होताच विवाह, संबंध, संपत्ती, एकापेक्षा जास्त विवाहांसारखी स्थिती आता राहणार नाही. या कायद्याच्या अंतर्गत विवाहाची नोंदणी अनिवार्य आहे. या राज्यात आता सर्वच धर्मांसाठी घटस्फोटाचा कायदा समान राहील सोबतच बहुविवाह आणि हलालासारख्या कुप्रभा बंद होतील.

उत्तराखंडात समान नागरी कायदा लागू होताच सर्वच विवाहांची नोंदणी अनिवार्य झाली आहे. विवाहाच्या नोंदणीसाठी सरकारने विशेष व्यवस्था तयार केली आहे. २७ मार्च २०१० पासूनच्या सर्वच विवाहांची नोंदणी करावी लागणार आहे. विवाह झाल्यानंतर सहा महिन्यांत त्याची नोंदणी करावी लागेल.

समान नागरी कायद्यानुसार 'लिव्ह इन रिलेशन'मध्ये राहण्यासाठी आई-वडिलांची परवानगी घ्यावी लागेल. लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या दाम्पत्यांना रजिस्ट्रारसमोर आपल्या संबंधांची घोषणा करावी लागेल. लिव्ह इन संबंध संपुष्टात आणायचे असल्यास, त्यांना त्याची माहितीही रजिस्ट्रारला द्यावी लागेल. लिव्ह इन संबंधातून जन्माला येणारे मूल औरस ठरेल. हे संबंध तुटल्यावर महिला पोटगी मागू शकणार आहे. माहिती न देता एक महिन्यापेक्षा जास्त लिव्ह इनमध्ये राहिल्यास १० हजारांचा दंड ठोठावला जाऊ शकतो.

**मुला-मुलीचा संपत्तीवर समान अधिकार**

संपत्तीच्या अधिकारात मुला-मुलीत भेद केला जाणार नाही. मुला-मुलींचा पित्याच्या संपत्तीवर समान अधिकार राहील. या कायद्याच्या अंतर्गत सर्वच धर्म आणि समुदायांतील मुलांना संपत्तीचा समान अधिकार देण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### माता-पित्यालाही संपत्तीत अधिकार

»» एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीबाबत कुटुंबात मतभेद होऊ नये म्हणून मृतकाच्या संपत्तीवर त्याची पत्नी, मुले आणि माता-पित्यांना समान अधिकार नवीन कायद्यात देण्यात आला आहे. ■

### १८ वर्षांखाली विवाह नाही, मुस्लिमही कक्षात

»» सर्वच धर्माचे लोक त्यांच्या रीतीप्रमाणे विवाह करू शकतील. मात्र, सर्वच धर्मांतील विवाहासाठी मुलांचे किमान वय २१ आणि मुलींसाठी १८ वर्षे करण्यात आले. मुस्लिम मुलींचे निकाह त्या १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या असल्यास होऊ शकणार नाही. ■

### इतर महत्त्वाचे मुद्दे

- संपूर्ण मालमत्तेच्या मृत्युपत्रातून सवलत
- लग्नासोबतच घटस्फोटाचीही नोंदणी
- दुसऱ्या धर्माचे मूल दत्तक घेता येणार नाही
- समान नागरी कायद्याच्या कक्षेतून अनुसूचित जाती-जमातींना वगळले
- विवाह, लिव्ह इनच्या नोंदणीसाठी सरकारचे संकेतस्थळ ■

# आडेगाव येथे शाळकरी मुलाने गोळी झाडून केली आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २७ जोनवारी-**

आढेगाव (ता. माढा) येथे एक धक्कादायक घटना घटना घडली असून, अवघ्या १४ वर्षांच्या शाळकरी मुलाने रिव्हॉल्वरमधून डोक्यात गोळी झाडून घेत आत्महत्या केली आहे. आत्महत्येच कारण समजू शकले नाही. ही घटना सोमवारी दुपारी २साडेबाराच्या सुमारास घडली आहे. श्रीधर गणेश नष्टे असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे.



आढेगांव येथील गणेश सदाशिव नष्टे हे सशस्त्र सीमा बल राजस्थान सेंटर येथे नोकरीस आहेत. आढेगांव येथे त्यांचे वडील सदाशिव नष्टे, पत्नी सारिका, श्रीधर व श्रेयश ही दोन मुले राहतात. गणेश नष्टे यांच्याकडे परवाना असलेले रिव्हॉल्व्हर असून ते जेव्हा गावाकडे येतात, तेव्हा रिव्हॉल्व्हर त्यांच्याकडे असते. आज दुपारी साडेबारा वाजण्यापूर्वी घरातील दुसऱ्या मजल्यावरील खोलीमध्ये त्यांचा मुलगा श्रीधर गणेश नष्टे याने वडीलांच्या रिव्हॉल्व्हरमधून डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली. श्रीधर नष्टे याने आत्महत्या कोणत्या कारणास्तव केली हे समजू शकले नाही. या या घटनेची टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये नोंद करण्यात आली आहे. सदर घटनेचा तपास पोसई सुरवसे करीत आहेत. अशा प्रकारची माहिती तानाजी हिराजी जवळके यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्याला दिली आहे.

# पाच वर्षांत येणार २५ हजार बसेस

**मुंबई, २७ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ अर्थात् एसटी पुढील पाच वर्षांत एकूण २५ हजार बसेस खरेदी करणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिली.

या बसेस राज्य सरकारच्या मालकीच्या असतील. राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या आढावा बैठकीत पुढील पाच वर्षांसाठी खरेदी करण्याच्या महामंडळाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात दिली, असे सरनाईक यांनी सांगितले. अर्थ मंत्रालयाच्या मंजुरीमुळे २०२९ पर्यंत महामंडळाकडे ३० हजार बसेसचा ताफा असेल. यामध्ये पाच हजार बसेस इलेक्ट्रिक असतील. एसटी महामंडळाकडे सध्या १४,३०० बसेसचा ताफा आहे आणि त्यापैकी १० हजार बसेस १० वर्षांपेक्षा जास्त जुन्या आहेत. या पुढील तीन ते चार वर्षांत सेवेतून काढण्यात येतील. त्यामुळे स्वयंपूर्णतेसाठी नवीन बसेसची गरज निर्माण होईल.

## महत्त्वाचे

### १५ महिन्यांनंतर गाझामध्ये परतत आहेत पॅलेस्टिनी

**तेल अवीव :** इस्रायलने १५ महिन्यांनंतर हजारो पॅलेस्टिनींना गाझाच्या उत्तर भागात परतण्याची परवानगी दिली आहे. तेव्हापासून हजारो लोक आपापल्या घरी परतायला लागले आहेत. युद्धविराम करारानुसार, इस्रायल २५ जानेवारीपासून पॅलेस्टिनींना उत्तर गाझामध्ये परत येण्याची परवानगी देईल, असा निर्णय घेण्यात आला. मात्र, इस्रायल आणि हमास वादामुळे याला दोन दिवस उशीर झाला. किंबहुना, हमासने शेवटच्या क्षणी ओलिस सोडले नाही, असा आरोप इस्रायलने केला. हजारो पॅलेस्टिनी अनेक दिवसांपासून सीमा ओलांडण्यासाठी थांबले होते. इस्रायलची संमती मिळताच हजारो लोक नेत्झारिक कॉरिडॉरमधून गाझाच्या उत्तरेकडील भागाकडे जाऊ लागले.

### अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांवर लैंगिक छळाचा आरोप

**वॉशिंग्टन :** २०१७ मध्ये अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी लैंगिक छळाचा आरोप करणाऱ्या महिलेला ५० हजार डॉलर (४३ लाख रुपयांहून अधिक) दिले होते. हेगसेथ यांनी मॅसॅच्युसेट्समधील डेमोक्रॅटिक सिनेटर एलिझाबेथ वॉरेन यांच्या प्रश्नाला लेखी उत्तरात ही माहिती दिली. नियुक्तीपूर्वी सिनेटमध्ये सुरू असलेल्या तपासादरम्यान हेगसेथ यांनी हे उत्तर दिले. अमेरिकेत संरक्षण मंत्रिपद स्वीकारण्यापूर्वी हेगसेथ यांना सिनेटची मंजुरी घेणे आवश्यक आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या सुनावणीदरम्यान हेगसेथ यांनी सिनेटला सांगितले की, त्यांच्यावर खोटा आरोप करण्यात आला. ते पूर्णपणे निर्दोष आहेत. हेगसेथ यांचे वकील पार्लाटोर यांनी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये महिलेला पैसे दिल्याची पुष्टी केली.

### दिल्ली आयएएस कोचिंग चार बेसमेंट मालकांना जामीन

नवी दिल्ली : २७ जुलैच्या रात्री दिल्लीतील जुन्या राजेंद्र नगर येथील राऊ आयएएस कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी साचल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने तळघराच्या चारही मालकांना जामीन मंजूर केला आहे. न्या. संजीव नरुला म्हणाले की, आम्ही आरोपींशी सहमत आहोत की ते फक्त त्या मालमत्तेचे मालक आहेत. तळघरात पाणी भरल्याने विद्यार्थी बुडाले यात त्यांची कोणतीही भूमिका नव्हती. परविंदरसिंग, तजिंदरसिंग, हरविंदरसिंग आणि सरबजीतसिंग या चार सहमालकांविरुद्ध भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल होईल. असा कोणताही पुरावा स्टेटस रिपोर्टमध्ये किंवा अन्य कोठेही देण्यात आलेला नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

# वक्फ दुरुस्ती विधेयकाला 'जेपीसी'ची मंजुरी



### १४ बदल प्रस्तावित

### विरोधकांच्या सर्व सूचना फेटाळल्या

◆ **नवी दिल्ली, २७ जानेवारी**

वक्फ दुरुस्ती विधेयकाला संयुक्त संसदीय समितीने (जेपीसी) मंजुरी दिली आहे. यात एकूण १४ बदल करण्यात आले आहेत. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा अहवाल सभागृहात सादर केला जाईल. सत्ताधारी भाजपाचे जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर एकूण ४४ बदल प्रस्तावित करण्यात आले होते. यांतील बरेच बदल विरोधी पक्षांच्या खासदारांनीही सुचवले होते. मात्र, विरोधकांनी सुचवलेले बदल मतदानाद्वारे फेटाळण्यात आले आहेत.

वक्फ दुरुस्ती विधेयकाची तपासणी करीत असलेल्या संयुक्त संसदीय समितीने सोमवारी भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआ सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या सर्व दुरुस्त्या स्वीकारल्या आहेत. विरोधी सदस्यांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या फेटाळून लावल्या आहेत. बैठकीनंतर समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल, असे जगदंबिका पाल यांनी म्हटले आहे.

समितीसमोर बदलांसाठी एकूण ४४ प्रस्ताव सादर करण्यात आले होते, परंतु केवळ १४ प्रस्तावांनाच मंजुरी देण्यात आली. पाल म्हणाले, विरोधी सदस्यांनी विधेयकाच्या ४४ कलमांमध्ये शेकडो सुधारणा प्रस्तावित केल्या होत्या, परंतु त्या मतदानाद्वारे फेटाळण्यात आल्या. ◂(वृत्तसंस्था)

### विरोधकांचे आरोप

»» विरोधी पक्षाच्या खासदारांनी बैठकीच्या कामकाजावर टीका करत, पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रिया कमकुवत केल्याचा आरोप केला आहे. पत्रकारांसोबत बोलताना तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बनर्जी म्हणाले, ही बैठक म्हणजे केवळ दिखावा होता. आमचे काहीही ऐकले गेले नाही. पाल यांनी हुकूमशाही पद्धतीने काम केले. दरम्यान, पाल यांनी हे आरोप फेटाळून लावत संपूर्ण प्रक्रिया लोकशाही पद्धतीनेच पार पडली आणि बहुमताने निर्णय घेण्यात आला, असे म्हटले आहे. ■

### भाजपाच्या सर्व दहा प्रस्तावांना मंजुरी

»» बैठकीत भाजपा खासदारांनी दहा दुरुस्त्या सुचवल्या होत्या आणि सर्व दुरुस्त्या मंजूर करण्यात आल्या. याच वेळी, विरोधकांकडून अनेक दुरुस्त्यादेखील मांडण्यात आल्या, परंतु मतदानानंतर त्या सर्व फेटाळण्यात आल्या. विरोधकांनी मांडलेल्या सर्व दुरुस्त्या १०-१६ मतांनी फेटाळण्यात आल्या, तर भाजपाच्या सर्व दुरुस्त्या १६-१० मतांनी स्वीकारण्यात आल्या आहेत. ■

# सोलापुरात 'जीबीएस'चा संशयीत एक रुग्ण दगावला

## संशयित दोन रुग्णांवर उपचार सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जी.बी.एस.) हा एक दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे. दरम्यान, सोलापुरात संशयीत एक रुग्ण दगावला आहे. संशयीत एक रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे तर एकाची प्रकृती स्थिर आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जी.बी.एस.) हा एक दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे. ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती चुकून त्यांच्या परिधीय मज्जासंस्थेच्या भागावर हल्ला करते. मज्जातंतूचे जाळे जे मेंदू आणि पाठीच्या कण्यापासून सिग्नल वाहून नेते. जी.बी.एस. हा आजार अचानक सुरु होतो आणि काही तास, दिवस किंवा आठवडयांच्या कालावधीत त्याची तीव्रता वाढू शकते. या आजाराचा प्रभाव असे पर्यंत काही विशिष्ट स्नायूंचा वापर केला जाऊ शकत नाही. बहुतेक लोक अखेरीस जी.बी. एस. च्या सर्वात गंभीर प्रकरणांमधूनही बरे होतात. तथापी पुनप्राप्तीनंतर लोकांमध्ये काही अशक्तपणा सुरु राहू शकतो, असे डॉ. माने यांनी स्पष्ट केले आहे. सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली जी.बी. सिड्रोम सदृश्य आजाराचे रुणांसदर्भात सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात देखील तपासणी करण्याबाबत नागरी आरोग्य केंद्रांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जी.बी.एस. या आजाराचे गांभीर्य लक्षात घेता जी.बी. एस. बाधीत रुग्ण आपल्या रुग्णालयात दाखल झाल्यास योग्य त्या निदानानंतर तात्काळ माहिती आरोग्य विभागास कळवावी. जेणेकरून पुढील कार्यवाही वेळेत करुन या आजारावर नियंत्रण ठेवता येईल, असे आदेश शहर हद्दीतील सर्व रुग्णालयांना सोलापूर महानगरपालिका आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी दिले आहेत.

### नागरिकांनी घाबरून न जाता, सतर्क राहावे : आरोग्य अधिकारी डॉ. माने

हा आजार संसर्गजन्य नसल्यामुळे सोलापूर शहरातील नागरिकांनी घाबरून न जाता, सतर्क राहावे. खाजगी रुग्णालयात या प्रकारचे रुग्ण दाखल असल्यास त्यांनी तात्काळ सोलापूर महानगरपालिका, आरोग्य विभाग व डॉ. व्ही. एम. मेडीकल कॉलेज येथे या रुग्णांची तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.

### ही आहेत या आजाराची लक्षणे

अचानक पायातील किंवा हातात येणारा अशक्तपणा/ लकवा, अचानकपणे उद्भवलेले चालण्यातील त्रास किंवा अशक्तपणा, डायरिया-जास्त दिवसांचा असेल तर नागरीकांनी ही लक्षणे आढळल्यास त्वरीत वैद्यकीय मदत घ्यावी व योग्य त्या तपासण्या करुन घेण्यात याव्यात, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.

### या आहेत महत्त्वाच्या सूचना

या आजारासंदर्भात महत्त्वाच्या सूचना नागरिकांनी पाळाव्यात. यामध्ये वैद्यकीय सल्लयाशिवाय कोणतेही औषधोपचार घेऊ नयेत. जास्त काळाचा ताप, खोकला, जुलाब, उलट्या असेल तर तात्काळ आरोग्य केंद्रात चाचणी करुन घ्यावी. पाणी शक्यतो उकळूनच प्यावे. दुषित पाणी पिण्याचे टाळावे.मांसाहार अन्न चांगले शिजवून घ्यावे.

# मोदी-ट्रम्प यांच्यात द्विपक्षीय चर्चा

**नवी दिल्ली, २७ जानेवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवर चर्चा केली. ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान मोदींशी संवाद साधला. यावेळी दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिका संबंधांवर चर्चा केली.

निवडणूक जिंकल्यानंतरही पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांना फोन केला होता. ट्रम्प यांची अध्यक्षपदी पुन्हा निवड झाल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले होते. या संभाषणात ट्रम्प यांनी मोदींच्या लोकप्रियतेचे कौतुक केले आणि भविष्यात ते एकत्र काम करतील, अशी आशा व्यक्त केली.

सप्टेंबर २०१९ मध्ये मोदी अमेरिकेला गेले होते, तेव्हा टेक्सासमध्ये 'हाऊडी मोदी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये ट्रम्प आणि मोदींनी ५० हजारांहून अधिक भारतीय-अमेरिकनांना संबोधित केले. यावेळी दोन्ही नेत्यांनी एकमेकांचे कौतुक केले. यानंतर ट्रम्प फेब्रुवारी २०२० मध्ये भारत भेटीवर आले होते. गुजरातमधील अहमदाबादमध्ये ट्रम्प यांच्यासाठी 'नमस्ते ट्रम्प' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ट्रम्प यांचा पहिला कार्यकाळ २०१७ ते २०२१ दरम्यान होता. या काळात भारत-अमेरिका संबंध अतिशय महत्त्वाचे होते. या काळात ट्रम्प आणि मोदी यांच्यात अनेक भेटी झाल्या.

### जी. पी. सिंह सीआरपीएफचे नवीन महासंचालक

◆ **गुवाहाटी, २७ जानेवारी**

केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) नवीन महासंचालकांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने आसामचे पोलिस महासंचालक जी. पी. सिंह यांची सीआरपीएफचे महासंचालक म्हणून नियुक्तीस मान्यता दिली आहे.



कार्मिक मंत्रालयाच्या आदेशानुसार, आसामचे पोलिस महासंचालक ज्ञानेंद्र प्रताप सिंह यांची सीआरपीएफच्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते १९९१ च्या तुकडीचे आसाम-मेघालय कॅडरचे भारतीय पोलिस सेवा अधिकारी आहेत. १८ जानेवारी रोजी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने जी. पी. सिंह यांची सीआरपीएफ महासंचालक म्हणून ३० नोव्हेंबर २०२७ रोजी निवृत्तीपर्यंत नियुक्तीस मान्यता दिली आहे. अनिश दयाल सिंह यांच्या निवृत्तीनंतर वितुल कुमार हे सीआरपीएफचा कार्यवाहक पदभार सांभाळत होते. ◂(वृत्तसंस्था)

# लोकशाहीसाठी 'एक देश, एक निवडणूक'वर चर्चा महत्त्वाची

## ▸▸पंतप्रधान मोदी यांचे तरुणांना आवाहन

**नवी दिल्ली, २७ जानेवारी**

'एक देश, एक निवडणूक' या विषयावर देशात सुरू असलेल्या चर्चेला भारताच्या लोकशाही प्रक्रियेसाठी महत्त्वाचे आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित विषय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगतानाच त्यांना सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन सोमवारी केले. राजधानी दिल्लीतील करिअप्पा परेड ग्राऊंड येथे राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सच्या (एनसीसी) वार्षिक सभेला संबोधित करताना नरेंद्र मोदी बोलत होते.



स्वातंत्र्यानंतर बराच काळ लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेतल्या जात होत्या, परंतु नंतर हा क्रम खंडित झाला. परिणामी देशाला खूप नुकसान सहन करावे लागले, असे पंतप्रधान म्हणाले.

प्रत्येक निवडणुकीत मतदार यादी अद्ययावत केली जाते, त्यासाठी खूप काम करायचे असते. आमचे शिक्षक अनेकदा त्यासाठी ड्युटीवर असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो. वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे प्रशासनातही समस्या निर्माण होतात. देशात 'एक देश, एक निवडणूक' यावर चर्चा सुरू आहे आणि लोक त्यांचे विचार मांडत आहेत, याकडे पंतप्रधानांनी लक्ष वेधले. लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्यास अनेक समस्यांचे निराकरण होऊ शकते आणि अधिक केंद्रित प्रशासन दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो. तुम्ही जिथे असाल, तिथे ही चर्चा पुढे नेऊन त्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हा कारण हा तुमच्या भविष्याशी संबंधित मुद्दा आहे, असे प्रतिपादन पंतप्रधानांनी केले.भारताच्या भविष्यातील राजकीय परिदृश्याला आकार देण्यासाठी चर्चेत भाग घेणे आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला.अमेरिकेसारख्या देशांमध्ये दर चार वर्षांनी निवडणुका होतात आणि नवीन सरकार स्थापनेच्या तारखा निश्चित केल्या जातात हे त्यांनी अधोरेखित केले. या वर्षीच्या एनसीसी परेडची थीम 'युवा शक्ती, विकसित भारत' आहे. पंतप्रधान कार्यक्रमस्थळी आल्यानंतर, ८०० हून अधिक कॅडेट्सनी राष्ट्र उभारणीसाठी एनसीसीची वचनबद्धता दर्शविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

# ७६ वा प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा

**•कर्तव्यपथावर ५००० कलाकारांचे एकत्र सादरीकरण**
**•फ्लायपास्टमध्ये दिसले अपाचे-राफेल**

**नवी दिल्ली, २७ जानेवारी**

रविवारी देशभरात ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युद्ध स्मारकावर पोहोचून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. यानंतर ते प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सहभागी होण्यासाठी कर्तव्यपथवर पोहोचले.

दुसरीकडे, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यासोबत बग्गीत बसून कर्तव्यपथवर आल्या. द्रौपदी मुर्मू यांनी तिसऱ्यांदा राजपथावर तिरंगा फडकावला. यावेळी प्रजासत्ताक दिनाची थीम 'सुवर्ण भारतः वारसा आणि विकास' ही होती. संस्कृती मंत्रालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने परेडची सुरुवात झाली. ३०० कलाकारांनी वाद्ये वाजवत परेड काढली. त्यानंतर इंडोनेशियन लष्करी कर्मचाऱ्यांची एक तुकडी कर्तव्यपथवर परेडमधून गेली.





भारतीय सैन्याच्या सैनिकांनी भीष्म टँक, पिनाक मल्टी लाँचर रॉकेट सिस्टिमसह मार्च केला. वायुदलाच्या फ्लायपास्टमध्ये ४० विमानांनी भाग घेतला. ज्यामध्ये २२ लढाऊ विमाने, वाहतूक विमाने, ७ हेलिकॉप्टर सहभागी झाले होते. या फ्लाय पास्टमध्ये अपाचे, राफेल, हरक्युलिस विमाने सहभागी होती. परेडमध्ये १५ राज्ये आणि १६ मंत्रालयांचे चित्ररथ दिसून आले. पहिल्यांदाच ५ हजार कलाकारांनी कर्तव्य पथावर सादरीकरण केले.

# समर्पित भावनेने भारताने जगाला मार्गदर्शन करायचेय्

## ▸ सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**मुंबई, २७ जानेवारी**

संपूर्ण जग भारताकडून नेतृत्वाची अपेक्षा करीत आहे. भारताला इथवर आणण्यासाठी अनेकांनी स्वत:ला समर्पित केले. आपल्यालाही समर्पणाच्या भावनेतून जगाला मार्गदर्शन करायचे आहे. आज आपण सर्व भारतीयांना राष्ट्र आणि समाजाविषयी समर्पित होऊन काम करायला हवे. समर्पणाची भावना आपल्याला विश्वगुरूच्या पदापर्यंत पोहोचण्यास मदत करेल. येणाऱ्या पिढ्याही याच मार्गावर वाटचाल करतील आणि भारताला संपूर्ण जगात गौरवशाली बनवतील, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केला.

भिवंडीतील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या वतीने आयोजित प्रजासत्ताकदिन समारंभात सरसंघचालकांनी ध्वजवंदन केले. यावेळी आपल्या उद्बोधनात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, भारत पुढे जातो आहे, प्रगती करतो आहे. जगात आघाडीवर आहे. यामुळे त्याची सामरिक शक्तीही वाढते आहे. हे सर्व काही अण्णासाहेब



जाधवांसारख्या पूर्वजांमुळे आणि त्यांच्या त्यागपूर्ण जीवनामुळेच शक्य झाले आहे.

भारताचा राष्ट्रीय ध्वज स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. या तिरंग्यातील भगवा रंग हा त्याग बलिदानाचा रंग आहे. सोबतच हा रंग सर्वस्व समर्पणाचीही प्रेरणा देतो. पांढरा रंग पावित्र्याचे प्रतीक आहे, तर हिरवा रंग समृद्धीचे प्रतीक आहे. राष्ट्रध्वजातील अशोक चक्र परस्पर बंधुभाव आणि ममत्वाचे प्रतीक आहे आणि तो सद्भाव, समरसतेचा संदेश देतो. धर्म केवळ पूजा करण्याचा विषय नाही, हा आचरणाचा विषय आहे. बंधुभाव प्रेम शाश्वत धर्म आहे, जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही घटनेचा मसुदा तयार करताना हेच केले होते. कोणी व्यक्ती या बंधुभावनेच्या आधारावर मोठी झाली, तर तिचे कुटुंब मोठे होईल आणि त्यापाठोपाठ समाजही मोठा होईल, असे सरसंघचालक म्हणाले.

## शाळांतील प्रजासत्ताक दिन



### के.एल.ई. स्कूल

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

सकाळच्या अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात के.एल.ई. प्रशालेच्या प्रांगणात ७६वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. प्राचार्य सतीश हिरेमठ यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. या दिवशी आपल्या देशात संविधान लागू झाले होते. एनसीसी व स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध परेड केले. या प्रसंगी एन.सी.सी.च्या कॅडेट्सना चपळगाव येथे झालेल्या शिबिरामध्ये त्यांनी जे प्राविण्य मिळवलं त्यासाठी त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. देशभावना जागृत करणारे भाषण विद्यार्थ्यांनी केले. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



### महावीर व चतुरबाई श्राविका विद्यालय

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

विकास नगर परिसरातील महावीर हायस्कूल व चतुरबाई श्राविका विद्यालयात ७६वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील आणि प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, ज्येष्ठ शिक्षक अभिनंदन विभुते व श्रीकांत नेजकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे दीपक आर्वे यांच्या हस्ते सरस्वती, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मार्चिंग, साधन कवायत, देशभक्तीवर गाणी, नृत्य, मनोगत सादर केले. प्रमुख पाहुणे दीपक आर्वे यांचा परिचय अभिनंदन विभूते यांनी करून दिले व सत्कार श्रीकांत नेजकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता धोंगडे यांनी केले.



### निदा उर्दू प्राथमिक शाळा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

निदा उर्दू प्राथमिक शाळेतच्यावतीने ७६वा गणतंत्र दिवस उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सय्यद गुफरान इनामदार, पिरजादे, प्राचार्य फैयाज सागरी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे हस्ते झेंडा फडकवून सलमी देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना देश भक्ती गीत सादर केले. सुत्रसंचालन सोफी बाटघर यांनी तर आबिदा बीजापुरे यांनी आभार मानले.



### शमा उर्दू प्राथमिक शाळा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

शमा उर्दू प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमासाह ७६वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. संस्थेचे अध्यक्ष अय्यूब नल्लामंदू यांच्या अध्यक्षतेखाली व कुमठे केंद्र प्रमुख सी. रा. वाघमोडे यांच्या प्रमुख उपस्थित हा कार्यक्रम पार पडला. मुख्यध्यापक अबुबकर नल्लामंदू यांनी स्वागत केले. या वेळी विद्यार्थ्यांनी शाहीन सदफ लिखित गीते व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून सर्वाची मने जिंकले. विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्रमाण पत्र, स्मृति चिन्ह, भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आले. सुत्रसंचलन अबरार नल्लामंदू यांनी केले तर दिलशाद बिजापूरे यांनी आभार मानले.



### चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. बी.एम.सी. बँकेचे शाखाधिकारी किरण कोंडलेकर बी. एम. यांच्या हस्ते ध्वजारोहन झाले. अध्यक्षस्थानी बशीर अहमद बागवान होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जे. बी. बागबान, अश्विनी किरण कोंडलेकर उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धेचे पारीतोषिक वितरण पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीते, भाषणे व सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी यावेळी विविध प्रकारच्या वेशभुषा परिधान केले होते. मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी प्रास्ताविक केले. बागबान नेहा यांनी सुत्रसंचालन केले. आभार शाफिया शेख यांनी मानले.

# शहरातील विविध संस्था, शाळा महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात



सेवासदन प्रशाला




सिंहगड शिक्षण समूह



कोठारी प्रशाला



यमाईदेवी आश्रम शाळा



कुमठे प्रशाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी**

शहरातील विविध संस्था शाळा व महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

### सेवासदन प्रशाला

सेवासदन प्रशालेत संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. स्त्री पुरुष समानता, आणि स्त्रियांच्या विकासावर देशाचा विकास होतो असं त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. वाहतूक सुरक्षा दलाचे शिक्षक रेवणसिद्ध कट्टे यांनी यावेळी शाळेतील सर्व विभागाचे संचलन सादर केले. डॉ. राजीव प्रधान, जळगाव येथील जिल्हा न्यायाधीश सानवी श्रीधर गवई यांच्या हस्ते शाळेच्या प्रवेशद्वारा जवळ संविधान शिल्पाचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. याप्रसंगी संस्थेच्या सचिव वीणाताई पतकी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संजीवनी नगरकर बालवाडीच्या प्रमुख संगीता आपटे, पर्यवेक्षक स्वाती पोतदार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी मोरे यांनी केले.

### सिंहगड शिक्षण समूह

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित येथील केगाव एन बी नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेजच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन साजरा झाला. सिंहगड संस्थेच्या सेंटर फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंट (सीआरटीडी) चे संशोधन संचालक, माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजी पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळेस पब्लिक स्कूलच्या प्राचार्या निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, संस्थेचे निबंधक डॉ. डी. आय. नवले, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे यांची उपस्थिती होती. यावेळेस विद्यार्थ्यांना सुंदर पथसंचलन करून डॉ. एस एच पवारांनी सलामी स्वीकारली. नंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह गीत, नृत्याविष्कार सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. वर्षभरात विविध यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला. त्याचबरोबर वेळेवर आणि सुरक्षित प्रवास करीत विद्यार्थ्यांना शाळेत सोडणा-या स्कूलबस वाहनचालक आणि अॅटेंड करणा-या मामा- मावशींचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



व्हॅलेंटाईन स्कूल

### श्री न.फू.शहा कोठारी प्रशाला

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न झाला. अध्यक्ष म्हणून ल.अं.खामितकर विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका प्रतिभा शटगार उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक सुधाकर दत्तात्रय पोळ, संस्थेचे विश्वस्त देवेंद्र शटगार,प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी प्रतिमेचे पूजन करून, ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी सृष्टी कोळी, गायत्री कुंभार, कादंबरी यमगर, कु.गजाकोश या विद्यार्थिनीने देशभक्तीपर गीत व मनोगत व्यक्त केले. देशभक्ती गीतावर आधारित विविध कला गुणदर्शन प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. इयत्ता आठवी अ वर्गातील विद्यार्थ्यांनी देशभक्ती या विषयावर आधारित पथनाट्य सादरीकरण केले. सौ.शिंदे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात सांगितले. मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुपाते, सौ. माने तर आभार सौ.आरती उपाध्ये यांनी मानले.

### यमाईदेवी आश्रम शाळा

संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी या आश्रम शाळेत भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर मॅरेथॉनचे डायरेक्टर व डेंटल सर्जन डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संकल्प टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे मालक प्रवीण वैद्य,विठ्ठल कोल्हे, रोटरी क्लब नॉर्थ सोलापूरचे कलाप्पा कांबळे,नागनाथ लांबतुरे, जयश्री लांबतुरे ,राकेश उदगीरी, सौ.उदगिरी हे उपस्थित होते.याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे, संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, संचालक शंकर जाधव, पत्रकार सुहास राऊळ, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता व्हनकोळे - जाधव, अशोक देशमुख, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदीप चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सामुदायिक कवायत प्रकार ,भाषण, गीत गायन, देशभक्तीपर गीतावर नृत्य, नाटक, इ. कलाविष्कार सादर केले. तसेच शाळेतील शिक्षक तानाजी तानगावडे यांच्यातर्फे इ.१ली ते इ.७ वीच्या प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थ्यास आदर्श गुणवंत विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. यावेळी समर्थ सुरेश अवघडराव इ.१ली, कु. सरस्वती राम जमादार इ.२री ,स्वराज्य प्रमोद आंग्रे इ.३री, कु.दुर्गा नामदेव बंडेवाड इ.४थी, वेदांत रामदास कांबळे इ.५वी ,रत्नदीप दीपक कांबळे इ.६वी ,श्रीकांत गणेश तळे इ७वी तसेच उत्कृष्ट खेळाडू म्हणून कु.अश्विनी विठ्ठल कोळी इ.६वी व युवराज शिवाजी चव्हाण इ.७वी या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कल्लप्पा कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी यांनी केले. तर सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी व आभार विद्या हराळे-लांबतुरे यांनी केले.

### कुमठे प्रशाला व महाविद्यालय

कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. ब्रह्मदेव दादा माने यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन प्रकाश काशीद यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहण संस्थेचे विश्वस्त जयकुमारजी माने यांच्या हस्ते करण्यात आले. कवायत व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ब्रह्मदेव दादा माने बँकेचे संचालक तानाजी शिनगारे प्रगतशील बागातदार राजू मायनाळे उद्योजक राजू ताकमोगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड यांनी केले. पर्यवेक्षक श्री गुंगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ उर्मिला बनसोडे यांनी केले.

### व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेच्या राष्ट्रीय खेळांडूनी क्रिडाज्योत आणली. उद्योजक राजु भगिरथ राठी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय मेहजबीन शेख यांनी केले. यावेळी शाळेत घेण्यात आलेल्या क्रीडा सप्ताहातील विविध स्पर्धामध्ये वैयक्तिक व सांघिक स्पर्धेतील खेळाडू तसेच जिल्हा व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांचा हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. खेळाडूंना क्रिडा शिक्षक लावण्या दुस्सा व संतोष पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कलाशिक्षक पुरस्कार शाळेचे कलाशिक्षक इंद्रजीत चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भाग्यश्री गिडवीर व श्वेता येमेकर तसेच आभारप्रदर्शन चंदना कोटा यांनी केले.

# महापालिका कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ५ टक्के वाढ

## आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केली घोषणा

## सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी**

सोलापूर : महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्याच्या प्रचलित दरात ५ टक्के वाढ करण्यात येत आहे. रोजंदारी सेवकांना दैनिक वेतनात ५० रूपये वाढ तसेच बालवाडी शिक्षिका - सेविकांच्या मानधनात दरमहा रुपये ५०० रुपये वाढ करण्यात येत आहे. वर्ग एक ते चार कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्यात वर्गानुसार २७५ ते ६०० रुपये इतकी वाढ करण्यात येत असल्याची घोषणा महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात केली.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या इंद्रभुवन इमारतीसमोर आज महापालिका आयुक्त शीतल - तेली उगले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्याप्रसंगी त्यांनी ही घोषणा केली. यावेळी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी , सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त अनिता मगर, श्रीराम पाटील, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, नगर अभियंता सारिका अकुलवार आदींसह अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महापालिकेच्या आयुक्त यांच्या समवेत संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर तंबाखू मुक्तीची शपथ व स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाची शपथ घेण्यात आली.

महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले पुढे म्हणाल्या, प्रजासत्ताक दिन हा संविधानाचा अभिमान आणि तत्त्वाच्या बांधिलकीची जाणीव करून देतो. शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ११० किलोमीटरची उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम सुरू आहे. ११० किलोमीटर पैकी १०५ किलोमीटर पाईपलाईन अंथरण्यात आली आहे. ८२ किलोमीटरचे हायड्रोलिक टेस्टिंगचे काम पूर्ण झाले आहे. फेब्रुवारी २०२५ पूर्वी हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. फार काळ रखडलेली ही योजना सर्व अडथळ्यांची शर्यत पार करत पूर्णत्वास येत आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियान अंतर्गत भुयारी गटारांची योजनेच्या ४३३.२९ कोटी रुपयाच्या कामास प्रारंभ झाला आहे. आतापर्यंत १३ किलोमीटरची ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम झाले आहे. यापूर्वीचा अमृत एक प्रकल्प पूर्ण होत आहे. यामध्ये २४६ किलोमीटर ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. केंद्र सरकार पुरस्कृत अमृत -२ अंतर्गत ८८२ कोटीचा शहर पाणीपुरवठा प्रकल्प आराखडा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रिक मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा महापालिकेने प्रयत्न केला आहे. या अंतर्गतच महापालिकेत कार्यरत असलेल्या अधिकारी - कर्मचारी, सेवानिवृत्त सेवक तसेच माध्यमिक प्रशालेकडील सेवानिवृत्तांना महागाई भत्यात ५ टक्के वाढ करण्यात येत आहे. सध्या ३१ टक्के महागाई भत्ता असून वाढीनंतर आता ३६ टक्के होणार आहे, अशी घोषणाही यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी केले आहे.

### ३१५ कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती

कर्मचारी यांच्या कल्याणासाठी महापालिकेने अनेक पावले उचलली आहेत. १५५ अधिकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली. लाड - पागे कमिटी अंतर्गत आतापर्यंत एकूण ३१५ कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती पत्र दिली आणि अनुकंपा तत्वाखाली ८४ जणांना नियुक्त पत्र प्रदान करण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे संचलन अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी केले. याप्रसंगी प्रभारी अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे अधिक्षक रजाक पेंढारी, मिळकत कर विभागाचे अधिक्षक युवराज गाडेकर, बांधकाम परवाना विभागाचे प्रमुख उपअभियंता नीलकंठ मठपती, कामगार व कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे,, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### भीषण अपघातात मायलेकासह चिमुकलीचा मृत्यू

**अर्जुनी मोरगाव, २७ जानेवारी**

भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला मागून दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार मातेसह दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकी चालकही गंभीर जखमी झाला. हा अपघात तालुक्यातील नवेगावबांध- बाराभाटी मार्गावर भारती बारसमोर रविवारी दुपारी झाला. चितेश्वरी संदीप पंधरे, संचित संदीप पंधरे व पार्थवी रोहित सिडाम अशी मृतांची तर संदीप राजू पंधरे असे जखमीचे नाव आहे. सर्व रा. येरंडी/देवलगाव येथील रहिवासी आहेत. संदीपवर ब्रह्मपुरी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे. संदीप पंधरे हा दुचाकीने पत्नी चितेश्वरी, मुलगा संचित व घराशेजारील पार्थवीसह येरंडी येथून नवेगावबांधकडे जात असताना भरधाव बोलेरो पिकअपने दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. यात दुचाकीवरील तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुचाकी चालक संदीप पंधरे गंभीर जखमी आहे. नवेगावबांध पोलिसांनी संदीपला रुग्णालयात हलविले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने त्याला ब्रह्मपुरीला हलविण्यात आले. यावेळी येरंडीतील नागरिकांनी घटनास्थळासह नवेगावबांध ग्रामीण रुग्णालयात प्रचंड गर्दी केली होती. अपघातास कारणीभूत पिकअप वाहन नवेगावबांध येथीलच असल्याची माहिती आहे. मातेसह दोन चिमुकल्यांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे. तिन्ही मृतदेहांवर सो वारी येरंडी येथील स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्यात आला. रोहित रामटेके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नवेगावबांधच्या पोलिस निरीक्षक योगिता चाफले करीत आहे.

### भीषण अपघातात चौघे गंभीर जखमी

**राळेगाव, २७ जानेवारी**

भरधाव चारचाकीचा भीषण अपघात झाला. यात चार जण गंभीर जखमी झाले. ही घटना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील बोरी इचोड गावाजवळ सोवारी सकाळी ८.३० वाजताच्या सुरास घडली. बंगळुरू येथून सोलंके कुटुंब कारने नागपूरमार्गे प्रयागराजकडे जात होते. राष्ट्रीय महामार्ग-४४ वरील बोरी इचोड गावाजवळ ट्रकला ओव्हरटेक करताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले व कार दुभाजक तोडून ३५ फूट अंतरावर फेकली गेली. कारच्या एअरबॅग खुलल्याने जीवितहानी टळली. मात्र, कारचालक प्रकाश बागडे, कांचन सोलंके, गौरव सोलंके, निखिता सोलंके हे चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत. यातील निखिता सोलंके ही कारच्या दारात फसल्यामुळे प्रकृती चिंताजनक आहे.

# तुळजापुरातील बाभळगाव तलावात आढळले तीन मृतदेह

## पुलावर संरक्षण कठडे नसल्याने घडली दुर्घटना

### राष्ट्रीय महामार्गाचा गलथान कारभार

**तभा वृत्तसेवा । दिनेश सलगरे**
**इटकळ, दि. २७ जानेवारी-**

तुळजापुर तालुक्यातील मौजे बाभळगाव येथील साठवण तलावावरील फुलाखाली पाण्यावर तरंगताना तिघांचे मृतदेह आढळले असून यामध्ये दोन महिला व एक पुरुषांचा सम ावेश आहे .ही घटना सोलापूर उमरगा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर दि. २७ जानेवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.याबाबत पोलिसांकडून मि ळालेली माहिती अशी की दुपारी एकच्या सुम ारास राष्ट्रीय महामार्गावर केरूर गावाजवळील बाभळगाव तलावातील पुण्याखाली पाण्यावर तरंगताना तिघांचे मृतदेह आढळून आले याम ध्ये अयुब नदाफ वय ४५ वर्ष रा.आनंदनगर ता. उमरगा व दोन महिला जया लक्ष्मण कांबळे वय ३० वर्ष व रेश्मा होडगी वय ३२ वर्ष असे महिलांचे नावे आहेत अद्याप घटनेचे कारण स्पष्ट झालेले नसून दोन दिवसांपूर्वी ही घटना घडली असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे स्थानिक लोकांच्या मदतीने व पोलिसांनी मिळून मृतदेह पाण्याबाहेर काढून टोल नाक्याच्या अंबुलन्स मध्ये नळदुर्ग येथील दवाखान्यात पाठवण्यात आले दोन दिवसापूर्वी हे तिघे गावातून मोटरसायकलवर गेल्याचे नातेवाईकांनी सांगितले



सोलापूर उमरगा राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू होऊन दहा वर्षे झाले परंतु हे अद्याप येथील काम अर्धवट आहे विविध ठिकाणच्या पुलाचे काम अर्धवट राहिले आहेत बाभळगाव तलावावरील याच पुलावर कठडा नसल्याने तीन महिन्यापूर्वी एक एसटी बस याच कठडा नसलेल्या पुलावरून खाली पाण्यात जाता जाता बचावली होती त्यामध्ये पन्नास प्रवासी सुखरूप बचावले होते परंतु पुन्हा त्याच ठिकाणी घटना घडली असून पुलाला कटरा नसल्यामुळे ही घटना घडल्याचे वर्तवली जात आहे या घटनेमुळे लोकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून रस्त्याचे काम आणखी किती जणांचा बळी घेतल्यानंतर पूर्ण होईल अशी भावना व्यक्त केली जात आहे याबाबत नळदुर्ग पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने तात्काळ येथील अर्धवट रस्ते संरक्षण कठडे सर्व्हिस रस्ते व रस्त्यावर ठीक ठिकाणी पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्त करून होणारी जीवित हाणी टाळावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा येथील गाव परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

# विमानसेवेसाठी आता मार्चचा मुहूर्त

### ‘७२ सीटर’ परवान्यासाठी ‘प्लाय ९१’ चा प्रस्ताव दाखल

### सोलापूर-मुंबईसाठी स्लॉट मिळाला

### फेब्रुवारीत पूर्तता अन् मार्चमध्ये विमानाचे उडान

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

होटगी रस्त्यावरील विम ानतळावरून विमान उड्डाणासाठी ४२ आसन क्षम तेचा परवाना डीजीसीएने पूर्वीच्या विमान कंपन्यांना दिला होता. या परवान्यावरून प्लाय





९१ या विमान कंपनीच्या ७२ आसनी विम ानाला सेवा देता येणार नाही. त्यामुळे आता ४२ ऐवजी ७२ आसनी क्षमतेचा परवाना मिळविण्यासाठी प्लाय ९१ या कंपनीचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दरम्यान, फेब्रुवारीत या परवान्याची प्रक्रिया पूर्ण होवून सोलापूर ते गोवा या मार्गावर मार्च महिन्यात विमानसेवा सुरू होईल, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्ट केले. होटगी रस्त्यावरील विम ानतळावरून विमान उड्डाणासाठी अनेक अडचणी येत असून, आता नव्याने आसन क्षमतेचा मुद्दा उपस्थित होत असल्याने विमानसेवा अजून लांबणीवर पडत आहे. यापूर्वीच्या विमान कंपन्यांना होटगी रस्त्यावरील विमानतळावरून ४२ आसन क्षमतेच्या विमान उड्डाणाला डीजीसीएने परवाना दिला आहे. परंतु इतक्या कमी संख्येच्या प्रवाशांची वाहतूक प्लाय ९१ या विमान प्रवाशी वाहतूक कंपनीला करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने त्यांनी ७२ आसन क्षमतेच्या परवान्यासाठी डिजीसीएकडे प्रस्ताव दिला आहे. १० फेब्रुवारीपर्यंत या प्रस्तावाला मंजुरी मिळेल आणि मार्च महिन्यात सोलापूर-गोव्यासाठी विमानसेवा सुरू होईल, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्टपणे सांगितले. यामुळे सोलापूरकरांना विम ानसेवेची मार्चपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. एकंदरीत, एअरपोर्ट अॅथोरिटी ऑफ इंडियाकडून नागरी विमानसेवेबाबतच्या सर्व त्रुटींची पूर्तता झाल्यावरच सोलापुरात विमानेसेवा सुरू होणार असल्याचे आता निश्‍चित झाले आहे.

#### सोलापूर-मुंबईसाठी स्लॉट मिळाला


सोलापूर-मुंबई विमानसेवेसाठी मुंबई विमानतळावर स्लॉट मिळाला असून, उडान योजनेतून सोलापूर ते मुंबई विमानसेवा एप्रिल किंवा मे महिन्यात महिन्यात सुरू होईल, असा विश्वासही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी व्यक्त केला.

# समृद्धी महामार्गावर विचित्र अपघात

**◆ वर्धा, २७ जानेवारी**

नादुरुस्त झाल्याने उभ्या असलेल्या सिमेंट भरलेल्या ट्रकवर मागून येणारी भरधाव कार आदळली. त्यानंतर दुसरी कार अपघातग्रस्त कारवर धडकली. या विचित्र अपघातात दोन्ही कारमधील ६ जण जखमी झाले. हा अपघात जाम-नागपूर समृद्धी महामार्गावर जसापूर शिवारात सोमवारी मध्यरात्री २.४० च्या सुमारास घडला.

या अपघातात□कारमधील सात प्रवाशांपैकी हैदराबादेतील आदित्य राज, कल्पना कटरला, रिशिका गंभीर जखमी झाले. दुसऱ्या वाहनातील तेलंगणाच्या जहिराबाद येथील १२ प्रवाशांपैकी नरसिंह मल, अमरनाथ रेड्डी, गणेश अभंग सुरवशे हे किरकोळ जखमी झाले.



ट्रकचालक मोहम्मद अखिल मोहम्मद लल्लू (रा. पडोली चंद्रपूर) हा ट्रकमध्ये सिमेंट भरून समृद्धी महामार्गाने जात होता. जसापूर शिवारात ब्रेक डाऊन झाल्याने ट्रक फर्स्ट लेनवर नादुरुस्त स्थितीत उभा होता. हैदराबाद-प्रयागराज जात असलेल्या कारचालकाला नादुरुस्त वाहन न दिसल्याने कार थेट ट्रकवर आदळली. काही वेळाने मागून आलेली दुसरी कार अपघातग्रस्त कारवर धडकली.

जाम महामार्ग पोलिसांनी जखमींना समुद्रपूर येथील शासकीय रुग्णालयात हलविले. पोलिस निरीक्षक संतोष सपाटे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक भय्याजी तोडसे, विकास काकडे, रणजित फाले, प्रदीप डोंगरे यांनी वाहतूक सुरळीत केली. ◂(तभा वृत्तसेवा)

# डिजिटल मिडियाचे ६ एप्रिलला सावंतवाडी येथे महाअधिवेशन

### ना. नितेश राणे यांनी स्वागताध्यक्ष तर डॉ. अच्युत भोसले यांनी स्वीकारले सह स्वागताध्यक्ष

### राजा माने यांची घोषणा : भोसले नॉलेज सिटीच्या प्रांगणात होणार

### राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनाही निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

देशातील पहिल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकारांची संघटना असलेल्या डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे तिसरे महा अधिवेशन सावंतवाडी (सिंधुदुर्ग) येथे भोसले नॉलेज सिटी च्या प्रांगणात ६ एप्रिल रोजी होणार असून राज्यातील विविध मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना या अधिवेशनासाठी निमंत्रित केले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रातून ३ हजार हून अधिक संपादक पत्रकार उपस्थित राहणार असून या महा अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षपदी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे तर सहस्वागत अध्यक्षपदी डॉ. अच्युत भोसले हे राहणार आहेत, या ऐतिहासिक तिसऱ्या महा अधिवेशनाच्या संयोजक पदाची जबाबदारी संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण व सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांच्यावर सोपवली असल्याची माहिती राजा माने यांनी सावंतवाडी येथे पत्रकार परिषदेत दिली.



या महाअधिवेशनासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योग भरत मंत्री उदय सामंत, रोजगार हमी योजना मंत्री भरतशेठ गोगावले ,आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे,माजी मंत्री व सिंधुदुर्ग चे आमदार दीपक केसरकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष राजा माने, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत,कोकण विभाग अध्यक्ष सागर चव्हाण, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य कार्यकारणी सदस्य कुंदन हुलावळे, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष भरत केसरकर यांची उपस्थिती होती.सावंतवाडी येथे होणाऱ्या महाअधिवेशनाच्या निमित्ताने राज्यभरातील आठ विभागातील ज्येष्ठ पत्रकार संपादकांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाईल. मान्यवर व्यक्तींची मुलाखत, डिजिटल मीडिया मधील मान्यवर व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन, परिसंवाद असे कार्यक्रम होतील. राज्यभरातील डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या सभासदांनी या अधिवेशनासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी.



# बीगासीईमध्ये एनपीटीईएल स्वयम जागरूकता कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

येथील भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केगांवमध्ये एनपीटीईएल स्वंयम जागरूकता कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला होता.

संस्थेचे अध्यक्ष रविंद्र गायकवाड आणि सेक्रेटरी अनामिका गायकवाड यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम एनपीटीईएल स्थानिक अध्याय (NPTEL Local Chapter) अंतर्गत आयोजित केला. त्यामध्ये २१२ शिक्षक तंज्ञ (Teaching Faculty) सहभागी झाले होते. जे महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा राज्यातील विविध शैक्षणिक संस्थेमधून आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्त्या भारती सकपाल (Sr. Project Manager NPTEL IIT Bombay) आणि निशा ठाकूर (sst. Project Manager, NPTEL, IIT) होत्या. त्यांनी एनपीटीईएल आणि स्वंयमच्या कोर्सेसचे महत्व आणि त्यांच्या शिक्षण तंज्ञासाठी कसा उपयोग होऊ शकतो यावर सखोल माहिती दिली.

याचे उदघाटन प्रा. संदीप वामने, प्राचार्य गौरीताई टिळक कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या हस्ते झाले. डॉ. अनिल देशमाने, प्राचार्य भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सययद गिलानी पाशा होते. तर प्रा. शांतीसागर ताकपेरे हे कार्यक्रम ाचे सम्नवयक होते. कार्यक्रम ाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभाग प्रमुख, अॅकॅडमिक डिन, डॉ. संजीव भोसले, डॉ. अल्ताफ मुधोळ, डॉ. स्नेहलता नाईक, डॉ. श्रीनु बाबू, डॉ. वैभव शिरोडकर, डॉ. प्रविणकुम ार मून यांचे सहकार्य लाभले.

# घरफोडी करणाऱ्या तीन आंतरराज्य गुन्हेगारांना अटक

### सहा गुन्हे उघडकीस

### साडेनऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

### शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

सोलापूर शहरातील मार्केट यार्ड व जोडभावी पेठेतील दुकाने फोडून लाखों रुपये किंमतीचे ड्रायफ्रुट, सिगारेट व मसाले चोरून नेणाऱ्या आंतरराज्य गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश करून तीन आरोपींना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी तिघांकडून ६ गुन्हे उघडकीस आणून ९ लाख ४४ हजार २०२ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्हेगारांनी महाराष्ट्रातील सोलापूर, लातूर, चंद्रपूर, सांगली या जिल्ह्यामध्ये तसेच हैद्राबाद येथेही चोऱ्या केल्या असून राज्यातील इतर शहरामध्येही चोऱ्या करण्याच्या प्रयत्नात असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

माणिकचंद्र बुधारामजी कुमावत (वय ३५, रा. बिरोल, ता. जैतारण, जि. पाली, राजस्थान), भुंडाराम उर्फ बाबू करणारामजी कुमावत (वय ३८, रा. जैतारण, जि. पाली, राजस्थान) आणि गणपत बगदारामजी कुमावत (वय ४१, रा. बांजाकुडी, ता. जैतारण, जि. पाली, राजस्था सर्व सध्या रा. इंद्रेशाम, गौतम स्कुलच्या पाठीमागे, ता. पट्टणचूर, जि. संगारेड्डी, तेलंगणा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या तिघांकडून सोलापूर शहरातील जेलरोड पोलिस ठाण्यातील दोन, जोडभावी पेठ, सांगली जिल्ह्यातील विश्रामबाग पोलिस ठाणे, लातूर येथील गांधी चौक आणि चंद्रपूर जिल्ह्यातील रामनगर पोलिस ठाण्यातील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आला आहे.

सोलापूर शहरातील मार्केट यार्ड व जोडभावी पेठेत गेल्या काही दिवसामध्ये चोरट्यांनी दुकाने फोडून ड्रायफ्रुट, सिगारेट व मसाले चोरून नेल्याचे तीन गुन्हे घडले आहेत. या गुन्ह्यांचा तपास करताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी कर्णिक नगरजवळील रस्त्यावर थांबलेल्या एका विना नंबरच्या चारचाकी गाडीतून वरील तिघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यास सुरुवात केली. यावेळी कारच्या पाठीम ागील बाजूस सिट नसून खाली काही काजूचे तुकडे पडल्याचे पोलिसांना दिसून आल्याने पोलिसांचा संशय बळावला व तिघांनाही पोलिसी खाक्या दाखविला. त्यावेळी तिघांनीही दुकानांचे शटर उचकटून आतून ड्रायफ्रुट, सिगारेट व मसाले चोरल्याचे सांगितले. तसेच लातूर, सांगली येथेही दुकाने फोडून ड्रायफ्रुट व मसाले चोरल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी तिघांकडून सोलापूर व सांगली येथील गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल काजू, बदाम, इलायची, पिस्ता, काळी मिरी, सिगारेट, कॅल्युलेटर व रोख रक्कम असा ४ लाख ३३ हजार ८०२ रुपये किंमतीचा मुद्देमाल व गुन्हा करण्यासाठी वापरलेली कार व इतर साहित्य असा ५ लाख १० हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल असा एकूण ९ लाख ४४ हजार २०२ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



#### यांनी केली कामगिरी....

पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संजय क्षिरसागर, हवालदार राजू मुदगल, महेश शिंदे, अनिल जाधव, कुमार शेळके, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, सिध्दाराम देशमुख, महेंद्र ठोकळ, सतिश काटे, बाळू काळे यांनी केली.

#### कर्ज झटपट फेडण्यासाठी चोरीचा मार्ग...

अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी हे राजस्थानमधील आहेत. या तिघांवरही कर्ज झाल्याने ते कर्ज झटपट फेडण्यासाठी त्यांनी मिळून चोरी करण्याचा मार्ग अवलंबिला असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या तिघांनी हैद्राबाद येथे चोऱ्या केल्या, परंतु तिथे ते पोलिसांनी त्यांना अटक केली. हैद्राबाद येथून जामीनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पोलिसांना सापडू नये यासाठी युट्युबवर क्राईम पेट्रोलसारख्या मालिका पाहिल्या व पोलिसांकडे कोणताही पुरावा राहणार नाही याची कशी खबरदारी घ्यायची याचा अभ्यास केला. त्यानुसार चोरी करण्यासाठी त्यांनी हैद्राबाद येथून जुनी वापरती कार, २ मोठ्या लोखंडी पारा, बॅटऱ्या खरेदी केल्या. मोठ्या बाजारपेठांमधील किंवा मार्केट यार्डामधील केवळ ड्रायफ्रुट, मसाले व सिगारेट यांचीच दुकाने फोडून किंमती मुद्देमाल चोरायचा असे ठरवून हे तिघेही सोलापुरात आले. त्यांनी गुगल मॅपवर सर्च करून मार्केट यार्डाजवळील लॉजमध्ये मुक्काम करून दिवसा दुकानाची रेकी करून रात्री चोऱ्या केल्या. ज्या दुकानात चोरी करायची आहे, त्या दुकानाजवळ दिवसा जाऊन त्याचे लोकेशन तिघांच्या वॉटसअॅपवर टाकून ठेवत असल्याचेही पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

#### आरोपींच्या गुन्ह्याची पध्दत...

पोलिसांनी पकडलेले आरोपी हे बिगन नंबरच्या चारचाकी कारमधून गुन्हे करण्यासाठी येत. मोबाईलवरील गुगल मॅपच्या सहाय्याने बाजारपेठांमधील ड्रायफ्रुट व मसाल्यांचे दुकानांचा शोध जवळच्या लॉजमध्ये राहायचे. १६ जानेवारी रोजी रेकी करून त्यांनी मार्केट यार्डातील दुकानाचे शटर २ लोखंडी पारांच्या मदतीने फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु, ते न तुटल्याने त्यांनी मार्केट यार्डातीलच दुसऱ्या दुकानाचे शटरचे लॉक तोडून दुकानातील सिगारेटचा माल चोरून नेला. त्यानंतर कुंभार वेसमधील आणखी एका दुकानाचे शटर लॉक तोडून ड्रायफ्रुट, मसाले व रोख रक्कम चोरून नेली. अशाप्रकारे एकाच दिवशी या तिघांनी तीन दुकाने फोडून चोरी केली होती. तसेच ८ जानेवारी रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील सिंधी कॉलनी, राम नगर येथे आणि १९ जानेवारी रोजी पहाटे लातूर येथील गंजगोलाई येथील आणि २१ जानेवारी रोजी सांगली मार्केट यार्डातील दुकान फोडल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. सोलापूरातील गुन्ह्यांचा तपास करताना सीसीटीव्हीमध्ये ३ संशयित व्यक्ती एका विना नंबरप्लेटच्या कारमध्ये येऊन तिन्ही दुकानामध्ये चोरी करीत असल्याचे दिसून आले होते. तपासामध्ये पोलिस विनानंबर प्लेटची गाडी शोधत असताना ती कर्णिक नगर रोडवर मिळून आल्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन गुन्हे उघडकीस आणले.

## अग्रलेख...

# प्रदूषण, भारतीय संस्कृती आणि आम्ही!

दूषित पाण्यापेक्षा दूषित हवेमुळे जगात अधिक लोकांचा मृत्यू होतो, हे ऐकून आता आश्चर्यही वाटेनासे झाले आहे. दिवसेंदिवस जगातील बहुतांश देशांमधील हवा प्रदूषित होत चालली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील प्रदूषणाची चर्चा संपूर्ण देशभर झाली. प्रदूषणाचा स्तर एवढा वाढला होता की, राजधानीतील शाळा आठवडाभर बंद ठेवाव्या लागल्या. राजधानी दिल्लीतील प्रदूषणामुळे तेथील नागरिकांचे आयुष्य साडेसहा वर्षांनी कमी होण्याचा धोका आहे, असा जो निष्कर्ष काढण्यात आला आहे, तो आम्ही गांभीर्याने घेतला नाही, तर आमचा भविष्यकाळ कठीण आहे. मोठ्या प्रमाणावर लाकडं जाळली जाणं, शेतातील पिकांचे अवशेष जाळले जाणे, भेसळयुक्त इंधनाचा अतिवापर केला जाणं, वाहतूक कोंडीमुळे रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या वाहनांमधून मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडणं, या व अशा अनेक कारणांमुळे भारतात हवा प्रदूषित होते. दिल्लीच्या आकाशात मध्यंतरी जो प्रचंड धूर होता, तो हरयाणा-पंजाबमधील शेतकरी पिकांचे अवशेष जाळत असल्यामुळे आला होता. हवा वेगवान असेल आणि हवेची दिशा दिल्लीकडे असेल तर तिकडचा धूर दिल्लीच्या आकाशात पसरतो आणि तिथल्या प्रदूषणाचा स्तर वाढून नागरिकांना त्रास होतो, हा अनुभव आहे. कचरा जाळण्यास बंदी असतानाही तो मोठ्या प्रमाणात जाळला जातो. कचरा व्यवस्थापन नीट न करता तो जाळण्यात आला, तर त्यातून जे अनेकविध विषारी वायू बाहेर पडतात, ते शुद्ध हवेत मिसळतात आणि हवा अशुद्ध होते. या अशुद्ध हवेलाच आम्ही प्रदूषण म्हणतो. आम्हाला हे प्रदूषण कशामुळे होते हे माहिती आहे, त्यावरील उपायही माहिती आहेत, पण आम्हाला ते करायचे नाहीत आणि दूषणं मात्र देत राहायची, ही आमची सवय आहे. देशातल्या लोकांचे जे सरासरी आयुष्मान आहे, ते तीन ते चार वर्षांनी कमी होत आहे आणि राजधानी दिल्लीतल्या नागरिकांचे आयुष्मान साडेसहा वर्षांनी कमी होत आहे, हीसुद्धा जर आम्ही गंभीर बाब मानत नसू तर आम्ही कोणत्या बाबतीत गंभीर आहोत, हा प्रश्नच आहे. प्रदूषण ही काही आता आपल्याच देशातील चिंता राहिली आहे, असे नाही. संपूर्ण जग वाढत्या प्रदूषणामुळे चिंतित आहे. परंतु, वाढलेले प्रदूषण कमी करण्याच्या संदर्भात जे संभाव्य उपाय आहेत, त्यावर कोणी गांभीर्याने चिंता करताना दिसत नाही. आपल्याकडे आपल्या नागपूरचे खासदार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी कायम या विषयावर चिंता करताना दिसतात, त्यावर उपाय करण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात. जेवढी वाहने आहेत, ती सगळी जैवइंधनावर चालवावीत असा त्यांचा आग्रह आहे. त्याचप्रमाणे पुढल्या काळात वाहने इलेक्ट्रिकवर चालावीत, हाही त्यांचा प्रयत्न आहे. वाहनांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना त्यांनी आधीच इशारा दिला आहे. भविष्याचा वेध घेणारा आणि त्यानुरूप नियोजन करणारा नितीन गडकरी यांच्यासारखा नेता देशातल्या प्रत्येक जिल्ह्याला लाभला तर प्रदूषणच काय, पण सगळ्याच समस्या संपुष्टात येतील. इथेनॉलचा वापर करण्यावरही नितीन गडकरी भर देताना दिसतात. पण, त्यांच्या प्रयत्नांना हरताळ फासण्याचे काम आपल्याच देशातील स्वार्थी लोक करीत आहेत, हे दुर्दैवच! मात्र, गडकरी हे जिद्दी आणि परिश्रमी आहेत. एक दिवस त्यांचे प्रयत्न नक्कीच यशस्वी होतील आणि आम्हाला 'अच्छे दिन' अनुभवास येतील, याची खात्री आहे. आमची भौतिक सुखाची भूक वाढली आहे. त्यामुळे आधुनिकता आणि प्रगतिशीलतेच्या नावावर निसर्गाचे प्रचंड शोषण आम्ही करीत आहोत. जोपर्यंत आम्ही निसर्गाचे शोषण थांबवत नाही, तोपर्यंत समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अंधारात सुई शोधण्यासारखे कठीण काम आहे. आम्ही आमच्या आचरणानेच निसर्गाचे संतुलन बिघडवत आहोत, याचा आम्हाला सोईस्कर विसर पडत आहे. हिरवीगार वनं तर आता दुर्मिळच होत चालली आहेत. आज आपल्या महाराष्ट्राचाच विचार केला तर जंगलाचे प्रमाण हे २०-२१ टक्के आहे. पण ते विदर्भात असलेल्या ४६ टक्के जंगलांमुळे आहे. विदर्भ जर महाराष्ट्रापासून वेगळा केला तर महाराष्ट्रातले जंगल दहा टक्के तरी असेल का, याची शंकाच वाटते. जंगलंच काय, देशातल्या अनेक बारमाही वाहणाऱ्या नद्याही कोरड्या पडल्या आहेत. ज्या नद्यांमध्ये आज पाणी दिसते आहे, ते वीस वर्षांआधी दिसत होते, त्याच्या अर्धेही दिसत नाही, ही बाब चिंताजनक आहे. अनेक नद्यांचे प्रवाहच थांबल्यासारखे झाले आहेत. एकीकडे हवेचे प्रदूषण आणि दुसरीकडे पाण्याचा अभाव, उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी अर्धे पाणी दूषित असणे आणि त्यामुळे अनेक प्रकारच्या व्याधी होणे, ही बाब आता नित्याची झाली आहे. शेतीचेही आता वेगाने यांत्रिकीकरण होत आहे. शेतात यंत्र चालविले जात असल्याने आणि उत्पादकता वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने जमिनीचा कसही कमी होत चालला आहे. कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने फळे, भाजीपाला, अन्नधान्याच्या माध्यमातून माणसाच्या शरीरात विषारी घटक प्रवेश करीत असल्यानेही नवनव्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. जे किडे आम्ही कधी बघितले नव्हते, ते अनेक प्रकारचे नवीन कीटक आम्हाला त्रास देऊ लागले आहेत. दरवर्षी जगात कुठल्या तरी देशात प्रदूषणावर चिंता व्यक्त करण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. जगभरातील प्रतिनिधी तिथे येतात, आपापली मतं मांडतात अन मायदेशी परततात. परिणाम? शून्य! आमचे जे पूर्वज होते, ऋषी-मुनी होते, त्यांनी निसर्गाच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. त्यांनीच आमच्यावर निसर्ग संरक्षणाचे संस्कारही केले होते. निसर्गाच्या विनाशामुळे जे भयावह परिणाम होत आहेत, त्यातून भारतीय संस्कृतीच आम्हाला वाचवू शकते, ही बाब जगभर स्वीकारली गेली होती. परंतु, दुर्दैवाने आम्ही भारतीयच भौतिकतेच्या मागे धावताना स्वसंस्कृती विसरत चाललो आहोत, विनाशाच्या मार्गावर अग्रेसर होत आहोत. दरवर्षी कोट्यवधी झाडं लावण्याचा प्रयत्न करूनही जंगलांची कटाई मोठ्या प्रमाणात होत असल्याने निसर्गाचा समतोल बिघडतोच आहे. देशात एकीकडे नद्या कोरड्या पडत असतानाच देशातील सगळ्यात मोठी असलेली नदी स्वच्छ करण्याची अतिशय महत्त्वाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नितीन गडकरी यांच्यावरच सोपविली होती. हा नितीन गडकरी यांचा जसा गौरव होता, तसाच तो नागपूर-महाराष्ट्राचाही सन्मान होता. गडकरी यांनी पहिल्या कार्यकाळात केंद्रीय जलसंसाधन खात्याचा कार्यभार स्वीकारताच अतिशय वेगाने निर्णय घेत गंगा नदी स्वच्छता अभियान हाती घेतले होते. गंगेचे स्वच्छ झालेले पाणी काँग्रेसच्या खासदार प्रियांका वढेरा यांनी प्यायले होते, हेही आपल्याला स्मरत असेलच. गंगा नदी स्वच्छ करण्याचा बहुमान एका नागपूरकराला मिळाला होता, ही आमच्यासाठी आनंदाची बाब होती. जी जबाबदारी मिळाली, ती कटाक्षाने पार पाडायची, हा गडकरी यांचा स्वभाव आहे. या स्वभावाला अनुसरून ते गंगा नदी शुद्ध करतील अन् गंगा खोऱ्यातील नागरिकांचे जीवनमान सुधारतील, याबाबत मोदी यांना खात्री होती म्हणूनच त्यांनी जबाबदारी सोपविली होती. अफाट कल्पनाशक्तीचे आणि अचाट राजकीय इच्छाशक्तीचे धनी असलेले नितीन गडकरी यांच्यासारखे नेते आपल्या देशात असताना आम्ही अनेकदा विदेशी तज्ज्ञांना पाचारण करतो आणि त्यांच्यावर पाण्यासारखा पैसा खर्च करून पदरात काहीच पाडून घेत नाही, हे सगळ्यात वेदनादायी होय. अपेक्षा करू या सगळे काही ठीक होईल अन जुने वैभव आपण प्राप्त करू!

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# बांगलादेशींची बनावट कागदपत्रे

अनेक बांगलादेशी नागरिकांनी बनावट कागदपत्रांद्वारे आधारकार्ड व पारपत्र (पासपोर्ट) बनवल्याचे आढळून आले आहे. आधारकार्ड किंवा पासपोर्ट मिळविणे ही एक गुंतगुंतीची प्रक्रिया आहे. सर्व कागदपत्रे योग्य स्वरूपात असली, तरी अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. इथे तर सुरुवातीपासूनच खोटेपणा करीत जावे लागते. गेल्या तीन वर्षांत मुंबई पोलिसांनी सुमारे १००० बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. ही तोतयागिरी बेमालूमपणे कशी चालू शकली, हे एक कोडेच आहे. स्थानिक पातळीवर मदत देणारे तत्पर असल्याशिवाय हे साध्य होऊ शकत नाही.

नववर्ष नुकतेच सुरू झाले आहे. पहिल्याच १५ दिवसांमध्ये मुंबईतून ८० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांना मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. पण घुसखोरांना मदत करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना पकडणेही आवश्यक झाले आहे. तीन वर्षांमध्ये मुंबईतून सुमारे १००० हून अधिक बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. हे घुसखोर आता चांगलेच सरावले असल्याचे लक्षात आले आहे. काही दिवसांपूर्वी दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) ॲप्लिकंट ट्रॅकिंग सिस्टिमच्या आधारे अटक केलेल्या काही घुसखोरांनी बेकायदेशीररीत्या भारतीय नागरिकत्व मिळवून लोकसभा निवडणुकीत मतदान केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. हे बांगलादेशी घुसखोर भारतीय पारपत्रावर परदेशात नोकरीसाठीही जाऊन आले होते, ही तर कमालच म्हणायला हवी. कायद्याचे पालन करणाऱ्या सामान्य माणसाला सरकारी दाखले किंवा शिधावाटप पत्रिका मिळविण्यासाठी शासकीय कार्यालयात अनेकदा खेटे घालावे लागतात. संबंधितांचे हात ओले केल्याशिवाय कागदपत्रे समोर सरकतच नाहीत. मात्र, बांगलादेशातून घुसखोरी करून आलेल्यांची कमाल बघा; त्यांना सहज कागदपत्रे मिळतात.

मुंबईसारख्या प्रचंड मोठ्या शहरात अनेक बांगलादेशी घुसखोर असणार, हे नक्की. याला लागून असलेल्या भागातही त्यांची संख्या खूप मोठी असणार, हेही स्पष्ट आहे. राज्यातील सर्वच पोलिस यंत्रणांनी घुसखोरांविरोधात विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. याशिवाय पोलिस ठाण्यांच्या पातळीवरही दहशतवाद विरोधी कक्षाला (एटीसी) बांगलादेशी नागरिकांविरोधात कारवाई करण्याची मोहीम हाती घ्यावी लागणार आहे.

भारताच्या भूसीमांची (लॅण्ड बॉर्डर्स) एकूण लांबी ठोकळमानाने १५,१०७ किलोमीटर असून समुद्रकिनारा ७,५१७ किलोमीटर आहे. त्यापैकी भूसीमेचे विभाजन बांगलादेश ४,०९७, चीन ३,४८८, पाकिस्तान ३,३२३, नेपाळ १,७५१, म्यानमार १,६४३, भूतान ६९९ आणि अफगाणिस्तान १०६ किलोमीटर असे आहे. भारत आणि बांगलादेश यातील ४०९७ किलोमीटर आंतरराष्ट्रीय सीमा जगातली पाचव्या क्रमांकाची लांब सीमा आहे. यापैकी आसामला लागून असलेली सीमा २६२, त्रिपुराला ८५६, मिझोरामला ३१८, मेघालयला ४४३ आणि पश्चिम बंगालला २२१७ किलोमीटर अशी आहे. एकूण ४,०९७ किलोमीटर सीमेपैकी ३,१४५ किमी सीमेवर कुंपण घालण्याचे काम पूर्ण झाले आहे. उरलेल्या सीमेवर प्रत्यक्ष (फिजिकल) आणि अप्रत्यक्ष (नॉन-फिजिकल) अडथळे उभारण्याचे काम सुरू आहे. भारत आणि बांगलादेश यातील सीमा अनेक ठिकाणी प्रवेशसुलभ (पोरस) असून त्यामुळे सीमेपलीकडून बेकायदेशीर कारवाया आणि घुसखोरी रोखण्यात बऱ्याच अडचणी येत असतात, या बाबीची नोंद उभयपक्षी घेण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षात जवळजवळ २,५०० बांगलादेशींनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे भारतात प्रवेश मिळविल्याची नोंद आहे. नोंद न झालेले अनेक असू शकतात. अशांचा भारतात शोध घेणे एक जिकिरीचे काम होऊन बसले आहे. घुसखोरांची चेहरेपट्टी भारतीयांशी मिळतीजुळती असते. ते सफाईने बंगाली भाषा बोलू शकतात. त्यांनी वाममार्गाने आधार कार्डही बनवून घेतलेले असते. असे निदान दोन कोटी बांगलादेशी आजमितीला भारतात राहात असतील, असा एक अंदाज आहे. यापैकी अनेक भारतविरोधी कारवाया करताना आढळले आहेत. कुंपण घालणे आणि प्रकाशझोत व्यवस्थेचे काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण व्हावयास पाहिजे होते, पण तसे होऊ शकले नाही. केवळ कुंपण घालून घुसखोरी थांबणार नाही. कुंपणाचेही काही नवीन प्रकार आता उपलब्ध झाले आहेत. यात तंत्रज्ञानावर आधारित देखरेख व्यवस्था योजलेली असते. सीमावर्ती भागात रस्त्यांचे जाळे तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. त्यामुळे सीमेजवळ वेगाने हालचाली करणे शक्य होते. अर्थात याचा उपयोग तस्करही करू शकतात, पण त्याला उपाय नसतो.

कुंपण घालतानाही अडचणी येतात. एक प्रमुख अडचण असते लहान लहान ओढे आणि ओहोळांची तसेच मध्येच एखादा खोलगट टप्पा येतो. कधी कधी सीमारेषेपासून १५० यार्डाच्या आत मनुष्यवस्ती असते. ती लोकं आपली जागा सोडायला तयार नसतात. भूमिअधिग्रहणाची प्रकरणे लवकर मार्गी लागत नाहीत. अशा सर्व अडचणी आणि अडथळे पार करीत ४,२२३ पैकी ३,७५१ किलोमीटर लांबीचे सीमेनजीकचे रस्ते बांधून तयार झाले आहेत. उरलेले मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होतील. प्रकाशझोत व्यवस्था पश्चिम बंगाल, मेघालय, आसाम, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यातून सीमेलगत केली जात असून ४,२२५ किलोमीटर पैकी ३,०७७ पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. बांगलादेशी नागरिकांची बनावट कागदपत्रे तयार करण्यामागे दोन उद्देश असतात. आपण भारतीय आहोत, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न असतो. दुसरे असे की, भारतीय नागरिक असल्याचा पुरावा त्यांना परदेशात नोकरी मिळविण्यासाठीही उपयोगी पडतो. पुढे यांच्यापैकीच काही लोक 'घुसखोरांना नागरिक बनवण्याचे काम' स्वतंत्रपणे करू लागतात. काहींचा तर हा व्यवसायच होऊन बसलेला आहे. बांगलादेशातून घुसखोरी करून भारतात येण्याचा हा व्यवसाय बहुतेक भारतातील मोठ्या शहरांमध्ये सुरू आहे. याला आज व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात कुणी बेकार राहात नाही. प्रत्येकाला काही ना काही काम मिळतेच. हा सर्व व्यवहार २५ ते ३० हजारात पूर्ण करता येतो. यापैकी एक रॅकेट मुंबई पोलिसांनी नुकतेच उजेडात आणले आहे. बांगलादेशी नागरिकांना घुसखोरीसाठी मदत करणाऱ्या टोळीचा दिल्ली पोलिसांनीही पर्दाफाश केला असून चार जणांना अटक केली आहे. या टोळीत दोन बांगलादेशी आणि (आपले दुर्दैव असे की) दोन भारतीय नागरिकांचाही समावेश आहे.

भारत आणि बांगलादेश या दोन देशांत जनावरांची ये-जा सुरू असते. यातला एक मार्ग गाढवांचा मार्ग म्हणून ओळखला जातो. एक टोळी बांगलादेशातील लोकांना गाढवाच्या मार्गाने भारतात येण्यास सांगत असे. यानंतर, दुसरा गट या लोकांना रात्रभर लपवून ठेवीत असे. नंतर तिसरा गट त्यांना आसामला घेऊन जायचा. पुढे त्यांना रेल्वेने किंवा इतर मार्गाने दिल्लीला पाठवत. दिल्लीच्या गर्दीत हे घुसखोर सहज मिसळून जात. खऱ्या शरणार्थींना भारताने आजवर उदार मनाने आश्रय दिला आहे. पण हे बांगलादेशी घुसखोर आहेत. त्यांच्यातल्या एकेकाला शोधून हद्दपार करण्याचे किचकट काम भारताला भविष्यात पार पाडायचे आहे.

९४२२८०४४३०

## वेध

पुंडलिक आंबटकर

# महाराष्ट्राला लाभली उज्ज्वल संतपरंपरा

महाराष्ट्राला उज्ज्वल अशी संतपरंपरा लाभली आहे. अध्यात्मासह समाजप्रबोधन हा संतपरंपरेचा मूलाधार राहिला आहे. संत ज्ञानेश्वर माउलीने या परंपरेचा पाया रचला आणि संत तुकोबारायांनी त्यावर कळस चढविला. महाराष्ट्रात संत नामदेव, रामदास स्वामी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, गजानन महाराज, साईबाबा, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा असे अनेक संत होऊन गेलेत. रामदास स्वामींनी गावोगावी हनुमानाची मंदिरे स्थापन करण्याचे आवाहन केल्यानेच आज प्रत्येक गावात किमान एक तरी हनुमानाचे मंदिर दिसून येते. १८०० ते २००० या दोन शतकांत भारतात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात हजारो संत-महात्मे होऊन गेलेत. संतांच्या याच मांदियाळीतील एक प्रमुख संत म्हणजे केजाजी महाराज होय. आयुष्यभर पंढरीची वारी करणाऱ्या या महान विठ्ठल भक्ताची पुण्यतिथी २९ व ३० जानेवारी रोजी साजरी होत आहे. विदर्भातील प्रतिपंढरी घोराड आणि केजाजी महाराजांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या तरोडा येथे केजाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

संतांचे आयुष्य साधेसुधे असले तरी काट्याकुट्यांनी भरलेले असते. संत ज्ञानेश्वर माउलीस लोकांनी खूप छळले. परंतु, त्यांचा निश्चय शेवटपर्यंत ढळला नाही. आयुष्यभर अपमान, उपहास आणि अवहेलना सहन करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी सृष्टीच्या कल्याणासाठी विधात्याकडे पसायदान मागितले. हीच खरी भारतीय संस्कृतीची ओळख आहे. अन्य संतांनीदेखील खूप हालअपेष्टा भोगल्या. अशाच हालअपेष्टा संत केजाजी महाराज यांच्याही वाट्याला आल्या. केजाजी महाराजांचा जन्म १८४३ साली नागपूर जिल्ह्यातील बेला येथे झाला. उदरनिर्वाहासाठी त्यांचे आईवडील बाल केजाजी यांच्यासह घोराड येथे आले. महाराजांचे वडील इतरांकडे चाकरी करायचे. त्यांच्या मदतीला महाराजसुद्धा अनेकदा जायचे. मात्र, त्यांना लहानपणापासूनच विठ्ठलाची ओढ होती. त्यामुळे कामात व्यस्त असतानाच महाराज विठ्ठलाच्या नामस्मरणात देहभान हरपून जायचे! महाराजांनी घोराड येथून दरवर्षी पंढरपूर पायदळ वारीचा पायंडा पाडला. जो आजतागायत सुरू आहे. संत केजाजी महाराज आणि संत गजानन महाराज एकाच काळात होऊन गेले. गजानन महाराजांनी घोराड नगरी गाठून केजाजी महाराजांची भेट घेतली होती. केजाजी महाराज एकदा असेच देहभान विसरून तरोडा या गावी आले. तरोडावासीयांनी या महापुरुषाची आत्मीयतेने विचारपूस करून आदरातिथ्य केले. तेव्हापासून ते नेहमी या गावात यायचे. मरणासन्न अवस्थेतील गाईचा प्राण वाचविण्यासाठी महाराजांनी विठ्ठलाकडे साकडे घातले होते. या गाईची समाधी आजही तरोडा येथे आहे. इतरांची चाकरी केजाजी महाराजांच्या भाळी ईश्वरानेच लिहिलेली होती. घोराड येथे ते चरितार्थासाठी सालगडी म्हणून काम करायचे. भाविकांच्या विश्वासानुसार केजाजी महाराज जेव्हा ईश्वर भक्तीत पूर्णतः लीन होऊन जायचे तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठलच त्यांच्यासाठी रानोवनी राबायचा! हा साक्षात्कार पाहिल्यानंतर घोराड येथील संबंधित जमीनदार केजाजी महाराजांना शरण गेला होता.



केजाजी महाराजांनी घोराड येथून सुरू केलेल्या पंढरपूर पायदळ वारीची परंपरा आजही कायम आहे. यवतमाळ जिल्ह्यातील नरेश महाराजांनी बबन महाराजांच्या नेतृत्वात २००४ पासून आळंदी येथून केजाजी महाराजांच्या नावे पंढरपूर दिंडीची प्रथा सुरू केली. कोरोना काळात या प्रथेत खंड पडला परंतु भाविकांनी घोराड या गावालाच पंढरपूर मानून केजाजी महाराजांच्या मंदिराला प्रदक्षिणा घालून नवा पायंडा पाडला. १९०७ मध्ये केजाजी महाराज पुत्र नामदेव आणि काही भक्तांना घेऊन प्रयाग येथे गेले आणि तिथेच मकरसंक्रांतीचे औचित्य साधून महाराजांनी देह ठेवला. केजाजी महाराज गेले. परंतु, या जगाला निष्काम कर्मयोग शिकवून! प्रयाग येथे केजाजी महाराजांची समाधी आहे. महाराजांनी घोराड येथे विठ्ठलाचे भव्य मंदिर बांधले. या घोराड नगरीवर आजही केजाजी महाराजांची मेहेरनजर असल्याचे गावकरी मोठ्या अभिमानाने सांगतात. केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवासोबतच येथे आषाढी, कार्तिकीला मोठी यात्रा भरते. केजाजी महाराजांची मंदिरे नागपूरसह अनेक ठिकाणी आहेत. अशा या निष्काम कर्मयोगी संताला पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी अभिवादन.

९८८१७१६०२७

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# अधिक काम की दर्जेदार काम?

सध्या देशातील काही दिग्गज कंपन्यांचे सीईओ-अध्यक्ष कंपनीतील कर्मचाऱ्यांनी साप्ताहिक ७० तास, ९० तास काम करावे, असे वायफळ सल्ले देत सुटलेले दिसतात. त्यामुळे पुन्हा एकदा अधिक काम की दर्जेदार काम, या चर्चेला तोंड फुटले आहे. त्यानिमित्ताने व्यवस्थापन आणि मानवी संसाधन क्षेत्राच्या दृष्टिकोनातून या विषयाचा ऊहापोह क्रमप्राप्त ठरावे. कामाचे वाढते तास व त्यापोटी येणारा वाढता ताण हे मुद्दे कर्मचाऱ्यांपासून कंपन्यांपर्यंत सर्वांसाठी कायमच जिव्हाळ्याचा विषय. वेगवेगळ्या संदर्भांसह या चर्चेचा मुख्य भर असतो, तो कामाच्या दर्जा आणि उत्पादकतेवर. मात्र, बरेचदा हेच दोन महत्त्वाचे मुद्दे तुलनेने दुर्लक्षित राहतात व त्यावरील चर्चा व त्याद्वारे उत्पन्न होणारा ताणतणाव मात्र वाढत जातो.

सर्वसाधारणपणे कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांचे काम, कामाचे तास व त्याचप्रमाणे कामाचा ताण यावरील चर्चेत दोन मुद्दे प्रकर्षाने पुढे येतात. यामध्ये बदलती व्यावसायिक स्थिती आणि गरजा यांची पूर्तता करण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापनापुढे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून अधिकाधिक काम करून घ्यावे लागते. यातील दुसरा मुद्दा असतो, तो मर्यादित संख्येतील कर्मचाऱ्यांना करावे लागणारे मोठ्या प्रमाणावर व अतिरिक्त काम. यातूनच समस्या निर्माण होते, ती कर्मचाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या वाढीव कामाच्या तासांची. कर्मचाऱ्यांच्या या सातत्याने कराव्या लागणाऱ्या वाढीव काम व कामाच्या तासांचे वाढीव कर्मचारीच नव्हे, तर त्यांचे सहकारी, अधिकारी, कुटुंबातील सदस्य इत्यादींवर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात निश्चितपणे परिणाम होतात. त्यामुळे अशा प्रश्नांची चर्चा समाजमाध्यमांसह समाजातील विविध स्तरांवर अपरिहार्यपणे होत असते. मध्यंतरीच्या काळातील एक प्रथितयश कंपनीतील उच्च शिक्षाप्राप्त कर्मचाऱ्याने कामाच्या ताणापोटी केलेली आत्महत्या विशेष व व्यापक सामाजिक चर्चेचा मुद्दा ठरला होता. यादृष्टीने व विशेषतः विविध मोठ्या व प्रथितयश कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांनी सद्यःस्थितीत व विविध स्वरूपांतील स्पर्धांवर मात करण्यासाठी प्रसंगी आठवडी ८० ते ९० तास करण्याच्या पृष्ठभूमीवर कर्मचाऱ्यांचे कामाचे तास किती आणि का म्हणून असावे, हा मुद्दा पुन्हा नव्याने चर्चेत आला आहे. त्यादृष्टीने खालील मुद्द्यांवर त्यामुळेच तातडीने विचार व चर्चा करणे गरजेचे ठरते.

**कामाची पद्धत व कार्यसंस्कृती** : कंपनी वा संस्थेअंतर्गत कामकाज व काम करण्याची विशिष्ट पद्धत असते. कंपनीचा व्यवसाय, कामकाजाच्या संदर्भातील प्राधान्य, प्रगत स्वरूपाचे काम करण्यावर दिला जाणारा भर, उपलब्ध तंत्रज्ञान, विविध साधने व उपलब्ध कर्मचारी व संसाधने यांचा यात समावेश असतो.



वर नमूद केलेल्या साधन-संसाधनांद्वारेच कंपनीचा व्यवसाय व कामकाज होत असते. या साधन-तंत्रज्ञान प्रक्रिया, कामकाजाची पद्धती व ते सारे पद्धतशीरपणे व विशिष्ट पद्धतीने व यशस्वीपणे करण्यासाठी जी पद्धत वापरली जाते, त्याला संबंधित व्यवसाय-कंपनीची कार्यपद्धत समजली जाते. या कार्यपद्धती म्हणजेच कामकाज पद्धतीमध्ये कर्मचारी, त्यांचे कामकाज, कामाच्या संदर्भातील त्यांचे कामाचे तास व त्यासाठी त्यांना मिळणारी साधने इत्यादींचा प्रामुख्याने समावेश असतो.

**कामाचे स्वरूप व कामाचे तास** : बदलती परिस्थिती व वाढती स्पर्धा यामुळे विशिष्ट पद्धतीने वा विशेष प्रकारचे काम करणाऱ्यांची कामाचे तास व कामाची तयारी या दोन्हींमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जबाबदारीसह करावयाच्या कामामध्ये प्रामुख्याने वरिष्ट पातळीवर काम करणारे व्यवस्थापक, अकाऊंटंट, वकील, डॉक्टर्स, प्रकल्प व्यवस्थापक, बँका-वित्तीय संस्थांमधील अथवा गुंतवणूक कंपन्यांमधील उच्चपदस्थ व मुख्य म्हणजे मध्यम व लघु उद्योजकांचा समावेश करता येईल.

वर नमूद केलेले उद्योग-व्यवसाय व कामकाज यामध्ये काम करणाऱ्याच्या कामकाजाचे व विशिष्ट स्थिती वा परिस्थितीमध्ये काम करणाऱ्यांना अमर्याद स्वरूपात व अथकपणे काम करावे लागते. व्यवसायाची वर्षअखेर निश्चित कालावधीतील व्यवस्थापन, ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा, व्यावसायिक गरजा इत्यादींची पूर्तता करण्यासाठी प्रसंगी प्रदीर्घ तास वा प्रदीर्घ काळ काम करण्याला पर्याय नसतो. मात्र, प्रश्न व समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा अधिकांश कर्मचाऱ्यांना सरसकटपणे व सातत्याने प्रदीर्घ काळ काम करावे लागते. यातून असे वा अशा प्रकारे वाढीव तासांसह काम करण्याची पद्धत व वृत्ती बनू शकते व असे कायमस्वरूपी झाल्यास कर्मचाऱ्यांच्या उद्विग्न होण्यापासून काहीही होऊ शकते, याचा अनुभव नुकताच आपल्या कॉर्पोरेट क्षेत्राने घेतला आहे.

**उत्पादन की उत्पादकता** : उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात नेहमीच महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे व्यवसायवाढ. उद्योग-व्यवसायाच्या वाढीसाठी व्यवसाय उद्योग असो वा सेवा त्यामध्ये कर्मचारी हा महत्त्वाचा व आवश्यक असा घटक असतोच. याच भूमिकेतून कर्मचाऱ्यांकडे पाहण्याची गरज असते. असा विचार जे व्यवस्थापन करते, त्यांचा व्यवसाय कायमस्वरूपी फायदेशीर ठरू शकतो.

**कामासाठी कर्मचारी की कामाचे कर्मचारी** : बरेचदा कंपनीच्या उच्च पातळीवर व वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर कर्मचारी आणि त्यांचे कामकाज याचा योग्य प्रकारे विचार होत नाही. याची पृष्ठभूमी कर्मचाऱ्यांच्या निवडीपासून कंपनीतील वरिष्ठ व व्यवस्थापनाच्या कर्मचारी आणि त्यांच्या कामाच्या संदर्भातील धोरणात्मक निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीपर्यंत विविध टप्प्यांमध्ये अनुभवास येते. याचाच परिणाम म्हणून उपलब्ध कर्मचाऱ्यांपैकी काही व मर्यादित कर्मचारी-अधिकारी यांच्यावर स्वाभाविकच कामाचा अधिक ताण पडतो. कामाचा हा ताण व अति ताणतणावासह काम करणे, ही बाब नेहमीची बनून संबंधित ठिकाणी तीच कामकाज पद्धत म्हणजेच कार्यसंस्कृती बनते. त्यादृष्टीने व्यवस्थापक व व्यवस्थापन या उभयतांनी कंपनीच्या कामकाजाच्या दृष्टीने सरसकट कर्मचारी नव्हे, तर कुशल व उत्पादक काम करणारे कर्मचारी कंपनीचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो, ही बाब लक्षात घेणे नितांत गरजेचे ठरते.

**तोडगा की तडजोड** : त्यामुळेच वाढत्या कामाच्या संदर्भातील चर्चा-सूचना विविध संदर्भात येतात व त्यावर विविध दृष्टिकोनातून चर्चा होते. वेगवेगळे दृष्टिकोन मांडले जातात. मात्र, त्यावर तोडगा असा निघू शकत नाही. यातून आपापल्या प्रकारे तडजोड करून कर्मचारी-कंपन्या आणि त्यांचे कामकाज चालू ठेवण्याची तडजोड साधली जाते, हे वास्तव आहे. त्यामुळे मूळ प्रश्नावर विचार करून संबंधित उद्योग-व्यवसायासाठी गरजेची पूर्तता करण्यासाठी कर्मचारी त्यांचे कामकाज व कामाचे तास यांची निश्चिती गरजेची ठरते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### परीक्षेविना शिक्षण संकल्पना चुकीची

'परीक्षा समजा नसल्याच तर असे काय बिघडणार आहे?' या डॉ. विजय पांढरीपांडे यांनी आपल्या लेखात परीक्षेचे स्वरूप, परीक्षा यंत्रणा, विद्यार्थ्यांची मानसिकता आणि परीक्षेची निरर्थकता यावर भाष्य केले आहे. परीक्षेत होणारे गैरप्रकार, परीक्षेचा अनाठायी खर्च यावर सडेतोड भाष्य करताना त्यांनी परीक्षा घेण्यापेक्षा सदरील विद्यार्थ्याने या कालावधीत अभ्यासक्रमाचे अध्ययन केले म्हणून प्रमाणपत्र देण्याचे सुचवले आहे. परीक्षा न घेण्याचा सल्ला देताना त्यांनी हा प्रयोग करून बघायला काय हरकत आहे? असा सल्ला दिला आहे. खरे तर पहिली ते आठवी इयत्तेच्या जेव्हा परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले तेच मुळात चुकीचे व धोकादायक ठरले आहे. आता यापुढे कोणत्याही परीक्षा होणार नाहीत असे विद्यार्थ्यांना सांगितले की, विद्यार्थी अध्ययन करणार नाहीत, अभ्यास करणार नाहीत. शिक्षण म्हणजे केवळ वर्गात जाऊन बसणे, खेळणे, मौजमजा करणे अशी मानसिकता वाढीस लागेल. परीक्षेविना शिक्षण कुचकामी होणार आहे. परीक्षेमुळे बहुतांश विद्यार्थी शिक्षण प्रवाहात टिकून आहेत. परीक्षाच नाही तर विद्यार्थी उनाड होतील, शिक्षणाला क्षुल्लक समजले जाईल. परीक्षेविना शिक्षण आणले तर शिक्षकांविना शिक्षण यायला वेळ लागणार नाही. अशा शिक्षणामुळे विद्यार्थी यंत्रांसारखे निर्जीव होतील, त्यांच्याकडे कोणत्याही भावना उरणार नाहीत. परीक्षेविना शिक्षण ही संकल्पना चुकीची ठरणार आहे. परीक्षा झाल्याच पाहिजेत. परीक्षा घेणारी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्याची खरी गरज संस्कार व नीतिमूल्ये शिकवण्याची नितांत गरज आहे; ज्यामुळे परीक्षेत गैरप्रकार होणार नाहीत. आणि म्हणून, काही जुजबी कारणांसाठी परीक्षेविना शिक्षण हे कुचकामी ठरणार आहे.

**बबन गुळवे**/९५४५४४२६४८

### ईपीएफ पेन्शनधारकांची सद्यःस्थिती

ईपीएफ पेन्शनधारकांच्या पगारातून कपात केलेल्या रकमेतून निवृत्तांना पेन्शन मिळते. अनेकदा आंदोलने करूनही त्यांत वाढ नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार योग्य कार्यवाही करून पेन्शन वाढविली जात नाही. टोलवाटोलवी सुरू आहे. पेन्शनधारकांना मिळणारी पेन्शन तुलनेने तुटपुंजी आहे. वाढती महागाई आणि जीवनशैली खर्च पाहता ही पेन्शन त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अपुरी पडते. कमी पेन्शनमुळे अनेकांचे जीवनमान खालावले आहे. दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठीही कधी कधी संघर्ष करावा लागतो. निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षा ही प्रत्येक व्यक्तीची अपेक्षा असते. मात्र, तुटपुंज्या पेन्शनमुळे अनेकांना ही सुरक्षा मिळत नाही. वैद्यकीय खर्च, दैनंदिन गरजा, घरखर्च इत्यादीसाठी पैसे पुरवणे कठीण होऊन बसते. आर्थिक अडचणींमुळे अनेक पेन्शनधारकांना मानसिक ताण येतो. पेन्शनची रक्कम वाढवून ती महागाईच्या प्रमाणात असावी. योजनेत सुधारणा, ईपीएफ पेन्शन योजनेत काही सुधारणा करून पेन्शनधारकांना अधिक लाभ मिळू शकतो. सरकारचा पाठिंबा, सरकारने पेन्शनधारकांच्या समस्यांकडे लक्ष देऊन त्यांच्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मायबाप सरकारला नम्र विनंती आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### सर्व सरकारी योजनांचा लाभ गरजूंनाच मिळावा

विधानसभा निवडणुकीत महायुतीला एकहाती सत्ता मिळण्यासाठी मतदार आकर्षित व्हावेत म्हणून सरकार पक्षाने विविध योजना आणल्या. लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक योजना. यापूर्वी मध्यप्रदेश शासनाने 'लाडली बहीण' नावाने ही योजना सुरू केली होती. याचाच परिणाम म्हणून विधानसभा निवडणुकीत भाजपाने घवघवीत यश मिळवीत शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या आश्वासनावर विश्वास ठेवत भरभरून मते देत महायुतीला परत सत्तेवर बसवले. आज महाराष्ट्रातच काय संपूर्ण देशात, राज्यात निवडणूक आली की, मतदारांना फुकट देण्यासाठी सर्व राजकीय पक्षांची चढाओढ लागलेली दिसते. खरे पाहिले असता सरकारच्या या फुकट धोरणाचा सर्वांनीच विरोध करायला हवा. ज्या कुटुंबाला जशी गरज आहे ती मदत केली तर त्याला कोणाचकडून विरोध होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही तसेच कुठलीही मदत देण्यासाठी त्याचे काही निकषही ठरवायला हवे. सरकारने तरुण असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ती मग महिला असो वा पुरुष, यांना मदत करायची असेल तर त्यांचेकडून त्या बदल्यात काम करून घेतले पाहिजे. तरच सरकारी लाभ घेता येईल हा नियम असायला हवा. फुकट काही देणे योग्य नाही. सरकारच्या जनहितार्थ अनेक योजना अशा आहेत की, ज्यांची माहिती सर्वसामान्यांना माहीत नाही. त्यांचेपर्यंत पोहोचत नाही असे म्हणण्यापेक्षा पोहोचविल्याच जात नाही, असाही अनुभव आहे. अशा योजनांची माहिती समाजातील विविध घटकांतील व्यक्तींपर्यंत पोहोचवून त्या योजनांचा कसा लाभ मिळेल, अशी व्यवस्था लाभगृहीत व्यक्तींकडून करायला हवी. तरच खऱ्या अर्थाने त्याचा फायदा समाजातील विविध घटकांना मिळेल.

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# गड्ड्यावर महिलेचे ४० हजारांचे गंठण लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

श्री सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त होम मैदान येथे भरलेल्या गड्डा यात्रेत महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण एका मुलीने चोरून नेले. याबाबत पुष्पा विजय रजपूत (वय ३८, रा. नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुष्पा रजपूत या २६ जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास होम मैदान येथील गड्डा यात्रेत सहपरिवार गेल्या होत्या. त्यावेळी मुलगी ऋषिका हीला नेकलेस घेण्याकरीता नेकलेसच्या दुकानात थांबल्या असता एका अनोळखी मुलीने पुष्पा रजपूत यांच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे सोन्याचे गंठण लबाडीने चोरून नेले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

# कुमठा नाका व बापूजी नगर येथे हाणामारी

## आठ जणांविरुध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

शहरातील कुमठ नाका येथील संजय नगरात व बापूजी नगरात झालेल्या हाणामारीप्रकरणी आठजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

याबाबत जयसिंग शिवशिंगवाले (वय ५५, रा. पत्की कारखाना, संजय नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सागर फटफटवाले, विठोबा फटफटवाले, नितीन बाबावाले, राज फटफटवाले (रा. सोलापूर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर राजू गुलजार फटफटवाले (वय २१, रा. बापूजी नगर, स्लॉटर



हाऊस, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन जयसिंग शिवशिंगवाले, महेश शिवशिंगवाले, संतोष शिवशिंगवाले, ज्योती धोत्रेवाले (रा. बापूजी नगर, स्लॉटर हॉऊस, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ जानेवारी रोजी दुपारी संजय नगर येथे जयसिंग शिवशिंगवाले यांची दोन मुले व सुना यांच्यात झालेल्या भांडणाचा जाब विचारण्यासाठी जयसिंग हे गेले असता राग मनात धरून सागर फटफटवाले याने लोखंडी रॉडने जयसिंग यांना डोक्यात मारून जखमी केले तर इतरांनी लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक केंद्रे पुढील तपास करीत आहेत. २५ जानेवारी रोजी दुपारी राजू फटफटवाले व त्याचा भाऊ घरी असताना जयसिंग शिवशिंगवाले व इतरांनी घरगुती व लहान मुलांच्या कारणावरून शिवीगाळ करून भांडण केले. त्यावेळी भांडण करू नका असे सांगत असताना शिवशिंगवाले यांनी लाथाबुक्क्यो मारहाण करून चैनने मारहाण केली. यामध्ये राजू व त्याचा भाऊ जखमी झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार जमादार पुढील तपास करीत आहेत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

**सोलापूर -** केगाव ते हत्तुर बायपास रोडवरील बंजारा हॉटेलच्याजवळील तलावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. रमजान साहेबलाल शेख (वय ५३, रा. बसवेश्वर नगर, देशमुख वस्ती, देगाव, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २६ जानेवारी रोजी रात्री हॉटेल बंजाराच्या पुढील बाजूस असलेल्या तलावाजवळील ब्रिजजवळ रमजान शेख हे दुचाकीवरून जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. तुषार मेढे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

## जाहीर नोटीस

बार्शी वृ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये रिक्त झालेल्या एक जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून सौ. एस.के. मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक : २९/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक १२:३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**सही/-**
**(सौ. एस.के. मुंढे)**
**अध्यासी अधिकारी तथा सहकारी श्रेणी-२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. बार्शी**

# तरूणाचा गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** शहरातील अशोक चौक परिसरात एका तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. रियाज गौस अहमद हरकारे (वय ३५, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. २६ जानेवारी रोजी सायंकाळी अशोक चौकातील ताज मेडीकलच्या पाठीमागे असलेल्या राहत्या घरी अज्ञात कारणावरून रियाजने याने ओढणीच्या सहाय्याने लोखंडी अँगलला गळफास घेतला. ही बाब लक्षात आल्यानंतर नातेवाईकांनी रियाज यास खाली उतरवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# खुन्नसने बघण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर :** खुन्नसने बघण्याच्या कारणावरून तरूणास फायटरने मारहाण करण्यात आली. राज शंकर बालाजीवाले (वय २३, रा. उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. राज बालाजीवाले हा २५ जानेवारी रेजी बेडरपूल येथिल अंबाबाई मंदीराजवळ थांबला असता खुन्नसने का बघतो असे म्हणून अल्ली मौलावाले व इतर चौघांनी मिळून फायटरने व धारदार वस्तूने मारहाण केली. त्यामध्ये राज हा जखमी झाल्याने त्यास उपचारासाइी मित्र रोहित मैनावाले याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २४०/१ यासी नविन सर्व्हे नं.३५/१ यापैकी करली नगर मधील प्लॉट नं. २३६ बी याचे क्षेत्र ७४.३४ चौ. मीटर अथवा ८०० चौ. फुट इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस - प्लॉट नं. २३७ बी, दक्षिणेस - प्लॉट नं.२३६ ए, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस : रस्ता. येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह,

ही प्लॉट जागा श्री. शंकर मुत्तय्या कनकुंटला, रा. न्यु सुनिल नगर, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास नोटरी कब्जेपावतीने खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि.२७/०१/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील जुना सव्र्हे नं. २४०/१ यासी नविन सर्व्हे नं.३५/१ यापैकी करली नगर मधील प्लॉट नं. २३७/१ यासी मिळकत नं. ६८४४०४ याचे क्षेत्र ७४.३४ चौ. मीटर अथवा ८०० चौ. फुट इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. २३७ ए, पश्चिमेस : प्लॉट नं. २३६ बी, उत्तरेस : रस्ता येणेप्रमाणे चतुःसीमेतील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह, ही प्लॉट जागा श्री. श्रीधर विजय म्हैसुर, रा.२२, एस के बोळकोटे नगर, मजरेवाडी, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास नोटरी कब्जे पावतीने खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि.२७/०१/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

## जाहीर प्रकटन

### क प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम

क प्रवर्गातील खालील संस्थांचा सन २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठीचा निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रमातील महत्त्वाचे टप्पे**

| अ. क्र. | संस्थेचे नांव | निवडणूक निर्णय अधिकारी | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती | नामनिर्देशन पत्राची छाननी | वैध नामनिर्देशन पत्राची प्रसिध्दीची तारीख | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतीम तारीख | आवश्यक असल्यास मतदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीआई महिला सहकारी ग्राहक संस्था मर्या. हबिसेवाडी नराळे | **अ. अ. शेख,** सह. अधि. श्रेणी-२ | दि. २८/०१/२०२५ ते दि.०३/०२/२०२५ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि.०४/०२/२०२५ सकाळी ११.०० ते दु.०१.०० व | दि.०५/०२/२०२५ दु.०५.०० वा. | दि. ०५/०२/२०२५ ते दि.२०/०२/२०२५ स. ११.०० वा. ते दु. ३.०० वा. | दि.२६/०२/२०२५ सकाळी ०८.०० ते दु.०४.०० |
| २ | कल्पतरु अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. घेरडी | **ए. डी. गोसावी,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| ३ | विठाई अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. देवळे | **व्ही. एच. घोडके,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| ४ | यशराजे ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. जवळे | **ए. एस. पुजारी,** सह. अधि. श्रेणी-१ | | | | | |
| ५ | गणेश ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. चोपडी | **अ. अ. शेख,** सह. अधि. श्रेणी-२ | | दि.०४/०२/२०२५ सकाळी ०१.०० ते दु.०३.०० व | | | दि.०१/०३/२०२५ सकाळी ०८.०० ते दु.०४.०० |
| ६ | शारदादेवी महिला ग्राहक सहकारी संस्था मर्या. वाढेगांव | **ए. डी. गोसावी,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| ७ | चौंडेश्वरी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. सांगोला | **व्ही. एच. घोडके,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| ८ | सांगोला विद्यामंदीर व ज्यु. कॉलेज सेवक सह. पतसंस्था मर्या. सांगोला | **ए. एस. पुजारी,** सह. अधि. श्रेणी-१ | | | | | |
| ९ | मायाक्कादेवी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. अनकढाळ | **अ. अ. शेख,** सह. अधि. श्रेणी-२ | | दि.०४/०२/२०२५ सकाळी ०३.०० ते दु.०५.०० व | | | दि.०२/०३/२०२५ सकाळी ०८.०० ते दु.०४.०० |
| १० | मुक्ताई अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. शिवणे | **ए. डी. गोसावी,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| ११ | अहिल्या अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.जुनोनी | **व्ही. एच. घोडके,** सहा. सहा. अधि. | | | | | |
| १२ | आराधना महिला अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | **ए. एस. पुजारी,** सह. अधि. श्रेणी-१ | | | | | |

**टिप :- सदर कार्यक्रम सुट्यांचे दिवस वगळून आहे.**

संस्थांचा सविस्तर निवडणुक कार्यक्रम व प्रारुप मतदार यादी त्या त्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर, संबंधित संस्थेचे निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी संबंधित संस्थांचे सभासदांनी सभासद यादी, सविस्तर निवडणुक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**स्थळ : सांगोला**
**दिनांक : २८/०१/२०२५**

शिक्का

**सही/-**
**(प्रकाश रा. नालवार)**
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
तालुका सांगोला, जि. सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट नं.५३१ यापैकी कोंडा नगर म्हणून ओळखले जाणारे यापैकी प्लॉट नं.९६ याचे क्षेत्र ४८० चौ. मीटर अथवा ५१६७ चौ. फुट इतके आहे, याचे हद्द पुर्व पश्चिम १६ मी. व दक्षिणोत्तर ३० मीटर अशी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस - प्लॉट नं. ९४,९५, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. ९७ व ९८, उत्तरेस - प्लॉट नं. १००. येणेप्रमाणे चतुः सीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

सौ. रेणुका रामलु सिंगम, रा.३३/१/बी/१, गीता नगर, न्यु पाच्छापेठ, सोलापूर यांचे मालकीचो असून त्यांनी ही प्लॉट जागा आमचे अशिलास खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती करारनामा लिहून दिला आहे. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. २७/०१/२०२५

**सही/-**
**अशिल :**
**१. सौ. अर्चना नितिन अंटद**
**२. श्री. नितीन मल्लिनाथ अंटद यांचे तर्फे**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे-वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर येथील जनतेस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, डि. व सब डि. सोलापूर ता. बार्शी, मौजे-वैराग नगरपंचायत हद्दीतील घर जागा मिळकत त्याचा सिटी सर्व्हे नंबर १९७३ याचे संपूर्ण क्षेत्रफळ २४.८० चौ.मी. व सिटी सर्व्हे नं. १९७४ याचे संपूर्ण क्षेत्रफळ १०८.८० चौ.मी. या दोन्ही मिळकतीचा नगरपंचायत मिळकत नंबर ८२२ यांसी चतुः सिमा पूर्वेस-गणेश जंगले यांची जागा, दक्षिणेस-शंकर कदम यांची जागा, पश्चिमेस ग्रा.पं. रस्ता, उत्तरेस सतिश शिंदे यांची जागा, तसेच वरील नमुद मिळकतीतील झाड झुडूप दगड माती इ. तदंगभूत वस्तुसह. सदर नमुद मिळकती हया श्री. भैरु किसन मानकुसकर यांचे मालकीच्या व कब्जे वाहीवाटीच्या असून त्यांनी आमचे आशिलास खूशखरेदी देण्याचे मान्य व कबूल करुन सदर मिळकती हया निर्वेध व निजोखमी असल्याची हमी दिली आहे. आमचे अशिलाने त्यांचेबरोबर खरेदीचा तोंडी व्यवहार केला असून इसारा रक्कमही दिलेली आहे. सबब या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, इसारपावती या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा व हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाालेपासून ८ दिवसाचे आत खालील नमूद पत्यावर लेखी कागदोपत्री पुरख्यानीशी वैध हरकती नोंदवावीत मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदर मिळकती या संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे आशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद या जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. ता. २७/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. मेघराज महेश आडके**
**१००८ 'सत्यम' निवास,**
**वाणे गल्ली, सुभाष चौक वैराग,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं.९४०३८५००२५**

## जाहीर समन्स

स्पे. मु. नं. ५१/२०२२
नि. २८

### सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ-स्तर (श्रीमती एम.के. कोटुळे सो) यांचे कोर्टात

**कृष्णहरी विठ्ठल वडनाल** - **वादी**
विरुध्द
**मे.आर.एन. गोली डेव्हलपर्स, वगैरे** - **प्रतिवादी**

प्रति,
**प्रतिवादी क्र.३ रोहिणी बालाजी गोली**
वय- ४९ वर्षे, धंदा- व्यापार,
रा. ११५७/५८, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर
आणि
रा. ब्लॉक/फ्लॅट क्र.२४०३, बिल्डींग क्र. ८,
ब्लु रिज टाऊनशिप, हिंजेवाडी, पुणे-४११०५७

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द रक्कम वसुलीसाठी दावा दाखल केला आहे. त्यात तुम्ही प्रतिवादी क्र.३ आहे व तुमचे विरुध्द वादीनी दाद मागितली आहे.

त्याअर्थी, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात अथवा ता. २४/०२/२०२५ रोजी अथवा तत्पूर्वी या मे. कोर्टात येऊन तुमचे लेखी म्हणणे कागदपत्रांसह व पुराव्यासह स्वतः अथवा तुमचे वकिलामार्फत सादर करावेत. मुदतीत कोणाचाही हरकत न आल्यास मे. कोर्ट पुढील योग्य तो आदेश करेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७ माहे जानेवारी इसवी सन २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

**सही/-**
**क.लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्या. व. स्तर, सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः बार्शी ता. बार्शी व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापुर सब डि व ता. बार्शीपैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील विभाग क्र ४६ मधील मा. मुख्याधिकारी साहेब बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचेकडुन गुंठेवारी नियमाधिन परवाना क्र. ५५२९ जावक्र. स्थापत्य/५२० दि. ०४/०६/२०११ अन्वये गुंठेवारी झालेली मांगडे चाळीतील मिळकत याचा तपशिल जुना गट नं. २२० याचा नविन गट नं. २१७ याचे गुंठेवारी प्रमाणे क्षेत्र १२७.९७ चौमी अशी जागा याची मोजमापे पुर्वबाजु- १७.८६ मी. दक्षिणबाजु ७.१६ मी. पश्चिमबाजु १७.८६ मी. उत्तरबाजु ७.१६ मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस- मल्लीकार्जुन आरसे यांची मिळकत, दक्षिणेस गट नं. २१९, पश्चिमेस चोबे यांची मिळकत, व उत्तरेस ६ मी. रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमा पूर्वक जागा याचे वागणुक व पाणी उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे. यातील तदंगभुत वस्तुंसह व वहिवाटीचे हक्कांसह.

वरील वर्णन केलेली मिळकत ही श्री. प्रसाद राजेंद्र पाटील यांचे खरेदी मालकीची असुन, प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असुन सदर मिळकतीच्या हक्कपत्रकी त्यांचे नावे असुन त्यांनी सदर मिळकत ही त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुश खरेदी देण्याचा ठराव करुन इसारा दाखल रोख रक्कम घेतली आहे व सदर जागा खरेदी देण्याचा व्यवहार ठरलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

याहिऊपर सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, बटईपत्र, पोटगी, चोळी बांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमुद पत्त्यावर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासुन ८ (आठ) दिवसांचे आत लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमुद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची असल्याची प्रामाणिकपणे गृहित धरुन खरेदी देणार यांचेबरोबर ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २७/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रकाश एस. साखरे**
**२४८४, आडवा रस्ता, बार्शी.**
**मो.९०२८४६८५०७**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www. truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाले प्लाझा, डफरिनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१

### परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा भौतिक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात** )सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमूद केलेले कर्जदार व जामीनदारांकडून ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात ) यांना देय असलेली खाली तक्त्यात नमूद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि ०४.०३.२०२५ सकाळी ११.३० ते दुपारी १२.३०** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार ,ताबा प्रकार , आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढीव मूल्याचे तपशील खालीलप्रमाणे :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | तारीख व रक्कम १३ (२) डिमांड सूचनेनुसार | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | अनामत राशी ठेवींचा (ईएमडी ) तपशील | लिलावाची तारीख व वेळ | व्यक्तींचे संपर्क आणि सर्वेक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१. श्री. लिसनुल हक अब्दुल सत्तार बेलीफ (कर्जदार),<br>२. श्री. उमरा लिसानुल हक बेलिफ (सह-कर्जदार),<br>निवासाचा पत्ता : प्लॉट क्रमांक१४, पहिला मजला, बिलाल नगर, एस. बी. हाईटच्या मागे, कल्याण नगर, मीरा फ्लोअर मिल जवळ, सोलापूर, उत्तर, जिल्हा सोलापूर –४१३००३<br>आणि येथे देखील: फ्लॅट क्र ७०२, ७वा मजला, अलाव्वाल उंची, प्लॉट क्र १०८, माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉल जवळ, होतीगी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४<br>लॅन: SHLHSOLR0000410**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**०८-०१-२०२५ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: ११.०३.२०२४<br>दिनांक ०७/०३/२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000410 अंतर्गत रु. २९,७०,३७१/-(रुपये एकोणतीस लाख सत्तर हजार तीनशे एकहत्तर फक्त) सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत कराराच्या दराने पुढील व्याजासह. | रु. २४,६४,०००/- (चोवीस लाख चौसष्ट हजार फक्त)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २,४६,४००/- (रुपये दोन लाख छेचाळीस हजार चारशे फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : ३ मार्च २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायं ०५.०० वा.** | ईएमडी रक्कम खाली नमूद केलेल्या खात्याच्या तपशिलानुसार आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात जमा करावी:<br>**बँकेचे नाव-** ॲक्सिस बँक लिमिटेड<br>**शाखा:** वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई<br>**बँक खाते क्रमांक-** चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३<br>**आयएफएससी कोड-** यूटीआयबी ०000२३० | **०४ मार्च २०२५<br>वेळ. सकाळी ११.३० ते दुपारी १२.३०** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७.<br>योगेश पवार ७७९८७२२९९९<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६<br>निरीक्षण तारीख: ०१.०२.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्रमांक ७०२, मनमोहक क्षेत्रफळ ५२.९२ चौ. मीटर (बांधलेले),७ व्या मजल्यावर,"अलावल हाइट्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत,प्लॉट क्रमांक १०८,नवीन सर्वे क्रमांक ११/१बी/२ए/२बी पैकी (जुना सर्वे क्रमांक २८१/१बी/२ए/२बी) च्या जमिनीवर बांधलेले,माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉलजवळ, होतागी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४, येथे स्थित आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध. उत्तर:प्लॉट क्रमांक१०७,दक्षिण: प्लॉट क्रमांक १०९,पूर्व: फ्लॅट क्रमांक ७०१, पश्चिम: रस्त्याने आणि समोरील मार्जिनने

**विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, बोली फॉर्म आणि इतर माहितीसाठी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.ऑनलाइन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी १ इंडिया प्राइवेट लिमिटेडच्या https://www.bankeauctions.com या वेबसाईट वर पाडला जाईल .पत्ता : प्लॉट न. ६८ , ३ रा मजला, सेक्टर ४४ , गुरुग्राम,हरियाणा -१२२००३ कोणत्याही सहाय्यसाठी तुम्ही , tn@c1india.com, support@bankeauctions.com. या ई-मेल आय डी वर ई-मेल पाठवू शकता . दूरध्वनी:+९१-१२४-४३०२०२०फॅक्स:+९१-१२४-४३०२०१०. www.c1india.com**
**कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत बोलीदाराने वरील तक्त्यात नमूद केलेल्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.**
**· टीप: कृपया लक्षात ठेवा की सुरक्षित धनको सर्व कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना विक्रीची सूचना जलद/नोंदणीकृत पोस्टाने जारी करणार आहे. जर कोणत्याही पक्षाला ती प्राप्त झाली नाही, तर विक्री सूचना प्रकाशन ही सेवा पर्यायी पद्धत म्हणून मानली जाऊ शकते.**
**सरफेसी कायदा , २००२ च्या नियम ८ (६) अन्वये वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना.**
**· कर्जदार/गहाणखतदार/जामीनदारांना ई-लिलावाच्या तारखेपूर्वी, म्हणजेच ०४.०३.२०२५ पर्यंतच्या व्याज आणि पूरक खर्चासह वर नमूद केलेली रक्कम भरण्यास सूचित केले जाते, असे न केल्यास मालमत्तेचा लिलाव/विक्री केली जाईल आणि उर्वरित देणी, जर असतील तर, व्याज आणि खर्चासह वसूल केली जातील.**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २८-०१-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

## महत्त्वाचे

### केएल राहुलची कर्नाटक रणजी संघात निवड

**बंगळुरू** : आगामी ३० जानेवारीपासून सुरू होणाऱ्या रणजी करंडक एलिट गट कमध्ये हरयाणाविरुद्धच्या शेवटच्या साखळी सामन्यासाठी सोमवारी भारताचा अनुभवी फलंदाज केएल राहुल याची कर्नाटक संघात निवड करण्यात आली.



गुणतालिकेत हरयाणा अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर कोपराच्या दुखापतीतून बरा होत असलेला यष्टिरक्षक-फलंदाज राहुलला बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने खेळण्याची परवानगी दिली आहे. वृत्तसंस्तेने २१ जानेवारी रोजी वृत्त दिले होते की, राहुल कर्नाटककडून शेवटच्या साखळी सामन्यात खेळेल. हा त्याचा २०२० मध्ये कोलकाता येथे बंगालविरुद्ध खेळल्यानंतरचा पहिलाच रणजी रणजी सामना असेल.राहुल पंजाबविरुद्धच्या सामन्यातून बाहेर पडला होता व हा सामना कर्नाटकने एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर एक डाव आणि २०७ धावांनी जिंकला. राहुल मंगळवारपासून कर्नाटक संघासोबत सराव करण्याची अपेक्षा आहे. संघाचे नेतृत्व सलामीवीर मयंक अग्रवाल करणार आहे. कर्नाटकला बाद फेरीच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी येथे विजय, शक्यतो बोनस गुणासह अनिवार्य आहे.

### खेळाडूंच्या सुरक्षेसाठी हेल्पलाईन सुरू

**देहरादून** : आगामी २९ जानेवारी ते १२ फेब्रुवारी दरम्यान येथे होणाऱ्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांदरम्यान गैरवर्तन व इतर प्रकारच्या परस्पर हिंसाचार रोखण्यासाठी, आयओए आणि स्पर्धेच्या आयोजन समितीने सोमवारी खेळाडू आणि प्रशिक्षकांच्या सुरक्षिततेला आणि कल्याणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक हेल्पलाइन स्थापन केली. भारतीय ऑलिम्पिक संघटना आणि राष्ट्रीय खेळ खेळ आयोजन समितीने सुरक्षितता आणि कल्याणाला प्रोत्साहन, तसेच उत्तराखंड राष्ट्रीय खेळ २०२५ दरम्यान प्रतिकूल घटना टाळण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी लक्ष केंद्रित केलेल्या उपक्रमाचा भाग म्हणून एक सेफगार्डिंग टेलिफोन हेल्पलाइन स्थापन केली आहे. ही हेल्पलाइन खेळाडू, प्रशिक्षक आणि अधिकाऱ्यांसाठी चोवीस तास उपलब्ध असेल. एक सेफगार्डिंग कमिटी देखील स्थापन केली असून ही कमिटी कोणत्याही तक्रारींची चौकशी करण्यासाठी काम करेल, असे आयओए अध्यक्ष पीटी उषा म्हणाल्या.

### अजमतुल्लाह उमरझाई आयसीसीचा सर्वोत्तम वन-डे क्रिकेटपटू

**दुबई** : आपल्या गतिमान वेगवान गोलंदाजी व शक्तिशाली फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या अफगाणिस्तानचा अष्टपैलू अझमतुल्लाह उमरझाईला सोमवारी २०२४ चा आयसीसी वर्षातील सर्वोत्तम एकदिवसीय क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. २०२३ च्या प्रभावी कामगिरीवर आधारित २४ वर्षीय हा खेळाडू गेल्या वर्षी जगातील आघाडीच्या वन-डे आंतरराष्ट्रीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी एक झाला. उमरझाईने टी-२० व फ्रॅन्चायझी क्रिकेटमध्येही एक चांगला वर्ष अनुभवला, परंतु वन-डे क्रिकेटमध्ये तो सर्वात प्रभावशाली ठरला. त्याने गत वर्षी १४ सामन्यांमध्ये १७ बळी घेतल्या.

### आयपीएल २१ मार्चपासून सुरू होणार : अरुण धुमल

**बिलासपूर** : २०२५ चा इंडियन प्रीमियर लीगचा (आयपील) हंगाम आगामी २१ मार्चपासून सुरू होईल, अशी पुष्टी आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांनी सोमवारी केली. गत वर्षी नोव्हेंबरमध्ये सौदी अरबमधील जेद्दाह येथे दोन दिवस मेगा लिलावात एकूण १८२ खेळाडू ६३९.१५ कोटी रुपयांना विकले गेले. सर्व भागधारकांशी सल्लामसलत करून पुढील काही दिवसांत अंतिम वेळापत्रक जाहीर केले जाईल, अशी पुष्टीही त्यांनी केली. आयपीएल हंगाम मार्चमध्ये सुरू होणार असून तारीख २१ मार्च निश्चित करण्यात आली आहे. आणि काही दिवसांत वेळापत्रक जाहीर केले जाईल, धुमल यांनी संसद खेल महाकुंभाच्या तिसऱ्या आवृत्तीत पत्रकारांना सांगितले. आयपीएलच्या नियमांमध्ये कोणतेही मोठे बदल झालेले नाहीत, परंतु धर्मशाला क्रिकेट स्टेडियमवर दोन ते तीन सामने होतील अशी त्यांना आशा आहे.

### चॅम्पियन्स ट्रॉफी : तिकिटांची विक्री आजपासून

**दुबई** : आयसीसी चॅम्पियन्स चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेच्या तिकिटांची विक्री मंगळवारी दुपारपासून सुरू होणार आहे. आठ संघांचा समावेश असलेली ही स्पर्धा १९ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान चार प्रतिष्ठित ठिकाणी खेळली जाणार आहे. यात कराची, लाहोर आणि रावळपिंडी, तसेच संयुक्त अरब अमिरातीमधील दुबईचा समावेश आहे. १९९६ नंतर पहिल्यांदाच पाकिस्तान आयसीसीच्या जागतिक स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सज्ज होत असल्यामुळे या स्पर्धेला विशेष महत्त्व आहे. दुसऱ्या सेमीफायनलसह पाकिस्तानमध्ये होणाऱ्या दहा सामन्यांसाठी चाहते तिकिटे खरेदी करू शकतील. तिकिटे अधिकृत प्लॅटफॉर्मद्वारे आणि पाकिस्तानमधील १०० अधिक आऊटलेटवर ऑनलाइन उपलब्ध असतील. भारताच्या सामन्यांसह यूएई सामन्यांच्या तिकिट विक्रीची माहिती लवकरच जाहीर केली जाईल.

# भारत मालिका जिंकण्याच्या मार्गावर

### कर्णधार सूर्यकुमारच्या बॅटमधून धावांची अपेक्षा

◆ **राजकोट, २७ जानेवारी**

मंगळवारी येथील निरंजन शाह क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि इंग्लंडदरम्यान तिसऱ्या टी-२० आंतरराष

ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. इंग्लंडविरुद्ध आक्रमक खेळताना भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव याच्या बॅटमधून धावांची अपेक्षा करण्यात येत आहे.

गत वर्षी सूर्यकुमारने कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून त्याने फारशी केलेली नाही, पण त्याचा स्वतःचा फॉर्म खालावला आहे. गत वर्षी जगातील सर्वोत्तम टी-२० फलंदाज सूर्यकुमारने १७ डावांमध्ये २६.८१ च्या सरासरीने ४२९ धावा केल्या. त्याने २०२१ मध्ये सरासरी ३५ च्या सरासरीने धावा केल्या. हे त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले वर्ष होते. त्यानंतर पुढील दोन वर्षांत त्याने ४५ पेक्षा अधिक सरासरीने धावा केल्या.

मुंबईचा ३४ वर्षीय सूर्यकुमार यादव इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत अद्याप विशेष कामगिरी करू शकलेला नाही व वन-डे चॅम्पियन्स चषक संघातून वगळल्यानंतर त्याला सिद्ध करायचे आहे.



तिलक वर्माच्या वैयक्तिक प्रतिभेमुळे चेन्नईमध्ये भारताला विजय मिळाला, पण सूर्यकुमार व संजू सॅमसनकडन धावा मिळाल्या नाही. दक्षिण आफ्रिकेत संस्मरणीय मालिका खेळणारा सॅमसन मालिकेत दोनदा जोफ्रा आर्चरच्या आखुड टप्प्याच्या चेंडूबर बाद झाला होता.

पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आता भारतीय संघ ही मालिका खिशात घालण्याचा कसोशीने प्रयत्न करेल.

जोफ्रा आर्चर व मार्क वूडने भारतीय फलंदाजांसमोर काही आव्हाने उभी केली असली तरी, अतिरिक्त गतीविरुद्ध पूर्णपणे आरामदायी खेळणारा तिलक वर्मा इंग्लंडच्या गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरू शकतो.

दुखापतींमुळे रिंकू सिंग व नितीश कुमार रेड्डी अनुपस्थित असल्यामुळे शिवम दुबे किंवा रमणदीप सिंग यांच्यापैकी एकालाही खेळण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. दुबे आदिल रशीदच्या लेग-स्पिनरविरुद्ध उपयुक्त ठरू शकतो.

आतापर्यंत अंतिम एकादशमध्ये अर्शदीप सिंग एकमेव तज्ज्ञ वेगवान गोलंदाज आहे. संघ व्यवस्थापन हे संयोजन कायम ठेवण्याची शक्यता आहे.

आठ फलंदाजांसह खेळण्यास प्राधान्य देणारा भारत मधल्या षटकांमध्ये काम करण्यासाठी रवी बिश्नोई व वरुण चक्रवर्तीवर अवलंबून आहे.

**भारत वि. इंग्लंड तिसरा टी-२० सामना आज**
**स्थळ** : निरंजन शाह क्रिकेट स्टेडियम, राजकोट
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत आव्हान कायम ठेवण्यासाठी विजय आवश्यक असलेल्या परिस्थितीत इंग्लंड संघा ला आपल्या फलंदाजीसह कामगिरीत बरीच सुधारणा करण्याची गरज आहे.

कर्णधार जोस हा इंग्लंडचा आतापर्यंतचा सर्वात आत्मविश्वासू फलंदाज ठरला आहे. जेमी स्मिथ आणि ब्रायडन कार्सने गत सामन्यात आपली क्षमता दाखवली होती. जोफ्रा आर्चर सुरुवातीचे बळी टिपण्याचे लक्ष्य ठेवेल. (वृत्तसंस्था)



# जॅनिक सिनर ऑस्ट्रेलियन ओपन विजेता

◆ **मेलबर्न, २७ जानेवारी**

इटलीचा अव्वल मानांकित टेनिसपटू जॅनिक सिनर याने निर्णायक क्षणी दुसऱ्या मानांकित ॲलेक्झांडर इव्हेरेव्हविरुद्ध ६-३, ७-६ (७-४) ६-३ असा विजय मिळवला आणि सलग दुसऱ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपन विजेतेपद पटकावले. सिनरचे हे कारकिर्दीतले एकूण तिसरे ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद ठरले.

इव्हेरेव्हवर विजय मिळवून सिनरने आपणच जगातील सर्वोत्तम पुरुष टेनिसपटू असल्याचे दाखवून दिले. डोपिंग प्रकरण सुरू असतानाही सिनरने तिसरे ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद पटकावण्यासाठी इव्हेरेव्हला मात दिली. विजय नोंदवताच २३ वर्षीय सिनरने शांतपणे आपले हात हवेत वर केले व आपल्या संघासोबत आनंद साजरा केला.

ही माझ्यासाठी एक अविश्वसनीय स्पर्धा आहे. ही विजयी घोडदौड पुढेही कायम ठेवेन, असे सिनर म्हणाला. सिनर हा तीन ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धा जिंकणारा पहिला इटालियन खेळाडू आहे. या सामन्यात सिनरने अथक बेसलाइन खेळाचे, शारीरिक शक्तीचे व मानसिक सुदृढतेचे प्रदर्शन केले. इव्हेरेव्ह सामन्यात एकही ब्रेक पॉइंट बनवू शकला नाही तसेच तो सिनरला त्रास देऊ शकला नाही.

२७ वर्षीय जर्मन खेळाडू ॲलेक्झांडर इव्हेरेव्ह हा टेनि ओपन युगातील पहिल्या तीन ग्रॅण्ड स्लॅम अंतिम फेरीत पराभूत होणारा सातवा खेळाडू ठरला आहे. २०२० च्या अमेरिकन ओपन व २०२४ च्या फ्रेंच ओपनमध्येही तो अंतिम सामन्यात पराभूत झाला होता. उपविजेता ठरलेल्या ॲलेक्झांडर इव्हेरेव्ह पराभवानंतर खुर्चीवर निराश होऊन काही वेळ बसला व त्यानंतर त्याने सिनरची मुक्तकंठाने प्रसंसा केली. (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंदने गुकेशशी बरोबरी साधली


### टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ

◆ **विज्क आन झी, २७ जानेवारी**

टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत आपला उत्तम फॉर्म कायम ठेवत ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने आठव्या फेरीच्या लढतीत विश्वविजेत्या डी. गुकेशशी बरोबरी साधली. उभय प्रतिस्पर्धीदरम्यानचा सामना ३३ चालींनंतर अनिर्णीत राहिला.

या बरोबरीसह, प्रज्ञानंद व गुकेश दोघेही उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हसह ५.५ गुणांसह संयुक्तपणे आघाडीवर आहेत. नोदिरबेकने स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हला हरवले. इतर भारतीयांमध्ये, ग्रॅण्डमास्टर पी. हरिकृष्णने सर्वोच्च क्रमांकाचा नेदरलॅण्डच्या अनिश गिरीसोबत बरोबरी साधली. हरिकृष्णाने संभाव्य आठपैकी चार गुण मिळवले, तर अनिशने सलग सातव्या बरोबरीनंतर आपले गुण ३.५ केले. अर्जुन एरिगेसीने सर्बियाच्या ॲलेक्सी सरनासोबत बरोबरी साधली, तर लिओन ल्यूक मेंडोन्काने हॉलण्डच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टविरुद्धही असेच निकाल मिळवले. एरिगेसी दोन गुणांसह मेंडोन्कापेक्षा अर्धा गुणाने मागे आहे.

चॅलेंजर्स विभागात, झेक प्रजासत्ताकच्या न्गुयेन थाई व्हॅन डॅमने चीनच्या १४ वर्षीय लूला हरवून सहा गुणांसह एकमेव आघाडी घेतली. आर. वैशालीला हॉलंडच्या आर्थर पिजपर्सने बरोबरीत रोखले, तर दिव्या देशमुखला कझाकस्तानच्या काझीबेक नोगरबेकविरुद्ध स्पर्धेत आणखी एक सामना गमवावा लागला. पाच फेऱ्या शिल्लक असताना, विश्रांतीच्या दिवसासह लढाई थांबली व सामने मंगळवारी पुन्हा सुरू होतील. (वृत्तसंस्था)



### वैशालीशी हस्तांदोलन करण्यास नकार, नोदिरबेकने नंतर माफी मागितली

उझबेकिस्तानच्या ग्रॅण्डमास्टर नोदिरबेक याकुब्बोएव्हने भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. वैशालीशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यामुळे टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत वाद निर्माण झाला. त्यानंतर नोदिरबेकने माफी मागितली व माझा वैशालीचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. वैशाली व तिचा धाकटा भाऊ आर. प्रज्ञानंद यांच्याबद्दल पूर्ण आदर आहे, पण मी धार्मिक कारणांमुळे इतर महिलांना स्पर्श करत नाही, असे नोदिरबेक म्हणाला.

चेसबेस इंडियाने सोशल मीडियावर सामायिक केलेल्या व्हिडीओमध्ये वैशाली चौथ्या फेरीच्या सामन्यापूर्वी याकुब्बोएव्हविरुद्ध हात पुढे करताना दिसत आहे, परंतु तो प्रतिसाद न देता खाली बसला. त्यामुळे वैशाली अस्वस्थ झाली. २०१९ मध्ये ग्रॅण्डमास्टर झालेल्या २३ वर्षीय याकुब्बोएव्हने सामना गमावला.




# हिराचंद नेमंचद शिक्षकेतर कर्मचारी संघ विजेता

### श्रीमान भाऊसाहेब गांधी चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

हिराचंद नेमंचद वाणिज्य महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघाने श्रीमान भाऊसाहेब गांधी चषक क्रिकेट स्पर्धे चे विजेतेपद पटकाविले.


अंतिम सामन्यात त्यांनी वालचंद अभियांत्रिकी शिक्षकेतर कर्मचारी संघाचा ३ धावांनी पराभव केला. एचएनसीसी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित १० षटकांत ५ बाद ११८ धावा केल्या. यात निखिल अंबुरेने ३५ चेंडूत नाबाद ७४ व्यंकट पुंजाळ याने ९ धावांत २ गडी टिपले. डब्ल्यू आय टी नॉन टीचिंग संघास निर्धारित १० षटकांमध्ये ३ बाद ११५ धावा करता आल्या. त्यांच्याकडून नरेश रेस याने एकाकी झुंज देत २५ चेंडूत नाबाद ५६ धावा केल्या.

उत्कृष्ट फलंदाज व अंतिम सामन्याचा उत्कृष्ट फलंदाज म्हणून श्री अंबुरे यास ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जैन गुरुकुल प्रशालेचे गोलंदाज अमित दुरुपकर यांना देण्यात आला. अंतिम उद्घाटन संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माया गांधी, भूषण शहा, पराग शहा, वैभव गांधी, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, डॉ. सत्यजित शहा, डॉ. अश्विन बोंदार्डे, डॉ. आठवले आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांच्या हस्ते विजेता व उपविजेता संघांना बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.सदर चषकाच्या नियोजनासाठी क्रीडाशिक्षक राहुल हजारे, किरण चौगुले, सुरेश होणकसे, ओम फटाले, हरी काळे यांचे सहकार्य लाभले.

# ठाण्याचा गजानन शेंगाळ व धाराशिवची संपदा मोरे महाराष्ट्राचे कर्णधार

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे खो-खो संघ जाहीर, आजपासून स्पर्धेस सुरुवात





**मुंबई, दि. २७ जानेवारी-**

२८ जानेवारी ते १ फेब्रुवारी, या कालावधीत हल्दवणी, उत्तराखंड येथे होणाऱ्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्राचा खो खो संघ उत्तराखंड येथे पोहचला आहे.

संघात निवड झालेल्या खेळाडूंनी बालेवाडी, पुणे येथे १० ते २५ जानेवारी या कालावधीत आयोजित प्रशिक्षण शिबिरात कठोर मेहनत घेतली. या प्रशिक्षण शिबिरात राजेंद्र साप्ते यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. स्पर्धेला रवाना होताना सर्व खेळाडू आनंदी व उत्साही दिसत होते. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले आणि खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

**संघ याप्रमाणे : पुरुष संघ :** प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, शुभम थोरात, आदित्य गणपुले, राहुल मंडल (सर्व पुणे), निहार दुबळे, अनिकेत चेंदवनकर (सर्व मुंबई उपनगर), गजानन शेंगाळ (कर्णधार), आकाश कदम (सर्व ठाणे), सौरभ घाडगे (सांगली), रामजी कश्यप (सोलापूर), रोहित चव्हाण, विराज जाधव (सर्व धाराशिव), सौरभ आढावकर (कोल्हापूर), सिद्धेश सातपुते (विदर्भ), प्रशिक्षक : श्री. राजेंद्र साप्ते (पुणे), सहा. प्रशिक्षक : श्री. नागनाथ गजमल (हिंगोली), व्यवस्थापक : प्रा. डॉ. राजेश सोनावणे (नंदुरबार).

**महिला संघ :** प्रियांका इंगळे, ऋतिका राठोड, श्वेता वाघ, (सर्व पुणे), रेश्मा राठोड, अश्विनी मोरे, साक्षी तोरणे (सर्व ठाणे), संपदा मोरे (कर्णधार), अश्विनी शिंदे, गौरी शिंदे, संध्या सुरवसे, सुहानी धोत्रे (सर्व धाराशिव), सानिका चाफे (सांगली), पायल पवार (रत्नागिरी), ऋतुजा सहारे (नाशिक), श्रेया पाटील (कोल्हापूर), प्रशिक्षक : पंकज चवंडे (रत्नागिरी), सहा. प्रशिक्षक : सौ. सारिका जगताप (सातारा), व्यवस्थापिका : सौ. वर्षा जाधव (धाराशिव)

**सोलापूरच्या रामजी कश्यप याचा समावेश**



या संघात सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाच्या रामजी कश्यप याचा समावेश आहे. त्याचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

विजापूर रोड, सैफुल येथील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मध्ये वार्षिक क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अंतर्गत महाविद्यालयामध्ये आंतरविभागीय क्रिकेट, रस्सीखेच, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ यासारख्या इंनडोअर व आउटडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे प्राचार्य डॉ व्ही. व्ही. पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व क्रीडा समन्वयक एस. एल. मुडगी यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक व अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा. एस. ए. बोगा, प्रा. व्ही. आर. आवटे, प्रा. आर. आर. कांबळे, प्रा. सी. एस. ढेपे, प्रा. पी. व्ही. गायकवाड, प्रा. एस. के. कांबळे, प्रा. एस. एम. मादगुणकी, प्रा. आर. पी. म्हंता, प्रा. बी. के. कोरे, प्रा. एन. ए. गोडेन, प्रा. पी. एस. स्वामी, प्रा. जे. जी. मुल्ला व प्रा.बी. ई. नरोटे यांनी परिश्रम घेतले.



### अंतिम निकाल (विजयी व उपविजयी)

**क्रिकेट-** मुले : तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग. मुली: तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग.

**रस्सीखेच-** मुले:तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग, द्वितीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग. मुली: तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग.

**टेबल टेनिस-** मुले: क्षितिज गंभीरे, गोलूकुमार गुप्ता. मुली : निकिता काकडे, प्रणाली खरटमल.

**बॅडमिंटन-** मुले : द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, द्वितीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग. मुली : तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, द्वितीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग.

**बुद्धिबळ-** मुले : श्रीशांत जाधव, अरमान शेख. मुली : सोनाली राठोड, श्रेया होर्ती.



# जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारे जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, क्रीडाधिकारी गणेश पवार, सुनील धारूरकर, सत्येन जाधव आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय खेळाडू श्रेया परदेशी (धर्नुविद्या), श्रीगणेश उडता (डायव्हिंग) व दिव्यांग खेळाडू वैभव रणदिवे (नेमबाजी) यांना हे पुरस्कार देण्यात आले. प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख बक्षिस रू.१० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# प्रजासत्ताक दिन



## ओंकार साखर कारखाना, चांदापुरी

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्यात संचालक प्रशांत बोत्रे-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यायात आले. अध्यक्षस्थानी जनरल मॅनेजर भीमराव वाघमोडे होते. प्रशांत बोत्रे-पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेली घटना ही सर्वसामान्य माणसांचे, कामगारांचे व समाजातील सर्व घटकांना न्याय देणयासाठीच तयार केली आहे. हा कारखाना चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखाताई बोत्रे-पाटील यांच्या मार्गदशनाखाली ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, ऊस वाहतुकदार, ऊस तोडणी कामगारांचे हित जोपासून व पारदर्शक कारभार करुन या भागाचा कायापालटच केला आहे. यावेळी उपस्थितत कर्मचारी वर्ग, सुरक्षा रक्षक यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी मेजर मोहन घोडके, केन मॅनेजर शरद देवकर, चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, धनाजी पवार, गणेश धायगुडे, अमोल तरंगे, ऊस उत्पादक शेतकरी रामचंद्र मगर, नितीन जाधव, बापू वाघमोडे उपस्थित होते. आभार रमेश आवताडे यांनी मानले.

## उमा महाविद्यालय, पंढरपूर

**पंढरपूर :** येथील उमा महाविद्यालयामध्ये २६ जानेवारी रोजी ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निवृत्त कर्नल स्वराज्यरक्षक सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड चे संस्थापक हरीभाऊ लक्ष्मण बोंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मुकुंदराव परिचारक, संस्थेचे सचिव राजगोपालजी भट्टड, संस्थेचे विश्वस्त युवानेते प्रणवजी परिचारक, संस्थेचे विश्वस्त उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह माजी प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, रमेश लाड सन्माननीय सदस्य तसेच उमा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड उपस्थित होते.

# नागरिकांनी संविधानाचे पालन करावे : आ. देशमुख

### मंद्रुप अप्पर तहसील कार्यालयात प्रजासत्ताक दिन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ जानेवारी-**

नागरिकांनी दैनंदिन जीवनात संविधानाचे पालन करावे. संविधानातील तत्त्वांचे जीवनात पालन केल्यास सजग नागरीक निर्माण होण्यास मदत होऊन राज्याच्या व देशाच्या विकासास हातभार लागणार आहे, असे माजी सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख यांनी केले.

मंद्रुप अप्पर तहसील कार्यालय येथे आ. सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि तहसीलदार सुजित नरहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी ते बोलत होते. यावेळी मंद्रुप पोलिसाच्या



वतीने तहसीलदार सुजित नरहरे यांना मानवंदना देण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार जितेंद्र मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, सरपंच अनिता कोरे, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, उपसरपंच भगवान व्हनमाने, मंडल अधिकारी ज्योतिराम पवार, संजय गांधी निराधार योजनेचे माजी अध्यक्ष प्रशांत कडते, भाजपा युवा मोर्चाचे गौरीशंकर मेंडगुडले, पशुवैद्यक डॉ. प्रणाली क्षीरसागर, यतीन शहा, आरके फाउंडेशनचे मोतीलाल राठोड, दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष अमोगसिद्ध मुंजे, तंटामुक्ती अध्यक्ष रेवणसिध्द मेंडगुदले, सिध्दाराम हेळकर, रायप्पा बन्ने, अमृता चव्हाण, माजी ग्राम पंचायत सदस्य नितीन रणखांबे, आर. डी. गोसावी, महादेव जकुणे, श्रीमंत डोमनाळे, फारुक शिकलगार, दयानंद ख्याडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, कोतवाल, तहसील कार्यालय कर्मचारी उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात फुलांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ जानेवारी-**

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आकर्षक व नयन रम्य अशी तिरंगा ध्वजाप्रमाणे फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्रींचा गाभारा व नामदेव पायरी येथे झेंडू, शेवंती, कामिनी आदी एक टन फुलांची सजावट करण्यात आली आहे. महत्त्वाचे सण उत्सव, खास दिवस या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास, सजावट



केली जाते. सदरची सजावट पुणे येथील मोरया ग्रुपचे सचिन चव्हाण यांनी सेवाभावी तत्वावर मोफत करून दिली असून, यासाठी शिंदे ब्रदर्स यांचेकडील १५ कारागिरांनी परिश्रम घेतले. विद्युत रोषणाई व फुलांची सजावटीने भाविक दर्शनरांगेत अधिक गर्दी करीत आहेत. पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, या जयघोषा बरोबर भारत माता की जय, अशा घोषणा दर्शनरांगेत सुरू आहेत.

# गोपाळपूरच्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये ध्वजारोहण

**पंढरपूर :** येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रांगणात प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एम. पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अनुजा शिरगुर, वेदांत देशमुख, पियुष चोपडे व साक्षी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. सानिया भंडारे, शेल्विका बोड्याल यांनी गीत गायन केले. यावेळी प्रा. सुरज रोंगे, डॉ. एम.एम.पवार, प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. एम. एस. मठपती, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, बालाजी सुरवसे, अमोल चंदनशिव उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रतिक्षा गुन्नुर, ट्विंकल कदम व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी केले.



## बार्शीच्या अध्यापिका विद्यालयात गणराज्य दिन

**बार्शी :** बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अध्यापिका विद्यालय, बार्शी येथे प्रजासत्ताक दिनी प्राचार्याअनुसया चौगुले यांनी ध्वजारोहण केले. अध्यक्षस्थानी प्रा. बजरंग वाघमोडे होते. मकर संक्रांतीनिमित्त तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम प्रा. जीवन लोखंडे यांच्या हस्ते झाला. तसेच प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते सादर केली, भाषणांद्वारे आपले विचार व्यक्त केले. यावेळी सांस्कृतिक विभाग सहाय्यक प्रा. प्रमोद मांडे, प्रा. सोमनाथ देंडे, प्रा. सुभाष माळी, प्रा. अशोक घुले तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या. आभार प्रा. रतिकांत हामणे यांनी मानले.

# प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण

**पंढरपूर :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले. रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात एकूण ३२ पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यीनी यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली. शासकीय ध्वजारोहण समारंभास माजी आमदार प्रशांत परिचारक, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी



प्रशांत जाधव, पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, विजयकुमार जाधव, वैभव बुचके, उप कार्यकारी अभियंता भिमाशंकर मेटकरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांच्यासह स्वांतत्र्यसैनिक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी- कर्मचारी, तसेच मान्यवर उपस्थित होते. यावेळी संविधान उद्देशिकाचे वाचन करुन उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञा देण्यात आली व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. तसेच पोलीस दलाच्या वतीने ध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले.



## उपळाई ठों. शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**बार्शी :** भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) येथे उत्साहात साजरा करण्यात आला. सरपंच मधुकर वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच मीनल ठोंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तिसरी, सहावी, सातवीच्या वर्गातील विद्यार्थी, विध्यार्थीनीनी उत्कृष्ट समहूनृत्य सादरीकरण केले. दुसरीतील मुक्ताई आकाश खोडवे हिने देश मेरा रंगीला या गीताचे उत्तम सादरीकरण केले. मुख्याध्यापक अनिल काळे यांनी शाळेची माहिती दिली. याप्रसंगी सरपंच मधुकर वैद्य, उपसरपंच मीनल ठोगे, माजी सरपंच विजय ठोगे, सदस्य संजय भोसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सविता भोंग, उपाध्यक्षा योगिता सदावर्ते, ग्रामविकास अधिकारी दरडे, राजश्री सदावर्ते, संतोष पाटील, नागनाथ सदावर्ते, जावेद, तांबोळी, सिकंदर तांबोळी, सरफराज तांबोळी, भागवत वाघ, जयसिंग पाटील, भालचंद्र जामदार, तुषार चेके, सोमनाथ पांगरे, बालाजी कांबळे, दिनेश गिरी, आकाश वाउद्य, प्रमोद वाघ उपस्थित होते. याप्रसंगी मधुकर वैद्य यांनी शाळा विकासासाठी ५,००० रु. भेट दिले. आभार आनंद घाडगे यांनी मानले.

# निधन वृत्त...


## शिवाजीराव भालके



**बार्शी, दि. २७ जानेवारी-**

शिवाजीराव प्रल्हाद भालके (वय ७८ रा. गाडेगाव, ता. बार्शी) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गाडेगावचे माजी सरपंच किरण भालके यांचे ते वडील होत.

## विजयकुमार जोशी



**बार्शी, दि. २७ जानेवारी-**

येथील शक्तिपात परंपरेतील एक ज्येष्ठ साधक विजयकुमार जोशी यांचे नुकतेच येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे वय ७२ वर्षांचे होते. ते महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील सेवानिवृत्त अभियंता होते. परमपूज्य सद्गुरु गुळवणी महाराजांचे ते अनुग्रहीत होते. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे.

## अंबुबाई चौहान



**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

अंबूबाई वसंतसिंह चौहान (वय ८७) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंतयात्रा मंगळवार दिनांक २८ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता शिंदे चौक येथील राहत्या घरापासून निघणार आहे. पुना नाका स्मशानभूमी येते अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रतापसिंग चौहान यांच्या त्या मातोश्री होत.

## बनवारीलाल उपाध्ये



**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

गुजरगौड महासभेचे केंद्रीय मंत्री आणि राजस्थानी ब्राह्मण समाज संस्थेचे माजी कार्याध्यक्ष बनवारीलाल उपाध्ये (वय ६६) यांचे सोमवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## कल्याणी गंचिनगोटे



**दक्षिण सोलापूर, दि.२७ जानेवारी-**

विंचूर येथील कल्याणी सिद्राया गंचिनगोटे यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर विंचूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नात असा परिवार आहे. नांदणी जिल्हा परिषद शाळेचे ते अनेक वर्षे मुख्याध्यापक होते.

## अभिजित वडगावकर



**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

पत्रकार अभिजित वडगावकर (वय ५०) यांचे सोमवार, दि. २७ जानेवारी रोजी आकस्मित निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी सकाळी राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

## विजयसिंह घोडके



**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

नान्नज (ता.उत्तर सोलापूर) येथील रहिवासी विजयसिंह (राजू) गंगाराम घोडके (सरकार) (वय ५२) यांचे सोमवारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, एक भाऊ, दोन बहिण, भावजय, पुतणे असा परिवार असून माजी ग्रामपंचायत सदस्य अरुणनाना घोडके यांचे धाकटे बंधू होत.

अुत्तम सेवा — मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| | ग्रुप - D (असिस्टंट, ट्रॅकमन, पॉईंट्समन, ट्रॅकमेंटेनर) इ. पदे (३२,४३८ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३६ पर्यंत | २२/०२/२५ |
| २) | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| | लिपीक (१५५ पदे) | पदवी व इंग्रजी (४०) टायपिंग तसेच MSCIT कोर्स उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | ०५/०२/२५ |
| ३) | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| | नागरी सेवा पूर्व परिक्षा २०२५ IAS, IPS, IFS (९७९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३२ पर्यंत | ११/०२/२५ |
| ४) | **युको बँक, UCO** | | | |
| | ऑफिसर (२५० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ०५/०२/२५ |
| ५) | **डेडीकेटेड फ्रेट कोरीडोर कॉ.लि., DFCCIL** | | | |
| १) | बहुउदेशीय कर्मचारी (४६४ पदे) | दहावी व ITI उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | १६/०२/२५ |
| २) | एक्झिक्युटिव (१७५ पदे) | डिप्लोमा ६०% (सिव्हील/इले/इलेक्ट्रॉ/पॉवर/कॉम्प्यु/टेली इ.) उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ६) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १) | प्राथमिक शिक्षक (१८८ पदे) | बारावी (५०%) व D.Ed किंवा B.Ed व TET परिक्षा उत्तीर्ण असावे. | ३३ पर्यंत | ०६/०२/२५ |
| २) | पदव्युत्तर शिक्षक (१८७ पदे) | पदव्युत्तर पदवी (५०%) व B.Ed | ४८ पर्यंत | |
| ३) | पदवीधर शिक्षक (३३८ पदे) | पदवी व D.Ed/ B.Ed उत्तीर्ण | ४३ पर्यंत | |
| ४) | ग्रंथपाल (१० पदे) | पदवी/पदविका (ग्रंथपाल) उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| ५) | प्रयोगशाळा सहाय्यक (१२ पदे) | बारावी (फिजिक्स/केमिस्ट्री) उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| ७) | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर GMC** | | | |
| | शिपाई/मदतनीस/कक्ष सेवक/ क्ष-किरण परिचर/परिचर/सेवक रक्तपेढी परिचर इ. (९५ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ३१/०१/२५ |
| ८) | **भारत इलेक्ट्रॉनिक्स लि., BEL** | | | |
| | अभियंता (३५० पदे) | BE/B.Tech (इलेक्ट्रॉ/टेली/मेकॅ/ इलेक्ट्रॉ ॲन्ड टेली) उत्तीर्ण असावे | २५ पर्यंत | ३१/०१/२५ |
| ९) | **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, MIDC** | | | |
| १) | लिपीक (६६ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ३१/०१/२५ |
| २) | फायरमन (१८७ पदे) | दहावी व अग्निशमन कोर्स उत्तीर्ण | २५ पर्यंत | |
| ३) | सहा.अभियंता (१२४ पदे) | पदवी (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) | ३८ पर्यंत | |
| ४) | क. अभियंता (१७ पदे) | पदविका (स्थापत्य) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| ५) | तांत्रिक सहाय्यक (५२ पदे) | ITI ड्राफ्ट्समन (सिव्हिल/मेकॅ/इले) किंवा बांधकाम निरीक्षक कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| १०) | **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. MAHAGENCO (मुदतवाढ)** | | | |
| | १) तंत्रज्ञ - ३ (८०० पदे) | ITI (इले/ वायरमन/मशिनिस्ट/फिटर/ इलेक्ट्रॉ/ आय.टी./वेल्डर/इन्स्ट्रू/ बॉयलर/स्विचबोर्ड/पॉवर ) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ३१/०१/२५ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



**दिल्ली : दिल्ली परेडकरिता सुंद्री वादनासाठी पंडीत भिमण्णा जाधव, गुरुनाथ जाधव, मास्टर व्यंकटेशकुमार जाधव, मयुरेश जाधव, नरेंद्र बंजत्री, व्येकटेश माने, शकुंतला जाधव गोरखनाथ जाधव यांची निवड झाली होती. कर्तव्य पथावर सुंद्री वादन झाल्यानंतर सांस्कृतीक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी सुंद्री वाद्याची माहिती विचारून सुंद्री वाद्य वाजवण्याचा प्रयत्न केला.**



### रेशीमगाठ ब्राम्हण वधू-वर सूचक मंडळात ३०० जणांचा सहभाग

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

येथील रेशीमगाठ ब्राह्मण वधूवर सूचक मंडळाने आयोजित केलेला भव्य राज्य सर्वशाखीय ब्राह्मण वधूवर परिचय मेळावा सारस्वत मंगल कार्यालय येथे मोठया दिमाखात आणि हिंदू धर्माचे पालन करत साजरा झाला. यात ३०० मुले आणि मुली आणि त्यासोबत त्यांचे पालक या कार्यक्रमास उपस्थित होते. भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मेळावा दोन सत्रामध्ये संपन्न झाला. यामध्ये पहिल्या सत्रात मोहिनीताई पत्की, राम तडवळकर, धनश्रीताई उत्पात,किरण करकमकर, दिलीप कुलकर्णी या मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शक लाभले. ब्राम्हण सम ाजाचे एकत्रीकरण आणि विवाह समस्या याविषयी मान्यवरांनी आपले विचार मांडले. यासत्रात वधूवरांचा परिचय आणि पालकांची ओळख असे नियोजन होते. तर दुसऱ्या सत्रात मोहन दाते, रोहिणी तडवळकर, अलका काकडे यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये पत्रिका समज गैरसमज याबद्दल मोहन दाते यांनी तसेच विवाह समस्या आणि त्यावरील उपाय याबद्दल अलका काकडे तर ब्राम्हण समाजाच्या एकत्रीकरणासाठी समाज प्रबोधनाची गरज आहे असे मत रोहिणी तडवळकर यांनी मांडले. ब्राम्हण समाजाची निशुल्क सेवा हा वसा हाती घेऊन गेली आठ वर्ष निरंतर कार्य करणाऱ्या रेशीमगाठ ब्राह्मण वधूवर सूचक मंडळाचे सर्व पदाधिकारी बजरंग कुलकर्णी, अजय कुलकर्णी, संपदा जोशी, निशिकांत खेडकर, अनुराधा राव, मानसी बबतीवाले व कार्यकारी मंडळ यांच्या परिश्रमाने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्षा अरुणा जहागीरदार यांनी तर सूत्रसंचालन रश्मी मोहोळकर यांनी केले. सचिवा अश्विनी जोशी यांनी आभार मानले.



### रेखा शिंदे व ज्योती खताळ यांना शिवणकला पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष थोर स्वातंत्र्य सैनिक माजी खासदार स्व.तुळशीदास (दादा) जाधव यांच्या १२१ जयंतीनिमित्त स्वा. सै. जनाबाई जाधव शिवणकला पुरस्कार शिवणकला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या रेखा कृष्णात शिंदे व ज्योती औदुंबर खताळ यांना देण्यात आला. पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र व पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संग्रामसिंह जहागिरदार यांच्या हस्ते समीरजी पांढरे, संस्थेच्या सचिवा शिल्पाताई ठोकळ यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय खेळाडू श्रावणी सुर्यवंशी आणि ओम वरवडकर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष सचिन ठोकळ यांनी प्रास्तिविक केले. या समारंभा नंतर ज.रा.चंडक प्रशाला व इंदिरा प्रशाला बाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न झाला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भारती मुन्नोळी, पूर्वा भोसले, संध्या लोंढे यांनी केले. उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक मोहनराव घोडके यांनी मानले.

### चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

सोलापूर ते अक्कलकोट रोडवरील कुंभारीजवळ पाठीमागून येणाऱ्या चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तरूण जखमी होऊन मरण पावला. संतोष प्रभाकर अटंद (वय ३०, रा. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. संतोष अटंद हे २६ जानेवारी रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास वळसंग येथून सोलापूरकडे दुचाकीवरून येत होते. त्यावेळी कुंभारीजवळील विठ्ठल कामत हॉटेलजवळ एमएच २० डीव्ही १३७५ क्रमांकाच्या वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये संतोष यांच्या डोक्यास गंभीर मार लागल्याने ते जखमी झाले. जखमी अवस्थेत संतोष यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात भाऊ चेतन यांनी दाखल केले असता संतोष यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी घोषित केले.

# सोलापूर जिल्हा 'सोलर पार्क'मध्ये मॉडेल करणार

- एमएसईबी सुत्रधारी कंपनीच्या संचालिका केळकर यांची माहिती
- उद्योजक, शेतकरी आणि घरगुती वीज ग्राहकांच्या तक्रारींचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

'सुर्यघर' योजनेच्या माध्यम ातून सोलापूर जिल्ह्यातील अनेक भागात लाभार्थी वाढत आहेत. बिलात मोठी बचत होत असल्याने या योजनेमुळे ग्राहक समाधानी आहेत. येत्या काही दिवसात सोलापूर जिल्हा हा सोलर पार्क होणार असून, जवळपास ८०० मेगावॅट वीजनिर्मिती होवून सर्वांना याचा फायदा होणार असल्याचा निर्वाळा भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षा तथा एमएसईबी सुत्रधारी कंपनीच्या संचालिका निता केळकर यांनी आज (दि. २७) दिला. दरम्यान, केळकर यांनी त्यांच्या दौऱ्यात शेतकरी, उद्योजक, घरगुती वीज ग्राहकांच्या तक्रारी नमूद केल्या असून, स्थानिक लेवलच्या तक्रारींची सोडवणूक येथेच होणार आहे तर मोठ्या मागण्या पातळीवरून मार्गी लावण्याचा केळकर यांनी यावेळी शब्द दिला.

महावितरण, सोलापूर विभागाच्या वतीने जुनी मिल कंपाउंड परिसरातील कार्यालयात अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व महावितरणच्या विविध विषयांवर संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत



होत्या. यावेळी संचालिका निता केळकर, सहाय्यक अभियंता रमेश राठोड, सहायक अभियंता राजेश मदने, पब्लिक रिलेशन अधिकारी विकास पुरी, भाजप शहराध्यक्ष नरेंद्र काळे, रोहिणी तडवळकर, अनुजा कुलकर्णी, केतन शहा, राजू राठी, पेटप्पा गड्डम आदींची उपस्थिती होती. प्रारंभी केळकर यांनी जिल्ह्यातील उद्योग, शेतकरी, सर्व सामान्य ग्राहक व इतर वीज वापर कर्त्यांचा अधिकारी आणि उद्योजकांकडून आढावा घेतला.

यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना केळकर पुढे म्हणाल्या, सुर्यघर योजनेचा लाभ घेतल्यास वीज बिलात मोठ्या प्रमाणात सवलत मिळणार आहे. शासन स्तरावर सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी, वापर कर्ते मध्ये वाढ होण्यासाठी अनेक योजना आणल्या आहेत. शासकीय बँका या योजनेला पत पुरवठा करत आहेत. या सुर्यघर योजनेच्या माध्यमातून लोडशेडिंगमुळे होणारे आर्थिक नुकसान कमी होणार आहे. यामुळे कारखाने, शेती आणि शेती पूरक व्यवसायास मदत होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण, शहरी, औद्योगिक वसाहत मधील कारखानदार यांनी मोठया प्रमाणात सुर्यघर योजनेसाठी मागणी केली आहे. भविष्यात व येत्या काही दिवसांत सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक ठिकाणी सुर्यघर योजना यशस्वी होणार आहे.

घरा-घरात सर्व सामान्य लोकांना परवडणारी ही योजना आहे. सोलापूर विभागात आता पर्यंत ३ हजार हुन अधिक लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला असून, जवळपास पाच हजार अर्ज प्रस्तावित आहेत.

**या आहेत जिल्हा वासियांच्या मागण्या...**

शॉट सर्किटमुळे शेतकरी आणि जनावरे दगावली आहेत; नुकसान भरपाई मिळावी, डीपी नादुरुस्त असल्याने वारंवार लाईट गायब होते, यामुळे कारखानदारांचे नुकसान होते. हाय पॉवरचे डेपो बसविण्यात यावेत, लोंबकळणाऱ्या विद्युत वाहक तारेमुळे नुकसान होत आहे, त्याची दुरूस्ती व्हावी, डीपी परिसरातील स्वच्छता करण्यात यावी, अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कामे होण्यास विलंब होत आहे, शेतांमधील बांधावरून वीज वाहतूक करण्यात यावी, महावितरणचे परिमंडल कार्यालय सोलापुरात व्हावे, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत.

# शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ उत्सव अध्यक्षपदी सुशील बंदपट्टे

- १७ फेब्रुवारीला कुस्ती स्पर्धा तर १८ फेब्रुवारीला पाळणा
- ३ फेब्रुवारीपासून मध्यवर्ती कार्यालयातून परवान्याची सोय



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या अध्यक्षपदी सी ए सुशील बंदपट्टे यांची एकमताने निवड करण्यात आली.

महामंडळाच्या पदाधिकारी आणि शिवभक्तांची बैठक शिंदे चौक येथील डाळींबी आड मैदान येथे पार पडली. यावेळी राजन जाधव यांनी जयंती साजरी करताना कोणती काळजी घ्यावी, कशाप्रकारे शिवजयंती साजरी करावी याबाबत बैठकीत सूचना मांडल्या. तदनंतर मागील वर्षामधील जमा खर्चाचा हिशोब मांडण्यात आला. यावेळी मावळत्या अध्यक्षांसह सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आला. नूतन अध्यक्ष सुशील बंदपट्टे यांनी या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठया उत्साहात करण्यात येणार असून यावर्षी शिवजयंतीचा सोहळा एका वेगळ्या उंचीवर नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी उपाध्यक्ष सुनंदा साळुंखे यांनी शिवजन्मोत्सव निमि त्त होणाऱ्या पाळणा कार्यक्रमास जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. १७ फेब्रुवारी रोजी डाळींबी आड मैदान येथे कुस्ती स्पर्धा होणार असून १८ फेब्रुवारी रोजी रात्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकात शिवजन्मोत्सवाचा पाळणा सोहळा होणार आहे. मध्यवर्ती महामंडळाकडून शिवजयंती मंडळांना ऑनलाईन परवाना काढून देण्याची सोय करण्यात आली असून ३ फेब्रुवारीपासून म ध्यवर्तीच्या कार्यालयातून ही सोय करण्यात येणार आहे. यावेळी शिवाजीराव घाडगे, ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, सेक्रेटरी प्रीतम परदेशी, खजिनदार अंबादास शेळके, कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे, सदस्य राजन जाधव, विनोद भोसले, अनिकेत पिसे, बजरंग जाधव, भाऊसाहेब रोडगे, महादेव गवळी, विवेक फुटाणे, प्रकाश ननवरे, राजाभाऊ काकडे, राजू हुंडेकरी, लहू गायकवाड, प्रतापसिंह चौहान, सुनील शेळके, मतीन बागवान, विजय पुकाळे, जितू वाडेकर, उज्वल दीक्षित, लताताई फुटाणे, निर्मला शेळके, शत्रुघन माने, अनिल म्हस्के, संदीप साळुंके, सचिन चव्हाण, ब्रह्मदेव पवार, जीवन यादव, सदाशिव पवार, संजय जाधव, कल्याण गव्हाणे, लिंबाजी जाधव, धनाजी भोसले, कुमार क्षीरसागर, दत्ता जाधव, प्रदीप कळंब, अंबादास सपकाळ, लक्ष्मण महाडिक, गोवर्धन गुंड, मोहन खमीतकार, मनीषा नलावडे, प्राजक्ता बागल, अमोल व्यवहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**निवडण्यात आलेले पदाधिकारी याप्रमाणे :**
अध्यक्ष - सुशील बंदपट्टे, कार्याध्यक्ष - पंकज काटकर. उपाध्यक्ष - सोमनाथ शिंदे, अमोल कळंब, जॉन मुनाळे, लता ढेरे, सुनंदा साळुंखे. सचिव - महेश हणमे, सहसचिव - विश्वनाथ गायकवाड. खजिनदार - मारुती सावंत, सहखजिनदार - विवेक इंगळे. मिरवणूक प्रमुख - आदित्य घाडगे, उपमिरवणूक प्रमुख - सोमनाथ म्हस्के. कुस्ती प्रमुख - बापू जाधव. प्रसिद्धी प्रमुख - संदीप वाडेकर, बसू कोळी. कार्यालयीन प्रमुख - देविदास घुले, सचिन स्वामी




# टीजेएसबी सहकारी बँकेच्या शिरपेचात पुन्हा मानाचा तुरा

- इंडियन बँक्स असोसिएशनने तंत्रज्ञान आधारित ग्राहक सेवेसाठी चार पुरस्कारांनी केले सन्मानित

**ठाणे, दि. २७ जानेवारी :**

देशातील नागरी सहकारी बँकात आघाडीवर असणाऱ्या टीजेएसबी सहकारी बँकेला नुकत्याच झालेल्या विसाव्या वार्षिक बँकिंग तंत्रज्ञान परिषद आणि पुरस्कार सोहळ्यात चार प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) या संस्थेने टीजेएसबी सहकारी बँकेच्या तंत्रज्ञानाधारित ग्राहक सेवेची नोंद घेऊन सन्मानित केले आहे.

आयबीए ने टीजेएसबी सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट डिजिटल सेल्स, पेमेंट्स व एंगेजमेंट (विजेते), सर्वोत्कृष्ट टेक टॅलेंट व ऑर्गनायझेशन (विजेते), सर्वोत्कृष्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट (विशेष उल्लेख), सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान बँक (विशेष उल्लेख) हे चार पुरस्कार दिले आहेत. टीजेएसबी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंघवी यांनी हे पुरस्कार आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर टी. रबी संकर, आयबीएचे चेअरमन एम. व्ही. राव, आयआयटी मुंबई येथील प्राध्यापक दिपक पाठक यांच्या हस्ते स्विकारला.

यावेळी बँकेचे अधिकारी उपस्थित होते. टीजेएसबी सहकारी बँकेने आपल्या कार्यपद्धतीतून आधुनिक तंत्रज्ञानाच्याद्वारे ग्राहक सेवा आणि डिजिटल बँकिंगच्या क्षेत्रात नवे मापदंड स्थापित केले आहेत. या पुरस्कारांनी बँकेची विश्वासार्हता अधोरेखित झाली आहे. नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी बँक कटिबद्ध आहे.




# राष्ट्रवादीचे सभासद नोंदणी अभियान; प्रथम क्रमांकासाठी प्रयत्न करा : पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

येणाऱ्या महापालिका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यभर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येणार असून त्यासाठी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त यांनी जनमानसात जाऊन सभासद अभियान यशस्वी करावे असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शिर्डी येथील अजितपर्व २०२५ या राज्यव्यापी शिबिराचा अहवाल सोमवारी येथील बैठकीत कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी मांडला.

जिल्हाध्यक्ष संतोष पवार म्हणाले, शहरातील २६ प्रभागात अतिशय जोमाने सभासद नोंदणी अभियान राबवावे. मागील काळात राष्ट्रवादी अभिप्राय अभियानात सोलापूर शहराला राज्यात तिसरा क्रमांक मिळाला होता आता सभासद नोंदणी अभियानात प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी राष्ट्रवादीच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त यांनी मेहनत घेणे आवश्यक आहे.

महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर, जेष्ठ नेते आनंद मुस्तारे, बसवराज कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. याबैठकीस जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, प्रदेश सचिव शशिकांत कांबळे ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, ॲडव्होकेट सलीम नदाफ, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, आमिर शेख, तनवीर गुलजार, बसवराज कोळी, आशुतोष नाटकर, कांचन पवार प्राजक्ता बागल अर्चना दुलंगे सुरेखा घाडगे अल्मेराज आबादीराजे, मार्तंड शिंगारे, इस्माईल शेख, सम दानी मत्तेखाने, अहमद बागवान, इरफान शेख, अहमद मसुलदार, रमीज कारभारी, भारत नागटिळक, आदी उपस्थित होते.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर,दि.२७ जानेवारी-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दि.३ फेब्रुवारी २०२५ रोजी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

# महाकुंभासाठी यात्रेकरूंना भारतीय रेल्वेची भेट

**रेल्वे बोर्डाचे रवींद्र गोयल यांची माहिती**

**नवी दिल्ली, २७ जानेवारी**

महाकुंभ २०२५ या अमृत महोत्सवात भारतीय रेल्वेने सेवेचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. केवळ वाहतूक सुविधा वृद्धिंगत करण्यापर्यंतच ही सेवा मर्यादित नाही, तर प्रवाशांना आरामदायक आणि सुखद यात्रेचा अनुभवही प्रदान केला आहे, अशी माहिती रेल्वे बोर्डाचे परिचालन आणि व्यवसाय विकास पूर्व सदस्य रवींद्र गोयल यांनी दिली.



त्यांनी सांगितले की, श्रद्धा आणि आस्थेची पुण्यभूमी प्रयागराजपर्यंत प्रवाशांना पोहोचविण्यासाठी भारतीय रेल्वेने जागतिक स्तरावरील आतिथ्य सेवेचे जे योगदान दिले आहे, ते कायम स्मरणात राहील. महाकुंभासारख्या मोठ्या धार्मिक आयोजनात रेल्वेने आपल्या मूलभूत सोईसुविधा, सेवा आदींमध्ये मोठ्या सुधारणा केल्या आहेत. मागील दोन वर्षांत प्रवासी सुविधांमध्ये सुमारे पाच हजार कोटी रुपये खर्चून मोठे बदल घडवून आणले आहेत. यामुळे रेल्वे स्थानक आरामदायक, सुविधाजनक आणि आध्यात्मिकतेच्या जिवंत केंद्रात परिवर्तित झाले आहेत.

पूर्वी रेल्वे स्थानकांचा वापर रेल्वे गाड्या थांबणे, प्रवाशांचे चढणे-उतरणे आणि सामान वाहून नेण्यासाठीच व्हायचा. मात्र, काळानुरूप भारत सरकारने रेल्वेच्या मूलभूत ढाच्यात सुधारणा केल्या आहेत. आता रेल्वे स्थानक यात्रेकरूंच्या स्वागताचे प्रवेशद्वार बनले आहेत. स्लीपिंग पॉड्स, एक्झिक्युटिव्ह लाऊंज आणि रिटायरिंग रूमच्या अत्याधुनिक सुविधा आरामदायक आहेत. प्रचंड गर्दी आणि कोलाहलापासून दूर एक शांत वातावरणातील या सुविधा म्हणजे सर्वसामान्यांसाठी रेल्वेची भेटच आहेत.

रेल्वेने प्रवाशांसाठी मार्ग शोधण्यात मदत करण्यासाठी नव्या व्यवस्था बनवल्या आहेत. स्थानकावर विविध भागांना वेगवेगळ्या रंगात चिन्हित केले आहे. कुंभातील प्रवाशांची संख्या लक्षात घेता त्यांच्या थांबण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. हे आव्हान फार मोठे होते. मात्र, रेल्वेने ते पूर्ण केले आहे. वा

## पोलीस आयुक्तांच्या जड वाहनचालकांना सूचना..!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

सोलापूर : जड वाहनचालकांनी वाहनांचा वेग ताशी २०, तर प्रत्येक वाहनांमध्ये डॅशबोर्ड कॅमेरा व जीपीएस लावण्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी सांगितले.

सोमवारी पोलिस आयुक्तालय कार्यालयात शहरातील अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने जडवाहतुक वाहन चालक व बिल्डरची बैठक घेतली. या बैठकीस, पोलिस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, विजय कबाडे, डॉ. दिपाली काळे, सहापोलिस आयुक्त सुधिर खिरडकर, जड वाहतूक असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण विटकर, वाहन मालक, बिल्डर्स, कॉंट्रॅक्टर उपस्थित होते. प्रत्येक वाहनांचा प्रोफाईल तयार केला जाणार आहे. त्यामध्ये कोणी वेगाने वाहन चालवताना आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी साहित्य शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली यांच्या घरी जाऊन सत्कार केला. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व अन्य मान्यवर.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा नियोजन समितीची बैठक गुरुवारी

**सोलापूर दि. २७ जानेवारी-**

राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची व कार्यकारी समितीची बैठक नियोजन भवन सभागृहात गुरूवार, दि. ३० जानेवारी रोजी सकाळी १०वाजता आयोजित केली आहे. या बैठकीस पालकमंत्री, खासदार, आमदार आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. सर्व समिती सदस्य यांनी नियोजित वेळेपूर्वी समिती सभागृहात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.

### विद्यार्थींनाचा लैंगिक छळ; शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

शहरातील एका महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी त्याच महाविद्यालयातील शिक्षकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पीडित तक्रारदार हिने दिलेल्या फिर्यादीनुसार महाविद्यालयातील शिक्षक यल्लप्पा उर्फ सुमीत अनंत गाडेकर (रा. सोलापूर) याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडिता ही शहरातील एका महाविद्यालयात शिक्षण घेत असून याच महाविद्यालयातील आरोपी हा शिक्षक म्हणून कार्यरत आहे. यातील आरोपी शिक्षकाने सातत्याने पीडितेचा पाठलाग करणे, तिला नाहक त्रास देणे, पीडितेला तू मला आवडतेस असे सारखे म्हणून रस्ता अडवणे अशी कृत्ये करीत होता. पिडीतेची इच्छा नसताना ही आरोपी याने फिर्यादीचा हात धरून जबरदस्तीने त्याच्या सोबत घेऊन जाऊन फिर्यादीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला व पिडीतेवर अत्याचार केला. एवढ्यावरच न थांबता तू मला आवडतेस, तू मला सोडून जाऊ नकोस, नाहीतर मी जीवाचे बरे वाईट करून घेईन अशी धमकी शिक्षकाने पिडीतेला देत होता. छोट्या छोट्या किरकोळ कारणावरून मानसिक छळ करत होता. या गोष्टीला कंटाळून पिडीतेने सदर बझार पोलीस ठाण्यात शिक्षका विरुद्ध फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी शिक्षकाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात बाल लैंगिक शोषण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजीवणी व्हट्टे करीत आहेत.

### अल्पवयीन मुलींचा पाठलाग; तरुणाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

कोचींग क्लासला जाणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींचा पाठलाग करून त्यांना त्रास देणाऱ्या तरूणाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलींच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन खादीर नूर अहमद (वय २०, रा. सोरेगाव) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत मुली या शिक्षणासाठी कोचींग क्लासला जात असताना खादीर अहमद याने वारंवार या अल्पवयीन मुलींचा पाठलाग करून त्यांना त्रास दिला. त्यामुळे खादीर अहमद याच्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक रिया बोधे पुढील तपास करीत आहेत.

### ५ हायवाए १ पोकलेन मशीन जबरदस्तीने नेणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

५ हायवा व १ पोकलेन मशिन जबरदस्तीने नेणाऱ्या पाचजणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात सुहास विश्वास पाटील (वय ४४, रा. नानेगाव खुर्द, ता. पाटण, जि. सातारा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रभाकर चव्हाण व त्याच्या ५ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दहिटणे येथे योगायतन जी जी इन्फ्रा प्रा. लि. कंपनी, मुंबई या कंपनीचे काम सुरु आहे. २४ जानेवारी रोजी सकाळी प्रभाकर चव्हाण व त्याचे साथीदारंनी यांनी दहिटणे येथील कंपनी साईटवर येऊन काम बंद पाडले. सुहास पाटील यांनी प्रभाकर चव्हाण याच्याकडे ५ हायवा व १ पोकलेन मशिनची चावी मागणी केली. त्यावेळी चव्हाण व इतरांनी पाटील यांना दमदाटी करून भिती दाखवून ५ हायवा य १ पोकलेन मशिन असा १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून सहकार्य

## ● मुख्य शासकीय ध्वजारोहणप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची ग्वाही





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा आपला सोलापूर जिल्हा उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रात चौफेर प्रगती करत असून जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६व्या समारंभानिमित्त पोलीस आयुक्त मुख्यालय, पोलीस परेड ग्राउंड येथे सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख तसेच स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक व अन्य मान्यवर नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आज रोजी पर्यंत सोलापूर जिल्ह्यात एकूण ११ लाख २० हजार अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १० लाख ५५ हजार अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच राज्यातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी शासनाने 'लेक लाडकी' योजना सुरू केली आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये आज रोजी पर्यंत लेक लाडकी योजनेअंतर्गत ६ हजार १४४ लाभार्थी बालिकांना लाभाच्या पहिल्या टप्प्याची रक्कम प्रति बालिका ५ हजार रुपये प्रमाणे ३ कोटी ७ लाख २० हजार लाभार्थी बालिका व मातेच्या संयुक्त बँक खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत.

जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल, तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबण्यास मदत होणार आहे. राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी एकूण २८२.७५ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. परंतु भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ दर्शन रांगेत उभे राहावे लागते त्यामुळे दर्शन मंडप व दर्शन रांग याकरिता १२९.४० कोटीचा आराखडा शासनाने मंजूर केला असून, ही कामे लवकरच सुरू होणार आहेत. पंढरपूर देवस्थान मंदिर विकासाकरिता ७३.८५ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून या अंतर्गत कामे पूर्ण झाल्यानंतर त्याचा लाभ भाविकांना मिळणार असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

जलयुक्त शिवार अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून संपूर्ण जिल्हा पाणीदार करण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी देऊन कृषी क्षेत्रातील कृषी विषयक माहिती आणि डिजिटल सेवा देण्यासाठी ग्रिस्टॅक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे त्यांनी सुचित केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात एक लाख मराठा उद्योजक बनवण्याचे संकल्प पूर्ती झालेली आहे. प्रत्येक घरावर सौर ऊर्जा पॅनल बसून प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत सहभागी होण्याचे आवाहनही पालकमंत्री श्री. गोरे यांनी केले.

पोलीस परेड ग्राउंड येथे सकाळी ठीक नऊ वाजून पंधरा मिनिटांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी परेड कमांडर परिविक्षा दिन पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा वी. एस. यांचे समवेत परेड संचलन केले. त्यानंतर पथसंचलन झाले. यावेळी भारतीय उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले तसेच पालकमंत्री महोदय यांनी सर्व उपस्थित नागरिकांना तंबाखू विरोधी दिन व कुष्ठरोग मुक्त भारत बाबत शपथ दिली. त्यानंतर पोलीस विभाग, कृषी विभाग, सैनिक कल्याण विभाग, शिक्षण विभाग, महिला बालकल्याण, क्रीडा विभागाचे पुरस्कार वाटप पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. या ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, ज्येष्ठ नागरिक अन्य मान्यवर नागरिक यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भेट घेऊन त्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.



**सोलापूर : वीरमरण आलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांचा सत्कार करताना पालकमंत्री गोरे.**

# महापालिकेत प्रजासत्ताक दिनी गुणवंत अधिकारी-कर्मचारी पुरस्काराने २९ जणांचा गौरव






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महापालिका नगर रचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णूरकर, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे , नगर अभियंता सारिका अकुलवार यांच्यासह २९ जणांचा गुणवंत अधिकारी -कर्मचारी पुरस्काराने गौरव करण्यात आला.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात आज गुणवंत अधिकारी -कर्मचारी पुरस्काराचे वितरण झाले. सन्मानपत्र व पुष्प देऊन या अधिकारी-कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. यावेळी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त अनिता मगर आदींसह मान्यवर अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

### या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा झाला गौरव!

यावेळी नगर रचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णूरकर, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे , नगर अभियंता सारिका अकुलवार , वैद्यकीय अधिकारी डॉ. आतिश बोराडे, विभागीय अधिकारी नागनाथ बाबर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेणुका लहांडे, स्मार्ट सिटी विभागातील अवेक्षक उमर बागवान, भूमी मालमत्ता विभागातील अवेक्षक सतीश बुर्ला, आरोग्य निरीक्षक सोमनाथ सिद्धगणेश, संगणक विभागातील सहाय्यक प्रोग्रामर मतीन शेख, युसीडी विभागातील तांत्रिक तज्ञ समीर मुलानी, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, अग्निशामक विभागाचे प्रभारी सहाय्यक अधीक्षक अच्युत दुधाळ, ए.एन.एम रेखा आंधळकर, प्रमोद मुळीक, अतिक्रमण विभागातील कनिष्ठ श्रेणी लिपिक हनुमंतु वड्डेपल्ली, मालमत्ता कर विभागातील वसुली लिपिक गजानन जाधव, जमादार सुहास शिरसागर, सिद्राम बोराडे, आयुक्त कार्यालयातील शिपाई सचिन पोरे, आयुक्त कार्यालय वाहन चालक इमरान शेख, मजूर नागनाथ जाधव, विठ्ठल खराडे, अस्लम शेख, सफाई कामगार पदमा जमूल, मासम्मा सुक्कोलू, झाडूवाली चंद्रकला कांबळे, देवगणा इंगळे, केरप्पा सकट आदी २९ जणांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.




# लिटल स्टार ॲकॅडमीमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

विजापूर रोड नवीन आरटीओ कार्यालयासमोरील लिटल स्टार ॲकॅडमीमध्ये भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारती विद्यापीठ शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सौ. विद्या जाधव या होत्या. याप्रसंगी एलकेजी आणि युकेजी मधील विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर केले. नर्सरीच्या मुलांनी विविध स्वातंत्र्यसैनिकांच्या वेषभूषा करून उपस्थितांची मने जिंकली. संपादक प्रशांत माने, विद्या जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संचालिका अबोली जाधव, अभिषेक जाधव, आदिनाथ सगरे यांच्यासह पालक, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

### शिक्षकांप्रमाणेच पालकांचीही मोठी जबाबदारी

मुलांना शाळेत घातल्यानंतर पालकांनी मोठ्या जबाबदारीने आपल्या मुलांकडे लक्ष देणे काळाची गरज आहे. शिक्षकांप्रमाणेच पालकांनीही मुलांवर संस्कार बिंबवणे आवश्यक आहे. नर्सरी, एलकेजी, युकेजीतील मुलांवर योग्यवेळी योग्य संस्कार झाल्याने देशाची भावी पिढी जबाबदार, यात शंका नसल्याचे मनोगत तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी व्यक्त केले.

# साहेब 'गाठीभेटीवर' भागायचे नाही, आऊटपूट पाहिजे!

## पालकमंत्र्यांकडून जिल्हावासियांची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापुरातील मुरब्बी राजकारणी नेते आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांशी मिळते जुळते वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न गेल्या २ भेटीत केल्याचे दिसून आले असून, दर आठवड्याला येण्याचा शब्दही सोलापूरकरांना दिला आहे. जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रश्न आहेत; त्याची पालकमंत्र्यांनी एकेक करून उकल निपटारा करणे गरजेचे आहे. कारण सोलापूरकरच्या नागरिकांना आता खरी आऊटपूटची गरज आहे. कारण गेल्या ५ वर्षात ५ पालकमंत्री झाल्याने जिल्ह्याचा हवा तितका विकास झाला नाही; यामुळे स्थानिक नेते आणि जनतेतही तीव्र नाराजी आहे. यामुळे आता पालकमंत्री गोरे यांना सोलापुरात कामच करावे लागणार आहे.

प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम झाल्यानंतर जिल्हा नियोजन भवन सभागृहात पालकमंत्री गोरे यांच्या उपस्थितीत पत्रकार बांधवांचा चहापानाचा कार्यक्रम झाला आणि यामध्ये जिल्ह्याच्या विविध विषयांवर चर्चाही झाली. यावेळी शहर-जिल्ह्यातील विविध प्रश्नांची आव्हाने पेलण्याचा विडा पालकमंत्री गोरे यांनी उचलला आहे मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्यातील ३ सिनीअर आमदार मंत्री अन् पालकमंत्री पदासाठी इच्छुक असतानाही त्यांना डावलून गोरे यांची वर्णी लावली आहे. यामुळे प्रत्येक विकासकामांत या आमदारांची गोरे यांना किती मदत मिळेल हे सध्यातरी सांगणे कठीण आहे. कारण या आमदारांत अजूनही नाराजी दिसून येत आहे.

राज्य शासनाने उजनी जल पर्यटनासाठी सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी एकूण २८२.७५ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. हा पर्यटन विकास गतीने केला तर हजारो युवकांना सोलापुरात रोजगार मिळणार आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. परंतु भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ दर्शन रांगेत उभे राहावे लागते त्यामुळे दर्शन मंडप व दर्शन रांग याकरिता १२९.४० कोटीचा आराखडा शासनाने मंजूर केला असून, हे काम ही लवकर सुरू करण्याची गरज आहे. शहरात माजी महापौर स्व. महेश कोठे यांनी पाहिलेले आयटी पार्कचा प्रश्न आहे, शेतकऱ्यांना एफआरपी वेळेत दिली जात नाही; काही साखर कारखानदार शेतकऱ्यांचे पैसे बुडवितात, शेतकऱ्यांच्या मालाला कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये योग्य भाव मिळत नाही; त्यांच्या भूसंपादित केलेल्या जमिनीला शासनाकडून योग्य भाव मिळत नाही. असे कितीतरी प्रश्न प्रलंबित आहेत.



पालकमंत्री निवडीला उशीर झाल्यामुळे अनेक कामे खोळंबली होती. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नावाची घोषणा झाल्यावर त्यांनी सोलापूरचा दौरा अत्यंत सावधपणे केल्याचे दिसून येत आहे. सोलापूरच्या दौऱ्यावर येताना त्यांनी सर्वच आमदारांना संपर्क केला. विशेष करून दोन्ही देशमुख यांना निमंत्रण देण्यास ते विसरले नाहीत. आढावा बैठक व त्यानंतर प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला हजर राहताना त्यांनी सर्वांना बोलावले. मंत्रीपदाच्या शर्यतीत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, आ. सुभाष देशमुख यांच्याही नावाची जोरदार चर्चा झाली मात्र सोलापूरला न्याय मिळाला नाही. दुसऱ्या विस्तारात आ. कल्याणशेट्टी यांना राज्यमंत्री पद तरी मिळेल अशी अजूनही कार्यकर्त्यात चर्चा आहे. ३० जानेवारीला जिल्हा नियोजनची सभा आहे. मार्च अखेरच्या विकास कामांना खर्ची टाकण्याचे विषय मंजूर करणे व निधी शिल्लक राहू नये, याची काळजी घेण्यासाठी ही बैठक महत्वाची मानली जाते. पण या बैठकीत विरोधी पक्षाचे खासदार व आमदार जिल्ह्याचे काही वादग्रस्त विषय आणतात का? याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे व इतर विरोधी पक्षाचे आमदार सोलापूरच्या विकासाच्या प्रश्नावर आक्रमक होतील, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### विमानसेवा अन् उड्डाणपुल...

सोलापूर शहर-जिल्ह्यात अनेक महत्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. यातील सर्वात महत्वाचा प्रश्न आहे तो विमानसेवेचा. विमानसेवा सुरु करण्यासाठी सोलापूर विकास मंच आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जीवाचं रान केलं मात्र ही विमानसेवा सुरू करण्यासाठी इतका का विलंब होत आहे; याची कारणमिमांसा शोधून त्याचा निकाल लावणे गरजेचे आहे. कारण विमानसेवा हा विषय सध्यातरी चेष्ठेचा झाला आहे. यानंतर सोलापूर शहरातील २ उड्डाणपुलाचा विषय आहे. ही उड्डाणपुले निर्माण झाली तर शहरातील जड वाहतूक उड्डाणपुलावरून जाईल आणि गोरगरिबांची मुले जड वाहनांखाली सापडणार नाहीत. जड वाहतूक गर्दीतून होत असल्याने सारखे अपघात घडत असून, जीव जात आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१२

**वस्तू घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे ।**
**नातरी कन्या पाहूनियां म्हणिजे । मना नये हें ।।**

विश्वरुपातील काही भयानक तोंडे पाहून व विश्वमुखात जात असलेले जीव पाहून अर्जुन भयभीत झाला होता. विश्वरुप पाहण्याअगोदर त्याला विश्वरुप गोजिरवाणे, गोंडस असेल असे वाटत होते. पण जगाच्या पाठीवर निर्माण होणाऱ्या सर्व चांगल्या-वाईट, गोड-भेसूर जीवांचे एकत्रीकरण या विश्वरुपात असते, हे अर्जुनाला माहित नव्हते. विश्वरुपातून अर्जुनाला भगवंताचा खरा परिचय तर झालाच होता पण स्वत:चाही परिचय त्याला झाला होता. भिती बरोबर तो विश्वरुप पाहून खूप आनंदीही झाला होता. या आनंदाच्या भरात तो भगवंताला अलिंगन देऊ इच्छित होता. हे अलिंगन तो विश्वरुपाला न देता तो श्रीकृष्णाच्या मूळ स्वरुपाला देऊ इच्छित होता. विश्वरुप पाहून त्याचे मन आता भरले होते. म्हणून आता त्याला विश्वरुपाऐवजी श्रीकृष्णाचे मूळ गोजिरवाणे स्वरुप पाहावे वाटत होते. अर्थात त्याची इच्छा पूर्ण झाल्याने किंवा त्या विश्वरुपाचा पाहिजे तसा व पाहिजे तेवढा आनंद घेतल्याने आता त्याला विश्वरुप नको होते. माणूसही आपल्या जीवनात असेच वागतो. एखाद्या वस्तूचा उपभोग घेतल्यानतर ती टाकून देतो किंवा उपभोग संपल्यानंतर रत्नालाही दुषण ठेवतो. लग्न करण्यासाठी एखाद्याच्या कन्येला पाहण्याची उत्सुकता दर्शवून तिला पाहिल्यानंतर मला ती पसंद नाही असे तो म्हणतो. हे सांगतांना माऊली म्हणतात,



**वस्तू घेऊनि वाळिजे । जैसें रत्नासि दूषण ठेविजे । नातरी कन्या पाहूनियां म्हणिजे । मना नये हें ।।**

या ओवीप्रमाणे अर्जुनाची विश्वरुप पाहण्याची इच्छा पूर्ण झाल्याने, आता हे विश्वरुप बंद कर, मला ते आता नको आहे, असे म्हणत असल्याचे माऊली सांगतात माऊलींनी आजच्या ओवित अत्यंत मार्मीक व समाजात दैनंदिन घडत असलेला दृष्टांत दिला आहे. अनेक तरूण स्वत:साठी पत्नी म्हणून एखादयाची मुलगी पाहायाला जातात. मुलीबदल्ल जवळपास सर्व काही त्या तरूणाला माहितीही असते. तरीपण तिला अनेक तरुण वस्तू समजतात आणि आपणाला ती पसंद नाही असे म्हणतात. तिच्या मनाचा अजिबात विचार करत नाहीत, एवढेच काय मूलीला पहातात, ती पसंद आहे असे म्हणून तिच्याशी लग्न करतात, आणि कालांतराने मला ही पत्नी पसंद नाही म्हणून तिला वेगवेगळयाप्रकारे नांव ठेवुन सोडून देण्याची भाषा वापरतात. स्त्री म्हणजे जणू एक वस्तूच आहे असे समजून तिचा उपभोग घेउन आता तिची गरज नाही असे समजून तिला परत घेऊन जायला तिच्या आई-वडिलांना सांगतात. ब-याचवेळा तर घरातून हाकलून देण्याचा किंवा तिला संपवून टाकण्याचा प्रयत्नही करतात. माऊलींना या ठिकाणी सांगायचे आहे की स्त्री ही एक वस्तू नाही. तिलाही पुरूषांबरोबर बरोबरीने सर्व हक्क आहेत. तिलाही मन, अपेक्षा असतात. या सर्व गोष्टींचा प्रत्येक पुरुषाने विचार करुन तिला जीवनसाथी समजुन बरोबरीचा दर्जा दयावा. आपण माऊलींचे शिष्य असल्याने स्वप्नातही आपल्याकडून स्त्रीचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**


भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ व्या समारंभा निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, अन्नधान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, उपजिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रगीत व त्यानंतर राज्य गीत गायन झाले. यावेळी तंबाखू विरोध तसेच कुष्ठरोग मुक्त भारत बाबत सर्व उपस्थितांना शपथ देण्यात आली. तसेच प्रारंभी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सर्व उपस्थित अधिकारी, महसूल अधिकारी व कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो. ९९६००५३५२१

### अलकः- (३३) प्रार्थना

रा.स्व.संघात आज संस्कृत प्रार्थना म्हणतात. या आधीची प्रार्थना मराठी व हिंदीत होती. ही संस्कृत प्रार्थना फेब्रुवारी १९३९ मध्ये नागपूर जवळील सिंदी येथील बैठकीत तयार केली. तेव्हा त्या बैठकीत स्वतः सरसंघचालक डॉक्टर हेडगेवारजी, श्री गोळवलकर गुरुजी, श्री बाबासाहेब आपटे, श्री बाळासाहेब देवरस, श्री अप्पाजी जोशी, श्री नानासाहेब टालाटुले आदि प्रमुखांचा सहभाग होता. श्री नरहरी नारायण भिडे यांनी संस्कृत मध्ये अनुवाद केला व श्री यादवराव जोशींनी चाल लावली. नंतर १८ मे १९४० पासून नित्य प्रार्थना म्हणून अनिवार्य केली. नमस्ते सदा वत्सले मातृभूमे त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्। महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।।१।। प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता इमे सादरं त्वां नमामो वयम् त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयं शुभामाशिषं देहि तत्पूर्तये। अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम् सुशीलं जगद् येन नम्र भवेत् श्रुतं चैव यत् कण्टकाकीर्णमार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगङ्कारयेत् ।।२।।

**समुत्कर्ष निःश्रेयसस्यैकमुग्रम् परं साधनं नाम वीरव्रतम् तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् । विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर् विधायास्य धर्मस्य संरक्षणम् परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।।३।। ।। भारत माता की जय ।।**

प्रार्थनेचा अर्थ माहित असावा; नुसती पोपटपंची नको. प्रार्थनेच्या आशयात समरस होऊन प्रार्थना म्हटली पाहिजे. मनुष्य जीवनात प्रार्थनेबरोबरच प्रतिज्ञापण महत्त्वाची असते. प्रतिज्ञा म्हणजे निर्धार व याच्या पूर्ततेसाठी परमेश्वराला जी विनंती करतो ती प्रार्थना. म्हणूनच प्रतिज्ञा आणि प्रार्थना यांची स्वयंसेवकांनी सांगड घालणे संघाला अपेक्षित आहे. म्हणून पुढील अलक मधून अर्थासहित प्रार्थना लिहीत आहे. व त्या पुढील अलक मध्ये भाष्य म्हणजेच आशय लिहीन.

**- क्रमशः**

## प्रशासकीय इमारतीत अप्पर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ जानेवारी,**



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ व्या समारंभा निमित्त जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारती मध्ये अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते सकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, उपजिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्यासह अन्य सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ध्वजारोहण कार्यक्रमानंतर भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले.

## सर्वांच्या सहकार्याने विद्यापीठाचा विकास करू

### कुलगुरू प्रा. डॉ. महानवर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विकासासाठी सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक असून ते मिळत आहे. एका जिल्ह्यासाठी स्थापन झालेल्या या विद्यापीठासाठी सर्वांच्या सहकार्याने पुढे घेऊन जाऊ, असा विश्वासही विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी यावेळी व्यक्त केला. देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यापीठात कुलगुरू प्रा. डॉ. महानवर यांनी राष्ट्रीय ध्वज फडकवून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. या सोहळ्याला प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, प्रा. सचिन गायकवाड, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांच्यासह विविध प्राधिकरणाचे सदस्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.



## पालकमंत्री जयकुमार गोरे यांना रे नगरच्या समस्येबाबत माकपच्या शिष्टमंडळाचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांना शहरातील नागरिकांना शासनाकडून नागरी मुलभूत सुविधा व शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा यासाठी माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

कॉ. आडम (मास्तर) यांच्या नेतृत्वाखाली पालकमंत्री गोरे यांना शिष्टमंडळाद्वारे कॉ. गोदूताई परुळेकरनगर येथील पायाभूत सुविधा, रे नगर आणि मयत साक्षी कलबुर्गी हिच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री निधीतून २५ लाख आर्थिक मदत मिळावी, याचे निवेदन देण्यात आले. यावेळी पक्षाचे राज्य समिती सदस्य कॉ. युसुफ मेजर, माजी नगरसेविका सुनंदा बल्ला, अभियंता मेहुल मुळे, डिवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष विक्रम कलबुर्गी, ॲड. अनिल वासम, कॉ. विल्यम ससाणे, कॉ. वसीम मुल्ला आदींची उपस्थिती होती. रे नगर येथील डिसेंबर अखेरीस उर्वरित १५ हजार घरांचे हस्तांतरण करण्यात येणार आहे. परंतु रे नगरला जाण्यासाठी दळणवळणची व्यवस्था करावी. शाळा, महाविद्यालये, दवाखाना, रास्तभाव धान्य दुकान, क्रीडांगण, स्मशानभूमी, भाजी मंडई, विडी कारखाने आदि लाभार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या अत्यावश्यक सुविधा करा. शहर ते रे नगरला जाणाऱ्या रस्त्यांसाठी शासनाकडून जिल्हा प्रशासनाकडे निधी आहे. परंतु अद्याप ते काम मार्गी लागलेले नाही. तसेच अकृषिक सारा यातून सवलत मिळावी आदी मागण्यांचा यात समावेश आहे.





**सोलापूर : जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकच्या वतीने अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने चेअरमन डॉ. एस. पी. माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जेष्ठ संचालक विवेक लिंगराज, श्रीशैल्य देशमुख, श्रीधर कलशेट्टी, प्रसन्न स्वामी, मृणालिनी शिंदे, दत्तात्रय देशपांडे, अशोक पवार, हणमंत गायकवाड, सुभाष काळे विनोद कदम आदी उपस्थित होते.**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २८ जानेवारी २०२५ | अमावास्या, संत तुकाराम |
| विक्रम संवत् २०८०-८१ | समाधी दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्दशी - (१९.३६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाषाढा (०८.५८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (२३.५१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (०८.०९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत. नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही.

**वृषभ** : आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य.

**मिथुन** : कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क** : वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह** : आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्न राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या** : आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ** : आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक** : आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता. बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

**धनू** : विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे. आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा.

**मकर** : जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ** : आज खाण्यापिण्याकडे थोडेसे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे. नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील.

**मीन** : अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा म हत्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

## मनपा शिक्षण मंडळाच्यावतीने उत्साहात ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी -**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मनपाचे सहाय्यक आयुक्त तथा प्रशासनाधिकारी गिरिश पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर निलोफर सय्यद, रजनी राऊळ, माजी क्रीडा शिक्षक पांडुरंग माने, मुकुंद चंदनशिवे, चित्रकला शिक्षिका वृषाली शिंगण, सारंग अंजीखाने, आषिकेष लोखंडे, रतन साळवे, सुवर्णा गुरव, रूपाली कंची, प्रभा चव्हाण, वनिता घोडके, हिरा गोरे, अविनाश शिंदे, रियाज आतार, अमोल गायकवाड, गुरुप्रसाद तलवार, सचिन जाधवर, झाकीर सय्यद,भालचंद्र साखरे, नईम मुचाले,सचिन साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

यावेळी प्रशासनाधिकारी पंडित म्हणाले, सोलापूर शहराला स्वातंत्र्य लढ्याचा क्रांतिकारी आणि जाज्वल्य इतिहास आहे. पारतंत्र्यात जुन्या नगरपालिकेच्या (सध्याच्या या प्राथमिक शिक्षण मंडळाच्या) इमारतीवर तिरंगा ध्वज फडकवण्यात आला होता. या इमारतीत कार्य करण्याचे भाग्य मिळाले याचा अभिमान वाटतो.

## महावितरण कार्यालयात प्रजासत्ताक दिन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

सोलापूर शहर ई उपविभाग येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांच्या हस्ते ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्ताने राष्ट्रध्वज फडकविण्यात आले.

याप्रसंगी उपविभागातील शाखाधिकारी अजय चव्हाण, प्रेम राठोड, सौरभ सुरवसे, नागेश खडतरे, अजिंक्य कुलकर्णी, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, ओंकारनाथ गाये, सुमित जाधव, दीपक यलगुलवार, प्रकाश क्षीरसागर, रामलिंग अष्टगी, धुळाप्पा टेळे, एम. एम. करजगीकर, मनिष जामदार, अजिंक्य खिलारे, जैन्नोदिन शेख, अमजद पठाण, रोहिदास डांगे, स्वप्निल कोरे, आनंद फुलारी, श्रीशैल विजापूरे, अक्षय कांबळे, संतोष कुंभार, मल्लिनाथ मुन्नोळी, चंद्रकला शिंदे, भारती टांक, प्रमिला सुरवसे, मिनल भोसले, रम्या कुंजुकुंजु तसेच उपविभागातील इतर कर्मचारी वर्ग व जनमित्र उपस्थित होते.

## केंद्र शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विहीत वेळेत द्या

### खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रशासनाला सुचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

केंद्र शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या बैठकीत खासदार प्रणिती शिंदे यांनी घेऊन सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत केंद्रीय योजनांचे लाभ पोहचेल याची दक्षता घेण्याची सूचना त्यांनी दिल्या.

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) च्या बैठकीस खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार सर्वश्री अभिजीत पाटील, नारायण पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधकारी महसूल अमृत नाटेकर यांच्या सह सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख उपस्थित होते.




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कामे सेल्फवर ठेवून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करावा. तसेच पाणंद रस्त्याची मंजूर असलेली १ हजार १४६ कामापैकी ६६ कामे सुरू आहे तर उर्वरित कामे त्वरित सुरू करावीत. राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान अंतर्गत मोठ्या प्रमाणावर महिला बचत गटाची स्थापना करून त्यांना बँकांकडून कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करावे. जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये लखपती दीदींची संख्या ९८ हजार इतकी असून ही संख्या मोठ्या प्रमाणावर कशा पद्धतीने वाढेल यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना समिती अध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्या.

पाणंद रस्त्याची कामे सुरू करताना एक किलोमीटर रस्त्यासाठी वीस लाख रुपयांचा स्लॅब आहे. त्यावरती अंदाजपत्रक गेल्यास पानंद रस्त्याच्या कामांना मंजुरी मिळत नाही. तरी केंद्र शासनाच्या माध्यमातून एक किलोमीटर रस्त्यासाठी २० लाखाची मर्यादा काढून टाकल्यास ही कामे मोठ्या प्रमाणावर करता येऊ शकतात अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. सद्यस्थितीत सर्व तालुक्यात किमान २०० कामे पानंद रस्त्याची सुरू होऊ शकतात परंतु ते सर्व रस्ते कच्चे घ्यावे लागतील. तहसीलदार यांच्याकडे रस्ते बाबत प्रलंबित केसेस चा निकाल लावण्या बाबतची कार्यवाही लवकरच करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भारतीय गणराज्य दिन



### जि. प. प्रा. शाळा, वाफळकर वस्ती

**करकंब, दि.२७ जानेवारी,**

जि. प. प्रा. शाळा वाफळकरवस्ती, बार्डी येथे अध्यक्ष रामदास माळी यांनी ध्वजारोहण केले. यावेळी उपाध्यक्ष प्रवीण कवडे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वसेकर, मुख्याध्यापक किरण ढोबळे, ज्ञानेश्वर दुधाणे उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदास माळी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ज्ञानेश्वर दुधाणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी खेळ पैठणीचा, संगीतखुर्ची यासारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. संगीतखुर्ची स्पर्धेत वर्षा वसेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.त्यानिमित्त शाळेच्यावतीने त्यांना पैठणीसाडी भेट देण्यात आली.

### रामभाऊ जोशी हायस्कूल, करकंब

**करकंब, दि.२७ जानेवारी,**



रामभाऊ जोशी हायस्कूल व डीएव्ही महात्मा आनंदस्वामी सरस्वती ज्यु. कॉलेज करकंब येथे गेल्या बारा वर्षांपासून स्वातंत्र्यदिनी दहावीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते तर द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात येते. यंदा दहावीमध्ये द्वितीय आलेल्या सिद्धार्थ दादासाहेब कवडे याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. खोबरखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संस्कृतमध्ये भाषणे केली. संगीत शिक्षक पंचवाडकर यांनी विद्यार्थ्यांसोबत जयतु भारत हे गीत सादर केले. यावेळी प्राचार्य हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, स्काऊट मास्तर एम. के. पुजारी, लक्ष्मण वंजारी, संजय मोहिते, संजय धोत्रे, व्यवहारे, भाजीभाकरे, कालिदास शिंदे उपस्थित होते.



### भीमराव शिंदे फाऊंडेशनतर्फे विविध स्पर्धा

**करकंब, दि.२७ जानेवारी,**

भीमराव शिंदे फाउंडेशनतर्फे जि. प. प्रा. शाळा मुले क्र.१ व मुली क्र.२ करकंब येथे केंद्रप्रमुख खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, निबंध, धावणे आशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी विद्यार्थिनींना भीमराव दादा शिंदे फाउंडेशनच्यावतीने वॉटरबॅग, कंपास, रंगपेटी, चित्रकला वही आदी शैक्षणिक साहित्यांचे बक्षिस वितरणामध्ये वाटप करण्यात आले. याप्रसंगी भीमराव शिंदे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष वंशदीप शिंदे, औदुंबर कुंभार, अनिल शिंदे, प्रकाश शिंदे, जयंत टकले, बाळकृष्ण टेके, कन्हैया मस्के, वंशभूषण शिंदे, दत्ता शिंदे, प्रसाद शिंदे, बंटी शिंदे आदी उपस्थित होते.



### सुयश विद्यालय, बार्शी

**बार्शी, दि.२७ जानेवारी,**

सुयश विद्यालय बार्शी येथे प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भारतीय स्टेट बँकेचे व्यवस्थापक अतुल घोलप, माधुरी घोलप, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये विभागीय स्तरावर तसेच राज्य स्तरावर निवड झालेल्या गुणवंतांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह तसेच मेडल देऊन सन्मान करण्यात आला. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक स्केटिंगचे सादरीकरण केले. देशभक्तीपर नृत्य सादरीकरण केले. सूत्रसंचलन साखरे यांनी तर जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक मंडलिक यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### न्यू इरा पब्लिक स्कूल, चिखलठाण

**करमाळा, दि.२७ जानेवारी,**

न्यू इरा पब्लिक स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज चिखलठाण येथे उद्योजक किरण नवनाथ डोके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्राव्या वायसे हिने गीत गायन केले. यावेळी किरण डोके, संस्थेचे उपाध्यक्ष हरिश्चंद्र बारकुंड, अध्यक्ष डॉ. ब्रिजेश बारकुंड, पालक शिक्षक संघाचे सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन दीपाली वाघमोडे, प्रेरणा तिवारी, हराळे यांनी केले तर आभार कोमल रोकडे यांनी मानले.



करमाळा : भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त जेऊर (ता. करमाळा) येथील भारत हायस्कूलमधील मल्लखांब खेळाडूंनी चित्तथरारक कसरती सादर केल्या. त्यांना पांडुरंग वाघमारे आणि बाळासाहेब शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रजासत्ताक दिनी चेतवले देशप्रमाचे स्फुल्लिंग

- जिल्ह्यातील विविध कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटनांतर्फे ध्वजारोहण
- प्रभारत फेरी, जनजागरण, स्नेहसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ जानेवारी-**

**देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटना, शासकीय, निमशासकीय कार्यालयात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करुन मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्याबरोबरच देशभक्तीपर गीतांचे स्नेहसंमेलन घेण्यात आले. अंगणवाडी, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. बहुतांश शैक्षणिक संस्थांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करुन त्यांचे कौतुक करण्यात आले.**



### जिल्हा परिषद शाळा, चपळगाववाडी

**अक्कलकोट :** तालुक्यातील चपळगाववाडी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये प्रभातफेरी काढून ग्रामपंचायतीसमोर ध्वजवंदन करण्यात आले. श्री रेवणसिध्देश्वर सार्वजनिक वाचनालयात प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनसर नदाफ व माजी अध्यक्ष गौरीशंकर दोड्डाळे यांनी केले. शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा कावेरी परशेट्टी, सरपंच लक्ष्मीबाई अंकलगे, उपसरपंच शबाना नदाफ, ग्राम पंचायत सदस्य निर्मला परशेट्टी, ललिता बन्ने, उज्वला गोविंदे, जावेद नदाफ, दोड्याळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनसर नदाफ, सुजाता यणगुरे, सुनिता गोविंदे, सदस्य स्वामीनाथ परशेट्टी, हुसेनबाशा नदाफ, निसार नदाफ, मुलका नदाफ, तंटामुक्त अध्यक्ष यासिन नदाफ, पोलीस पाटील सिकंदर नदाफ, गुरुसिध्दप्पा गोविंदे, पंडीत परशेट्टी, करीम नदाफ, मल्लिनाथ यणगुरे, शौकतअली नदाफ, रेवणसिध्द इटगळे, मुख्याध्यापक शिवशरण गोविंदे, कडलासकर, अंगणवाडी सेविका मंगल गोविंदे, अश्विनी माशाळकर, आशा वर्कर तेजश्री गोविंदे, ज्योती गोविंदे, स्वरुपा नागणसुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन तुकाराम जाधव यांनी केले तर आभार कडलासकर यांनी मानले.



### नामदेवराव जगताप उर्दू शाळेत खाऊ वाटप

**करमाळा :** कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त नगरसेवक संजय सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांना अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारुक जमादार यांच्या हस्ते खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मजहर नालबंद, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, मौलाना सिकंदर मुलाणी, मौलाना वाजीद उपस्थित होते.



### विद्या विकास मंदिर, उंबरे पागे

**करकंब :** उंबरे पागे येथील विद्या विकास मंदिर व कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कनिष्ठ महाविद्यालात सेवानिवृत्त शिक्षक हिंदुळे यांनी ध्वजारोहण केले. यानिमित्त प्रभातफेरी, विद्यार्थ्यांची भाषणे, ध्वजगीत, हर घर संविधान उपक्रमांतर्गत तृप्ती तळेकर या विद्यार्थिनीसोबत सर्वांनी संविधान वाचन केले. विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. ग्रामस्थ आनंद तोडकरी यांनी विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी प्रशालेस रोप्लांट तसेच गणेश लामगुंडे यांच्या प्रयत्नातून माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मदतीने कॅनरा रोबोको सीआरएस फंडातून ५ विद्यार्थिनींना सायकली भेट देण्यात आल्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन ज्ञानदेव ढोबळे होते. याप्रसंगी राजाराम नरसाळे अध्यक्ष, बी. बी. पाटील, बी. जे. शिंदे, बी. एन. शिंदे उपस्थित होते. एलिमेंट्री व इंटरमिजिएट ड्रॉइंग परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी. महाराष्ट्र राज्य प्रथम श्रेणी वैष्णवी कानगुडे, श्रुतिका पाटील, सानवी कानगुडे, द्वितीय श्रेणी अमृता कोठावळे, आराधना साहू, साक्षी वावरे, प्रगती मुजमुले, भाग्यश्री शिंदे, वैष्णवी वावरे, विद्या सलगर, संदीप सलगर या विद्यार्थ्यांनी चित्रकला शिक्षक एस. जे. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश प्राप्त केले. त्यांचा गौरव करण्यात आला.



### मोडनिंबमध्ये देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण

**मोडनिंब :** प्रजासत्ताक दिनानिमित्त मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सोसायटी, श्री उमा विद्यालय, संजीवन विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महामार्ग पोलिस दूरक्षेत्र, राज न्यू इंग्लिश स्कूल, संगनबसवेश्वर मठ, प्राथमिक आरोग्य केंद्र, मोडनिंब आउट पोस्ट आदी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील शाळा, महाविद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम, वक्तृत्व, स्नेहसंमेलन पार पडले. दत्त चौक येथे विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांच्या नेत्रदीपक सादरीकारणाने उपस्थितांची मने जिंकली. शफीक फाऊंडेशनच्या वतीने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून अंतराळ यान प्रतिकृती साकार करण्यात आले. महामार्ग पोलिस मदत केंद्रात झालेल्या शिबिरात ३० जणांनी सहभाग नोंदवला. छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने भव्य डान्स स्पर्धा घेण्यात आली. यावेळी श्री उमा संस्थेचे अध्यक्ष व्ही. के. पाटील, विश्वस्त आर. बी. पाटील, शेळके, मनसेचे प्रशांत गिड्डे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश वाघमारे, सहाय्यक फौजदार तोरणवाले, पोलिस हवालदार केशव सुर्वे, गणेश हांचे, तलाठी मोहसीन हेड्डे, दिग्विजय कांबळे, भाजप नेते नितीन गडधरे, बालाजी पाटील, निलेश पाटील, मुख्याध्यापक संतोष पाटील, शफी अहमद शेख, कुरण गिड्डे, सरपंच लक्ष्मी पाटील, उपसरपंच अमित कोळी, मोडनिंब प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रथमेश पवार, पो. ह. देवकर, आसिफ अत्तार, दत्तात्रय सुर्वे, कैलास तोडकरी, निलेश गिड्डे, हनुमंत कुंभार, विजय गिड्डे, सागर सुर्वे, मयूर नामदे, विक्रांत वाघमारे, शुभम वाघमारे, धनाजी लादे,

शफीक फाऊंडेशन, रफिक आतार, अमोल माळी,अमोल सरडे, अर्जुन बनसोडे, राजन सावंत, माणिक कणसे, राजेश निंबाळकर, शिवाजी गोरे, किरण तोडकरी, अतुल गाडे, किरण खडके, संजीव शिंदे, अमर ओहोळ, राहुल पाटील उपस्थित होते.



### ग्रामपंचायत कार्यालय, बरुर

**मंद्रुप :** देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन बरूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामपंचायत सदस्या रेणुका भासगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मल्लिकार्जून नंद्राळे यांच्या हस्ते महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा येथे सरपंच शोभा टेळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच सिद्धार्थ तरुण मंडळ भीमनगर येथे केंद्रप्रमुख महांतेश सदरखेड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रगतशील शेतकरी विक्रांत हविनाळे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी उपसरपंच तम्माराया मकणापुरे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. गंगाधर इटकर, रहमान कुडले, सुनिता ख्याडे, पद्मावती चौगुले, वसीमा बाळगे, रेणुका रगटे, ग्रामसेवक एम. आर. परीट, तलाठी शेखर शेड्याळ, सदाशिव कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष शीलवंत शिरढोणकर, पोलीस पाटील श्रीशैल स्वामी, सोसायटी चेअरमन शकील कुडले, व्हाईस चेअरमन सिध्दाराम शिरढोणकर, संजय शिरढोणकर, वैद्यकीय अधिकारी मेघना जाधव, सहाय्यक कर्मचारी पल्लवी खरात, प्रदीप टेळे, सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत डोमनाळे यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, बचत गटाच्या महिला, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर

**अक्कलकोट :** महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सिद्राम पुजारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सेमी इंग्रजी पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या चिमुकल्यांनी सुरेश जाधव यांच्या हार्मोनियमच्या साथीने स्वागत गीत सादर केले तर याच विभागाच्या अनेक बालकांनी इंग्रजी व मराठीतून अतिशय सुंदर भाषणे व नृत्याचे सादरीकरण केले. बालवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हन्नूरच्या विद्यार्थ्यांनीदेखील कलाविष्कार सादर केला. उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी यांनी मुलांना बक्षीस देऊन कौतुक केले. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य सिद्धेश्वर कल्याणशेट्टी होते. यावेळी सरपंच सोनाली तळवार, उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी, ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर, माजी उपसरपंच शरणप्पा हेगडे, ग्रामविकास अधिकारी थोरात, माजी मुख्याध्यापक विलास बिराजदार, विश्वनाथ चव्हाण, मुख्याध्यापक श्रीकांत राठोड, अशोक साखरे, पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, शशिकांत अंकलगे उपस्थित होते. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे यांनी केले. सूत्रसंचालन मल्लम्मा चप्पळगाव यांनी केले तर आभार स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.



### तहसील कार्यालय, करमाळा

**करमाळा :** करमाळा तहसीलच्या आवारात आ. नारायणआबा पाटील यांच्या उपस्थितीत तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी पोलीस निरीक्षक विनोद घुगे उपस्थित होते. नाशिक-सोलापूर बसला मिरजगाव येथे अचानक लागलेल्या आगीमध्ये प्रसंगावधान दाखवून सर्व प्रवाशांचे प्राण वाचवल्यामुळे देवांश सागर वडे व परिवारासह कृष्णा भागवत यांनी वरिष्ठ राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत ब्रँझ पदक मिळवल्याबद्दल सन्मान करण्यात आला. त्यावेळी शिवरायांच्या आम्ही लेकी आम्ही शिवकन्या या गीतावर लेझिम नृत्य, देशभक्तीपर मिक्स गीतावर लेझिम नृत्य, मल्लखांब प्रत्यक्षित, बेटी हिंदुस्थानी गीतावर लेझिम नृत्य, शिवकालीन शस्त्रकला व कराटे डेमो अशा विविध उपक्रमाने तहसील आवार देशभक्तीमय झाला.



### जिजाऊ गुरुकुल, खांडवी

**बार्शी :** खांडवी येथील जिजाऊ गुरुकुल येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी सुनील भराडिया उद्योजक, पूजा गव्हाणे पोलीस उपनिरीक्षक, श्वेता सिंग उपाध्यक्ष, आनंदी परिवार फाउंडेशन, डॉ. कुमार गायकवाड आणि आबा फाउंडेशनचे सदस्य उपस्थित होते. डॉ. कुमार गायकवाड यांनी १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन) आणि २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून असलेला फरक प्रभावीपणे समजावून सांगितला. विद्यार्थ्यांना देशप्रेम व संविधानाविषयी जागरुकता निर्माण करण्याचा त्यांचा हा प्रयत्न उल्लेखनीय ठरला. कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे जिजाऊ गुरुकुलच्या कॅडेट्सने सादर केलेला आर्मी डेमो, त्यांच्या कौशल्यपूर्ण प्रदर्शनाने उपस्थितांचे मन जिंकले. विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच आदर्श विद्यार्थी म्हणून मृण्मयी गपाट, आदर्श शिक्षक म्हणून सद्दाम शेख व आदर्श पालक म्हणून रविंद्र जामदार यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षाताई घाडगे, प्राचार्य संदेश कदम, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, फिजिकल कोच जे. बी. शिंदे (मेजर), पालक प्रतिनिधी विनोद गपाट व दीपक कवडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवाजी माने व मनीषा मोटे यांनी केले, तर आभार दीपाली कादे यांनी मानले.

### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालय, बार्शी

**बार्शी :** येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी येथे प्रजासत्ताक दिन श्री जैनाश्रमचे श्राविका शोभाबेन मुकेश संचेती व मितेश मुकेश संचेती, खुशबू मितेश संचेती, संचेती परिवार यांच्या हस्ते ध्वजरोहनाचा कार्यक्रम व सामुहिक राष्ट्रगीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे ते प्रमुख पाहुणे होते.प्रथमथः वाचनालयाचे ऑ. सेक्रेटरी यांनी सुत्रसंचालन व प्रास्ताविक केले. यावेळी जैनाश्रमचे अध्यक्ष जयचंद सुराणा, उपाध्यक्ष चंद्रकांत कोठारी, ऑ. सेक्रेटरी ड. दिनेश श्रीश्रीमाळ, ट्रस्टी भारतभाऊ कोटेचा, गौतम बोथरा, संजय श्रीश्रीमाळ, माजी अध्यक्ष अशोक कुंकूलोळ, ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, रुपेश कांकरिया, अशोक कांकरिया तसेच श्री जैनाश्रमचे सर्व पदाधिकारी,व संचालक मंडळ,श्रावक श्राविका, वाचनालयाचे वाचक वर्ग, वाचक सभासद, महिला वर्ग ही मोठ्या संख्येने उपस्थित होते, संचालक आनंद सुराणा यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे, सहा.ग्रंथपाल पल्लवी तौर, सेवक रेखा यादव यांनी परिश्रम घेतले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मंगळवेढा आगारात १२३ कर्मचाऱ्यांची नेत्र तपासणी

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि.२७ जानेवारी -

मंगळवेढा आगारात लाईफ व्हीजन मेडिकल फाउंडेशन व राज्य परिवहन महामंडळ घेण्यात आलेल्या शिबिरात १२३ कर्मचाऱ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

यासाठी लाईफ व्हीजन मेडिकल फाउंडेशनचे डॉ. महेश पाटील, डॉ. श्रुती गायकवाड, डॉ. विजया भांबरे यांनी मोलाचे योगदान दिले.



यावेळी सहायक वाहतूक अधीक्षक शरद वाघमारे, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी, सहायक वाहतूक निरीक्षक रावसाहेब चव्हाण, वरिष्ठ लिपिक परमेश्वर भालेकर, अमोल काळे, धनाजी पाटील, उमेश ननवरे, वाहतूक नियंत्रक संतोष चव्हाण, अमोल शिनगारे, सचिन माने, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी अभय बंडगर, वल्लभ ताटे, समर्थ गवळी उपस्थित होते. या शिबिरास सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी भेट दिली. आगार व्यवस्थापक संजय भोसले यांनी आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### गणपती फार्मसीची एसजी फाइटो औषध निर्माण कंपनीला भेट

टेंभुर्णी, दि. २७ जानेवारी-

अकोले खुर्द येथील श्री गणपती फार्मसी महाविद्यालयातील डी.फार्मसी विद्यार्थ्यांनी कोल्हापूरमधील एस. जी. फाइटो औषधनिर्माण कंपनीला भेट दिल्याचे प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी सांगितले. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना एसजी फाईटोमधील व्यावसायिकांचे निरीक्षण करण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. तसेच फार्मासिटिकल क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आणि पद्धतीबद्दल देखील माहिती मिळाली. त्यावेळी विद्यार्थ्यांनी कंपनीतील प्रोडक्शन, पॅकेजिंग, वेअर हाऊस, कॉलिटी कंट्रोल, रिसर्च अँड डेव्हलपमेंट अशा विविध डिपार्टमेंटला भेट दिली व त्यांच्या शंकांचे निरसन ही करण्यात आले. संपूर्ण भेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अनुभवाला मार्गदर्शन करण्यात सोबत असलेल्या शिक्षकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ही भेट विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे विस्तारित असलेल्या चांगल्या गोलाकार शिक्षणासह सुसज्ज करणे संस्थेच्या व्यापक धोरणांचा एक भाग होता. एस. जी. फाइटोला दिलेली ही भेट एक अविस्मरणीय आणि समृद्ध अनुभव देणारी ठरली. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे, प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे प्रा. शैलेश पेंडोर, प्रा. रूपाली राऊत, प्रा. पूजा शिरसकर उपस्थित होते.



### पंढरपूर सिंहगड पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

पंढरपूर, दि. २७ जानेवारी-

येथील सिंहगड पब्लिक स्कूलचे १५ वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाल्याची माहिती स्कूलच्या प्राचार्या स्मिता नवले यांनी दिली. उद्घाटन मारुती लिगाडे, गटशिक्षणाधिकारी पंढरपूर व दुस-या दिवसाचे उद्घाटन श्रीकांत बडवे महाजन संस्थापक कलासाधना सांस्कृतिक मंडळ, पंढरपूर यांच्या हस्ते झाले. डॉ. आशा बोकील, कॅम्पस डायरेक्टर कैलाश करांडे, प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर आदी उपस्थित उपस्थित होते. या स्नेहसंमेलनात भारतीय सण या संकल्पनेवर सुरेख सादरीकरण विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्वच शिक्षकांनी या विषयांना यशस्वीपणे मांडताना विविध कलाप्रकार, नृत्यप्रकार, विशिष्ट पेहराव, संगीत, रंगमंच सजावट यांचा सूरेख वापर केला. सरस्वती वंदना, गणेश वंदना, तबला वादन, ऑर्केस्ट्रा, राष्ट्रीय व जागतिक मुल्य विषयक नृत्य व काही नाटक विद्यार्थ्यांनी सादर केले.



### पिलीव परिसरात भाजपाची विक्रमी सदस्य नोंदणी करा : तालुकाध्यक्ष शरद मदने

पिलीव, दि. २७ जानेवारी-

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे भाजपच्या सदस्य नोंदणीसाठी नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पिलीव परिसरातील पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी यासह पिलीव जि. प. गटातील सर्वच गावात भाजपाची सदस्य नोंदणी घरोघरी जाऊन करावी असे आवाहन भाजपचे तालुकाध्यक्ष अॅड. शरद मदने यांनी केले. ते पिलीव येथे आयोजित बैठकीत बोलत होते. यावेळी लक्ष्मण गोरड, डॉ. निलेश कांबळे, अतुल नष्टे, प्रमोद भैस, संजय पाटील, विक्रम सुळे, रामभाऊ गोरड, जयसिंग सुळे, अंकुश भैस, आनंता जामदार, मयुर भैस, फिरोज शेख, प्रदीप चोबे, संकेत देशमुख उपस्थित होते. अतुल नष्टे यांनी आभार मानले.



### रेखाकला स्पर्धेत फुले विद्यालयाचे यश

मंद्रुप, दि. २७ जानेवारी-

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला स्पर्धेसाठी ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ऐलिमेंटरी परीक्षेचा निकाल ८७ टक्के लागला असून अमरिन शेख, आयेशा मोमीन, कौसर शेख, प्रियांका काळे, सानिका कोरे, सोनाली रावत व वैष्णवी म्हेत्रे या 'अ' श्रेणीत उत्तीर्ण झाले तर आर्या वाघमोडे, आदिती पुजारी, आकाश वाघमोडे, अंकिता शिंदे, मुस्कान बिराजदार, प्रगती विजापूरे, प्रणिती वाघमारे, प्रतीक्षा वायम डे, रूक्सार शेख, स्नेहल गायकवाड आदि ' ब ' श्रेणीत उत्तीर्ण झाले. शासकीय रेखाकला परीक्षा इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असुन बाळराजे पवार, साक्षी जोडमोटे, जानवी शिंदे , प्रथमेश रेवतगाव व शुभांगी स्वामी यांनीही यश संपादन केला आहे. या परीक्षेसाठी २६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक भालचंद्र शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भेंडच्या शिवारात ११ देशांचे १९ संशोधक

## भूजल सर्वेक्षण संलग्न इक्रिसॅट संस्थेचा पीक पद्धती, जलसंधारण प्रकल्प पाहणी दौरा

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. २७ जानेवारी-

माढा तालुक्यातील भेंड येथे अकरा देशाच्या संशोधन अधिकाऱ्यांनी भेंड गावास भेट दिली. भूजल सर्वेक्षण संलग्न आंतरराष्ट्रीय अर्ध-शुष्क कटिबंधातील पीक संशोधन संस्था (इक्रिसॅट) संस्थेच्या माध्यमातून भेंड येथे पिक पद्धती आणि जलसंधारणाची कामे केली आहेत.

त्या अनुषंगाने अकरा देशाच्या एकोणवीस संशोधन अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला.इक्रिसॅटच्या माध्यमातून गावातील पर्जन्यमानावर आधारित पीक पद्धती, जलसंधारण, पाणी पातळीसाठी नियोजन करण्यात येत आहे. त्यातून अंतरपीक, रब्बी हंगामी पिके, फळपिके, मिलेट्स आदी जवळपास दीडशे ते दोनशे एकरावर क्षेत्र लागवडीखाली आले आहे.विज्ञान-आधारित पर्जन्य जलसंचयाच्या माध्यमातून आणि व्यवस्थापन तंत्रज्ञान वापरून कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता सुधारण्याच्या अनुषंगाने संभाव्य सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्ध-शुष्क कटिबंधातील पीक संशोधन संस्था कार्यरत आहे. शेंगा असलेली धान्ये म्हणजेच हरभरा, तुरी तसेच कोरडवाहू तृणधान्ये म्हणजेच ज्वारी, बाजरी आणि नाचणी यांची उत्पादक क्षमता, जुळवून घेण्याची क्षमता आणि परिणाम तसेच गुणवत्ता वैशिष्ट्ये वाढवण्यासाठी या पिकांचा जनुकीय विकास करण्यासाठी काम करत आहे. धान्ये, कोरडवाहू तृणधान्यांची उत्पादक क्षमता, तसेच गुणवत्ता वैशिष्ट्ये वाढवण्यासाठी या पिकांचा जनुकीय विकास याचा समावेश आहे. यामुळे शेती पिकांच्या विकासासाठी मदत होणार आहे.यासोबतच संशोधन अधिकाऱ्यांनी कोअर वाल, स्वयंचलित हवामान केंद्र, पीक पद्धतीच्या अभ्यासासाठी तांत्रिक उपकरणे,ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देऊन पाहणी केली. प्रारंभी संशोधन अधिकाऱ्यांचे आगमन होताच त्यांचे औक्षण करून शाल, श्रीफळ आणि पारंपरिक फेटा बांधून स्वागत करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीताने स्वागत केले.याप्रसंगी ग्लोबल डायरेक्टर डॉ. मांगीलाल जाट, डॉ. शैलेंद्र कुमार, आयडीसी प्रमुख डॉ. रमेश सिंह, डॉ कौशल गर्ग, संशोधक डॉ इसयर मजिद, माजी सभापती शिवाजी कांबळे आदि उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ संतोष दळवी, वैज्ञानिक अधिकारी सागर रामदासी, अनिल कुमार, कृष्णपाल परमार यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सरपंच डॉ. मनीषा दळवी यांनी केले तर आभार डॉ. संतोष दळवी यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा. रणदिवे यांनी केले. प्रिती भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



भूजल सर्वेक्षण आणि इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर सेमी एरिड ट्रॉपिक्स अंतर्गत भेंड येथे जलसंधारण आणि पर्जन्य मानावर आधारित पीक पद्धतीचे काम पूर्णत्वास येत आहे. जवळपास २०० एकर क्षेत्रात हरभरा, ज्वारी, मिलेट्स नाचणी, आंबा आदी लागवड आहे. कमी पाण्यामुळे पाण्याची बचत, नवीन सुधारित वाणाच्या वापराने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात विक्रमी वाढ झाली.

**-डॉ. शैलेंद्र कुमार,** ग्लोबल डायरेक्टर इक्रिसॅट

भूजल सर्वेक्षण आणि इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर सेमी एरिड ट्रॉपिक्स अंतर्गत भेंड येथे प्रकल्प सुरू आहे. शेतकरीही त्यांना चांगला प्रतिसाद देत आहेत. येणाऱ्या काळातील भीषण पाणी टंचाईवर मात करण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे.

**-डॉ. संतोष दळवी,** माजी सरपंच

**अकरा देशातील संशोधन अधिकाऱ्यांची भेट**

भेंड येथे जलसंधारण व पीक पर्जन्यमानावर आधारित पीक पद्धती पाहणी दौऱ्यासाठी जगभरातील अकरा देशातून १९ संशोधन अधिकारी उपस्थीत होते. फिजी, कंबोडिया, कझाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, नायजेरिया, एक्युडोर, इथोपिया, घाना, केनिया, माली येथून संशोधन अधिकारी आले होते.



# मंगळवेढ्यात सायकल रॅलीतून मतदान दिन जनजागृती

### सायकलस्वारांचा सन्मान

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि.२७ जानेवारी-

मंगळवेढा तहसीलदार मदन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय व वारी परिवार सायकल क्लबच्या वतीने २५ जानेवारी या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दामाजी चौक ते तहसील कार्यालय या मार्गावर मतदान जनजागृती सायकल रॅली काढून राष्ट्रीय मतदार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरवातीस मतदान करण्या संदर्भात सर्वांना शपथ देण्यात आली यावेळी तहसीलदार मदन जाधव व निवडणूक नायब तहसीलदार जयश्री स्वामी उपस्थित होत्या. यावेळी मदन जाधव म्हणाले राष्ट्रीय लोकशाहीला बळकट करण्यामध्ये राष्ट्रीय मतदार दिनाचे खूप महत्त्व आहे आपल्या देशाच्या संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार खूपच पवित्र आहे निवडणुकीवेळी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रापर्यंत प्रत्येक मतदारांनी जाऊन मतदान करण्याचा आपला हक्क बजावीला पाहिजे यासाठी राष्ट्रीय मतदान दिनाचे खूप महत्व आहे. लोकसभा निवडणुकीत ज्या गावांमध्ये मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे, त्या गावांमध्ये विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे, यासाठी प्रशासनाच्या वतीने निवडणूक अधिकारी सचिन इथापे व आम्ही सर्वजण ग्रामीण भागात फिरलो. परंतु आम्हाला जे जमले नाही ते वारी परिवार सायकल क्लबने मतदान जनजागृती करून राष्ट्रीय कार्यात केलेले काम खूपच कौतुकास्पद आहे असे सांगितले. यावेळी विधानसभा निवडणुकीत १३ गावात मतदान जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढविल्याबद्दल तहसील कार्यालयाच्या वतीने वारी परिवार सायकल क्लबमधील सर्व सायकल स्वारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जयंत पवार, मोहन जुदळे, संजय जावळे, भारत नागणे, समर्थ महामुनी, सिद्धेश्वर डोंगरे, प्रमोद महामुनी, पवन टेकाळे, विराज डोरले, गणेश मोरे, रतिलाल दत्तू, समीर गुंगे, अरुण गुंगे, पांडुरंग कौन्डुभैरी, चंद्रकांत चेळेकर, प्रकाश मुळीक, महेश डोरले, प्रकाश दिवसे, यश महामुनी, शिवतेज कलुबर्मे, प्रफुल्ल सोमदळे, पांडुरंग नागणे, प्रा. महेश अलिगावे, पृथ्वीराज कलुबर्मे, आदित्री गुंगे, विष्णू भोसले, आदित्री गुंगे, ओम नागणे, आदिती साळुंखे, दत्तात्रय भोसले, महादेव धोत्रे, सतिश दत्तू, तहसिल कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. विनायक कलुबर्मे यांनी केले.



# मराठा आरक्षणासाठी बार्शीत आनंद काशीद यांचे उपोषण सुरु

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २७ जानेवारी-

मराठा समाजाला ओबीसी म धला आरक्षण मिळावे, याकरिता जरांगे-पाटील यांच्या साथीला बार्शीमध्ये आनंद काशीद यांचे आमरण उपोषणाची अर्धनग्न अवस्थेत लोटांगण घेत आमरण उपोषणास शनिवारपासून सुरुवात केली आहे.

जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी या ठिकाणी चालू केले. त्यांना पाठिंबा म्हणून बार्शीत आनंद काशीद यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली. मराठा समाज मागील वर्षी नवी मुंबई येथे आला असता जरांगे-पाटलांच्या माध्यमातून सगे सोयरे कायदा करू, असे आश्वासन दिले, गुलाल उधळा व पंधरा दिवसात कायदा करु असे आश्वासन दिले. पण वर्ष झाले तरी अदयापपर्यंत कायद्यात रुपांतर केल नाही. ही समाजाची फसवणूक आहे. यावेळी बालाजी डोईफोडे, विक्रम घायतिडक, शोएब सय्यद, रवींद्र मुठाळ, रिंकू कांदे, अभिजित मोरे व समाज बांधव उपस्थित होते.



# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. २७ जानेवारी-

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मौजे निंबाळचे मनिप्रश्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजींचे पाद्यपूजन रूपाली व डॉ. विपुल शहा या दाम्पत्यानी केले. त्यानंतर पूज्य आप्पाजींच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आम दार सचिन कल्याणशेट्टी हे उपस्थित होते. यावेळी बोलताना नेहमीच्या चित्रपटातील गाण्यावरून डान्स व कर्कश आवाजाला फाटा देऊन अध्यात्मिक, पौराणिक कथेच्या माध्यम तून विद्यार्थ्यांना सुसंस्कारित घडविण्याचे कार्य या शाळेतून होत असल्याबद्दल म नि प्र श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी यानी समाधान व्यक्त केले.

या स्नेहसंमेलनात कृष्ण जन्मापासून ते कृष्णानी महाभारत युद्धामध्ये अर्जुनाला सांगितलेले उपदेश तथा गीतापर्यंत श्रीकृष्णाच्या जीवन चरित्रावर आधारित अतिशय सुंदर कृष्णावतार साकारला. त्यामुळे या शिक्षण संकुलात अध्यात्मिक, भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीला पन्नास विद्यार्थ्यांनी एका सुरात भगवद्गीतेतील श्लोकांचे पठण केले, त्यानंतर देवकी विवाह आणि कारावास, कृष्ण जन्म आणि जन्माष्टमी सोहळा, कृष्ण बाललीला, कृष्ण नटखट लिला, गोपालकाला, राधा-कृष्ण गीत, नागम र्दन (कालिया डान्स), मुकुंदा- मुकुंदा समुह गीत, गोवर्धन पर्वत, गोपिया गीत-कान्हा सो जा जरा, कंस वध, सुदामा भेट, महाभारत शीर्षक गीत, पांडव भेट, द्रौपदी-कृष्ण सखाबंधन, द्रौपदी विरहरण, शांती प्रस्ताव, सेना चुनाव, कौरव पांडव युद्ध व शेवटी विष्णूच्या दशावताराने कार्यक्रमाची सांगता झाली. वरील सर्व प्रसंगाचे हुबेहूब चित्र,संभाषण व समूहगीताने विद्यार्थी व पालकानी मनसोक्त आनंद लुटला. यावेळी संस्थेचे संचालक म ल्लिनाथ कल्याणशेट्टी, मुकुंद पत्की, भीमराव साठे, मल्लिकार्जुन मसुती, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, रूपाली शहा, पुनम कोकळगी, डॉ विपुल शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, अनंत चैतन्य प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे, बापूजी निंबाळकर, दत्तकुमार साखरे, मल्लम्मा पसारे, कांतू धनशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक रूपाली शहा, सूत्रसंचलन कल्पना स्वामी, दिगंबर जगताप, सागर मठदेवरू यानी केले तर उपस्थितांचे आभार आरती थोरात यांनी मानले.

# भाविकांचे आरोग्य, स्वच्छतेला प्राधान्य : प्रांताधिकारी सचिन इथापे

### माघी यात्रा नियोजन बैठक

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २७ जानेवारी-

माघ शुद्ध एकादशी शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी असून, या यात्रेचा कालावधी ०३ ते १२ फेब्रुवारी असा आहे. या यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य, स्वच्छतेला प्राधान्य देवून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच सर्व विभागांनी सोपविलेल्या कामांची जबाबदारी चोखपणे पार पाडावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



**यात्रा घेण्यात आला आढावा**

यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असल्याचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी सांगितले. यावेळी नगरपालिका प्रशासनाकडून वारी कालावधीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा, स्वच्छता, तात्पुरते शौचालय, कचरा व्यवस्थापन, जंतनाशक फवारणी आदी बाबबतची माहिती मुख्याधिकारी प्रशांत यांनी दिली. यावेळी अन्न-औषध प्रशासन, परिवहन, महावितरण, आरोग्य आदी विभागांचा आढावा घेण्यात आला.

माघ वारी पुर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.महेश सुडके, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, न.पाचे अभियंता पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंताभोळे यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने शुध्द व पुरेसा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, नदीपात्रातील वाळवंटाची व घाटाची स्वच्छता करावी, ६५ एकर व व नदीपात्रात तात्पुरते शौचालयाचे उभारणीचे नियोजन करावे. ६५ एकरमध्ये भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. शहरातील प्रमुख रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत. आरोग्य विभागाने यात्रा कालावधीत पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. नदी पात्रात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील याबाबत पाटबंधारे विभागाने नियोजन करावे. मंदिरालगत विक्रीसाठी बसणाऱ्या पथविक्रेत्यांवर मंदिर, पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने खाद्यपदार्थांच्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमावीत अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या. मंदिर समितीच्या वतीने पत्रा शेड, दर्शन रांग, दर्शन मंडप या ठिकाणी पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच दि. ७ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना मोफत चहा, नाष्टा व भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## केंद्रीय प्राथमिक शाळेत लोकसहभागातून बाल वाचनालय सुरु

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२७ जानेवारी -**

तुळजापुर तालुक्यातील इटकळ येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सावित्रीमाई फुले बाल वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

माहे जुलै २०२४ मध्ये शिक्षण सप्ताह साजरा करत असताना शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी बाल वाचनालय सुरु करण्यासाठी लोक सहभागाचे आवाहन केले. या आवाहनाला भरपूर प्रतिसाद मिळाला आणि २५ हजार बाल वाचानालयासाठी लोक सहभाग जमा झाला. या लोक सहभागातून शाळेतील पदवीधर शिक्षक श्री सतिश ढोणे सर यांनी ५५ हजार रुपयांचे शालेय विद्यार्थ्यासाठी विविध पुस्तके खरेदी केले. दि.२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी सरपंच साहेबराव क्षीरसागर व शाव्यस.चे अध्यक्ष प्रविण माशाळकर यांच्या हस्ते बाल वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यापसंगी उपसरपंच फिरोज मुजावर, विनोद सलगरे, समीर मुजावर, श्रीकृष्ण मुळे, अविनाश पाटील, नितीन कांबळे, तानाजी गायकवाड, रविंद्र गायकवाड, सतिश ढोणे, नागेश स्वामी, सुधाकर कांबळे, बालाजी कदम, वैशाली देशमाने, संगीता घुगे, राजश्री बागडे, संजीवनी पेठे उपस्थित होते.




## संक्षिप्त वृत्त...



### मदर कांचनमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**धाराशिव, दि.२७ जानेवारी-**

येथील मदर कांचन कॉलेज येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन स्वातंत्र्य सैनिक काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंदलकर, संस्थेचे सचिव अतुल अजमेरा, योगिता अजमेरा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महात्मा गांधीजीच्या प्रथिमेचे पुजन करुन ध्वजारोहन करण्यात आले. डॉ. इंदलकर यांनी प्रजासत्ताक दिनानिम्मीत विद्यार्थ्यींना मोलाचे मार्गदर्शन केले. व आभार प्रदर्शन राठोड रिमझीम यांनी केले. कार्यक्रमास राठोड, सरवदे, देशमुख, कटकदोड, राऊत, सुप्रिया, सरवदे, अंकिता, देटे, कानडे, करण भक्ते, बन्सल क्लासेसचे आणि युरोकिडस सर्व स्टाफ विद्यार्थी विद्यार्थ्यींनी उपस्थित होते.



### 'महाजन'मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**धाराशिव, दि.२७ जानेवारी-**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्था सदस्य डॉ. अभय शहापूरकर, कमलाकर पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी यशवंत व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विविध विभागणी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पी.एम.उषा) यांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या अद्यावत अश्या संगणक कक्षाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. कृष्णा तेरकर, प्रा.डॉ. समीर बावीकर, प्रा. प्रशांत गुरव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. कृष्णा तेरकर यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.



### आश्रम शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**धाराशिव, दि.२७ जानेवारी-**

विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक व जवाहर कनिष्ठ महाविद्यालय येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यापसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष विद्यानंद राठोड व संस्थेचे सचिव तथा प्राचार्य दयानंद राठोड, प्रशासकीय अधिकारी जगताप बी.यु. यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी वर्षभरामध्ये विविध स्पर्धेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक साकळे बी.एस. यांनी केले. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग नोंदवून भाषणे केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवकन्या भोसले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद राठोड यांनी केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### शेतकरी सन्मान निधीसाठी शिबिर

**जळकोट, दि.२७ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या तुळजापूर कृषी कार्यालय व श्री गणेश कृषी विज्ञान मंडळ व कृषी वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जळकोट गावातील शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री सन्मान निधी योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे ई - केवायसी प्रलंबित आहेत. अशा लाभार्थी शेतकऱ्यांसाठी शिबिर घेऊन ई- केवायसी करण्यात आली. या योजने संदर्भात शंकांचे निरसन करण्यात आले. शिबिराचा शुभारंभ सरपंच गजेंद्र कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रा.पं. सदस्य जीवन कुंभार, मेघराज किलजे, कल्याणी साखरे, राजकुमार पाटील, कृषी सहाय्यक ए.वी. बनसोडे, कृषी सहाय्यक जी.एस. कांबळे, जयसिंग कदम, ग्रा.पं. कर्मचारी, गावातील शेतकरी उपस्थित होते.

### बर्ड फ्लूबाबत अफवा पसरवू नका

**धाराशिव, दि.२७ जानेवारी-**

बर्ड फ्ल्यूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पशुसंवर्धन विभाग अलर्ट झाला आहे. जिल्हा प्रशासनाकडूनही उपाययोजना करण्यात येत आहे. उकडलेली अंडी, चिकन खाणे पूर्णपणे सुरक्षित आहे. तसेच बर्ड फ्ल्यूबाबत कोणीही अफवा पसरवू नका, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. जिल्ह्यात या आजाराचा कोणताही प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. उकडलेली अंडी, चिकन खाणे पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यामुळे अंडी व चिकन शिजवून खाण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

---

### व्हीआयपी दर्शन पास रजिस्टरमध्ये चुकीच्या नोंदी करून व्हीआयपी दर्शनास सोडण्याचे गंभीर प्रकार...

# तुळजाभवानी मंदिरात व्हीआयपी स्पेशल दर्शन पासचा घोटाळा

**दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कसलीही शहानिशा न करता स्वतःच्या फायद्यासाठी मनमानी करत चुकीच्या नोंदी करून पीआरओचा मनमानी कारभार चव्हाट्यावर**









**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

श्री तुळजाभवानी मंदिरात व्हीआयपी स्पेशल दर्शन पासच्या घोटाळ्याची चर्चा नेहमीच मंदिर परिसरात ऐकण्यास मिळते. व्हीआयपी स्पेशल दर्शन पास रजिस्टरमध्ये चुकीच्या नोंदी करून व्हीआयपी नसणाऱ्या भाविकांना देखील व्हीआयपी असल्याचे भासवून दर्शनास सोडले जात आहे, अशी तक्रार येथील समाजसेवक जयकुमार पांढरे यांनी विभागीय आयुक्त तसेच मंदिर संस्थांचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

२८ डिसेंबर रोजी केलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे, की मंदिर प्रशासनातील पीआरओ प्रशांत जाधव यांनी दुपारी एक ते दीडच्या दरम्यान व्हीआयपी रजिस्टर वर चुकीच्या पद्धतीने नोंद करून पास दिले.

त्यात त्यांना व्हीआयपी दर्शन पास नोंद रजिस्टर पाहण्याची विनंती केली असता त्यांनी तुम्हाला रजिस्टर पाहण्याचा किंवा रजिस्टरचे फोटो काढण्याचा अधिकार नाही. याबाबतीत तुमचा काय संबंध अशी आरेवारीची भाषा वापरून दमदाटी करून तुम्ही तहसीलदार मॅडमकडे चला असे सांगितले पांढरे यांनी पीआरओ गणेश मोटे यांना तुम्हाला व्हीआयपी दर्शन पास देण्याचे आदेश आहेत का? अशी विचारणा केली असता त्यांनी नाही म्हणून सांगितले. पण त्यांच्या नावे व्हीआयपी दर्शन पासची नोंद करून दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कसल्याही प्रकारची शहानिशा न करता व्हीआयपी दर्शन पास दिले. अशा प्रकारे कोणतेही अधिकार आमदार व खासदार त्याचबरोबर त्यांचे पीए यांचा कसलाही प्रकारचा कार्यालयीन आदेश आलेला आहे की नाहीत किंवा दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कसलीही शहानिशा न करता स्वतःची मनमानी करत चुकीच्या नोंदी करून व्हीआयपी दर्शन पास दिले जात आहेत. तरी या सर्व प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मंदिरामध्ये होत असलेल्या व्हीआयपी स्पेशल पासच्या घोटाळा प्रकरणी दि.२३ डिसेंबर रोजी माहितीचा अधिकार टाकून माहिती मागितली असता एक महिना उलटून गेला तरीही मंदिर प्रशासनाकडून कुठलीही माहिती पांढरे यांना देण्यात आली नाही. मंदिर प्रशासनाकडून कुठलेही सहकार्य मिळत नसल्याने २७ जानेवारी रोजी कलम १८ (१) नुसार पांढरे यांनी राज्य माहिती आयोग यांच्याकडे पुढील अपील केले आहे.

### रजिस्टरवर नोंदी एकीकडे पास दुसरीकडे मंदिर प्रशासनाचा मनमानी कारभार

तुळजाभवानी मंदिरात स्पेशल व्हीआयपी दर्शन पासवर व्हीआयपी व्यक्तीचा फोटो घेतला जात नाही. तर पाचशे रुपये दर्शन पेड पासवर भाविकांचा फोटो घेतला जातो. पीआरओ ऑफिसमध्ये व्हीआयपी व्यक्तीच्या नोंदी रजिस्टरवर घेतल्या जातात आणि पास काऊंटर प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यात ठेवण्यात आले आहे, असे करण्यामागे मंदिर प्रशासनाचा हेतू काय असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. नोंदी एकीकडे पास दुसरीकडे मंदिर प्रशासनाचा मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसून येत आहे. रजिस्टरला नोंदी ज्या ठिकाणी घेतल्या जातात. त्याच ठिकाणी व्हीआयपी भाविकांना दिल्यास व्हीआयपी स्पेशल दर्शन पासमध्ये पारदर्शकता आणता येईल. व्हीआयपी स्पेशल दर्शन पास रजिस्टर मधील नोंदी आणि गेटमधून सोडण्यात आलेल्या भाविकांचे सीसीटीव्ही फुटेज यांच्यात बरेच फरक येत असल्याच्या देखील यापूर्वी तक्रारी करण्यात आल्या होत्या. अनेक समाजसेवकांनी यापूर्वी रजिस्टर मधील नोंदी आणि सीसीटीव्ही फुटेज यांची पाहणी करून दोषींवर कारवाई करण्याच्या मागण्या केल्या होत्या. पण मंदिर प्रशासनाची याबाबत असलेली उदासीनता सध्या जयकुमार पांढरे यांनी दिलेल्या तक्रार आणि माहितीचा अधिकार यातून चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे.

---

## उद्या पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

रोजगार व स्वंयरोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षीत बेरोजगार नोकरी इच्छुक उमेदवार यांना नोकरी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उदयोजकता नाविन्यता विभागामार्फत २९ जानेवारी रोजी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे धाराशिव येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र धाराशिव आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे संयुक्त विद्यमाने बुधवार, २९ जानेवारी रोजी धाराशिव जिल्ह्यातील नोकरी इच्छुक व पात्रताधारक पुरुष व महिला उमेदवारासाठी हा पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्यात खाजगी क्षेत्रातील नामांकित २५ उद्योजक व आस्थापनांनी सहभाग घेतलेला असून यामाध्यमातून ४६० पदे अधिसूचित केलेली असून पात्र व इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड करणार आहे. या मेळाव्यामध्ये जिल्ह्याबाहेरील यशस्वी अॅकडमी फॉर स्किल पुणे, मॅट्रिक्स रोबोटिक्स पुणे, स्पेस स्किल ट्रेनिंग सेंटर लातूर व उर्वरीत धाराशिव जिल्ह्यातील आस्थापना मेळाव्यात सहभागी

आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी केले आहे.

## नॅचरल शुगरचे उत्पादीत ६ लाख ११ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

धाराशिव, लातूर व बीड जिल्हयातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वरदान ठरलेल्या नॅचरल शुगरच्या चालु गाळप हंगामा मधील उत्पादीत ६ लाख ११ हजार १११ व्या साखर पोत्याचे पूजन प्रजासत्ताक दिनाचे औचीत्यसाधुन कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबर यांचे हस्ते आणि नॅचरल शुगरचे तज्ज्ञ संचालक ज्ञानेश्वरराव काळदाते यांचे अध्यक्षते खाली विधीवत पूजा करून रविवार दि.२६ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले.

कारखान्याचे मुख्य गेटचे प्रांगणात बी.बी. ठोंबरे यांचे हस्ते प्रजासत्ताक दिना निमित्त ध्वजारोहनाचा कार्यक्रम कारखान्याचे संचालक, प्रवर्तक यांचे उपस्थितीत उत्साहात पार पडला. साखर पोते पुजन प्रसंगी बोलताना बी.बी. ठोंबरे यांनी कारखान्याचा गळीत हंगाम सुरळीत सुरू असून अंतीम टप्यात आल्याचे त्यांनी सांगितले. चालु वर्षी ऊसाला हेक्टरी टनेज अपेक्षीत न मिळाल्याने गाळप उद्दीष्टापेक्षी कमी होईल असा अंदाज आहे. त्यामुळे उर्वरीत सर्व ऊस कारखान्यास गाळपास देवून सहकार्य करावे असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

नॅचरल शुगरने सेंद्रीय खत निर्मितीमध्ये पाऊल टाकले असून त्याचे उत्पादन कारखाना साईटवर सुरू आहे. सदरचा खत हा संद्रीय खत असून तो प्रेसमड व नेपियरग्रास च्या फर्मेंटेड ऑरगॅनीक मॅन्युअर पासून तयार करण्यात येतो. सदर सेंद्रीय खतामध्ये ऊस पिकासाठी विविध पोषक घटक मिसळून दानेदार खत तयार करण्यात येत आहे.

सदरचे दानेदार सेंद्रीय खत हे 'नॅचरल ऑरगॅनीक फर्टीलायझर' या नावाने तयार केलेले आहे. सदरचे खत नॅचरल शुगरचे ऊस उत्पादकांना अत्यंत सवलतीचे दरामध्ये कारखान्याचे 'नॅचरल बझार' मधून विक्री करण्यात येत असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

तरी आपले ऊस पीकास 'एनओएफ' हे खत देवून ऊस पीकात लक्षणीय वाढ करावी. सदर 'एनओएफ' या खतामध्ये असलेल्या आपल्या जमिनीतील कर्बाचे प्रमाण वाढवावे आणि आपले शेत जमिनीच्या मातीची प्रत गुणवत्तापूर्ण बनवावी, असे ही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. साखर पोते पुजन कार्यक्रमाचे प्रास्तावीक पांडूरंग आवाड यांनी केले आणि प्रवर्तक किशोर डाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

साखर पोते पुजनास कारखान्याचे सन्माननीय संचालक, प्रवर्तक, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी हजर होते.

## पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते तिरंगा रॅलीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा धाराशिव शिवसेना जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या नेतृत्वाखाली तब्बल पावणेतीन किलोमीटर लांब तिरंगा रॅलीचे ७६ व्या प्रजासत्ताक दिना निमित्त आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत ७००० विद्यार्थी व आदर्श परिवाराच्या १७ शाखेने सहभाग नोंदविला होता.

या भव्य तिरंगा रॅलीचे उद्घाटन धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाले. यावेळी तिरंगा रॅलीवर चार जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली.

या रॅलीच्या नेतृत्वाची धुरा सांभाळणारे जिल्हा शिवसेना संघटक तथा आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधिक्षक संजय जाधव तसेच संस्थेच्या सरचिटणीस प्रेमा पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, अभिराम पाटील तसेच जिल्हयातील सर्व शिवसेना पदाधिकारी व सर्व शाखेचे प्राचार्य विभागप्रमुख, कर्मचारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# भीषण अपघात : परंडा आगाराच्या एसटी बसची झाडाला धडक

**एकजण ठार; चालक, वाहक शाळकरी मुलासह १९ प्रवासी गंभीर जखमी... जखमींना उपचारार्थ धाराशिव, बार्शी रुग्णालयात दाखल**



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ जानेवारी -**

परंडा अगाराच्या भरधाव असलेल्या एसटी बसची झाडाला धडक बसून झालेल्या भिषण अपघाता मध्ये एकजण ठार तर १८ प्रवासी गंभीर जखमी झाले हि घटना सोमवार दि.२७ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजून १० मीनटांनी सोनारी परंडा रोडवर घडली आहे.

अपघात झाल्याची माहिती मिळताच अपघात स्थळी सोनारी येथील बाबासाहेब पाटील, दिपक पाटील, सुजित पाटील, औदंबर गाडे, मोतीराम जाधव, अविनाश ईटकर यांनी धाव घेऊन एसटी बसमध्ये अडकलेल्या जखमी प्रवाश्यांना दोन टॅक्टर व जेसीबी मशीनच्या सहाय्याने पत्रा ओढून बाहेर काढले. बघता बघता अपघातस्थळी शेकडो लोक जमा झाले व जखमींना १०८ रूग्ण वाहिका व खासगी वाहनाने परंडा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंडा आगाराची बस रोहकल येथे मुक्कामी असलेले बस सकाळी ७ वाजता परंड्याकडे येत असताना सोनारी जवळ रोड लगदच्या निलगीरीच्या झाडाला धडक बसल्याने हा भिषण अपघात झाला आहे.

या अपघातामध्ये पारेवाडी (ता. करमाळा) येथील तात्या विरभद्र (वय ५९) यांचे उपचारा दरम्यान मृत्यू झाला तर या अपघातामध्ये एकुन १९ प्रवासी जखमी झाले आहे. या अपघातामध्ये गंभीर जखमी झालेले पाचपिंपळा येथील एसटी कॅन्डक्टर योगेश अंबुरे, आरणगाव येथहल एसटी चालक विठ्ठल तौर, धाराशिव येथील पुणम घोडके व ओम घोडके, पिस्तमवाडी येथील नवनाथ गोडगे, कंडारी येथील मैनाबाई तिंबोळे, वसंत तिंबोळे, सोनारी येथील श्रेयश मांडवे, रोहकल येथील ज्ञानेश्वर घोगरे हे प्रवासी गंभीर जखमी झाल्याने परंडा येथे प्राथमीक उपचार करून ९ जखमींना पुढील उपचारासाठी बार्शी व धाराशिव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर किरकोळ जखमी झालेल्या सोनारी येथिल किर्ती खाडे, साईराज खुळे, कंडारी येथील आनंद घोडके, आप्पासाहेब गवळी, प्रतिक्षा पारवे, साक्षी सोनवणे, नम्रता शिंदे, पुजा जाधव, रोहकल येथील निकीत ठोसर, धाराशिव येथील प्रथमेश घोडके यांच्यावर परंडा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

अपघाताची माहिती मिळताच परंडा अगाराचे व्यवस्थापक शिनगारे व कर्मचारी यांनी उपजिल्हा रुग्णालयात रूग्णाची भेट घेऊन पाहणी केली. अपघातस्थळी पोलिसांनी पंचनामा केला व जखमी रूग्णाची पाहणी केली.

### परंडा आगारात जुनाट बस गाड्यांचा खच...

परंडा येथील एसटी बस आगारात अनेक वर्षापासुन मोडकडीस आलेल्या जुनाट बस प्रवाशाच्या सेवेत पाठविल्या जात आहेत. त्या बस कधी कधी रस्त्यातच बंद पडतात कधी ब्रेक फेल होते तर कधी कधी गाडीचे पाट्टे तुटतात इंजन बंद पडते. त्यामुळे प्रवाशाना नाहक त्रास सहन करावा लागतो तर अशा जुनाट बस गाड्यामुळे अपघात होण्याचे प्रमाणात वाढ होत असुन अनेक प्रवाशाना आपला जिव गमवावा लागत आहे.

धाराशिव जिल्ह्याला आता नूतन पालक मंत्री म्हणुन प्रताप सरनाईक हे मिळाले आहेत. आता तरी ते महामंडळाकडून परंडा बस आगारास नवीन वातानुकूलीत एसटी बस गाडया मिळवुन देतील काय?

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## ‘श्री सिद्धीविनायक’ मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

धाराशिव येथील श्री सिद्धीविनायक मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.च्या मुख्य कार्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी ध्वजारोहण व भारतमाता प्रतिमेचे पूजन संस्थेचे संचालक अ‍ॅड. प्रतीक देवळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायन झाले आणि देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद गोरे, नितीन हुंबे, तसेच सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन...



### परंडा : तहसिल कार्यालय

**परंडा, दि.२७ जानेवारी -**

परंडा शहर व तालुकाभरात भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी संपन्न झाला. परंडा तहसीलचे तहसीलदार निलेश मारुती काकडे यांच्या हस्ते सर्व प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेची पुजा करून ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. तहसीलच्या प्रांगणात तहसिलदार निलेश काकडे यांच्या हस्ते तिरंगा ध्वज फडकताच पोलीस पथक व होमगार्ड पथकाकडून ध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रध्वजारोहणाच्या कार्यक्रमास महसुल विभाग, संजय गांधी विभाग, पुरवठा विभागाचे सर्व नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, सर्व तलाठी तसेच राजकीय पुढारी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख दत्ता सांळुके, सुभाषसिंह सद्दीवाल, शंकर इतापे, संजय बनसोडे, रमेशसिंह परदेशी संजय कदम, मेजर सांगळे, तानाजी शिंदे यांच्यासह प्रतिष्ठीत नागरीक पत्रकार उपस्थित होते.



### तेर ग्रामपंचायत कार्यालय

**तेर, दि.२७ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच दिदी काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब खोचरे, नवनाथ नाईकवाडी, ग्रा.प. सदस्य प्रतिक नाईकवाडी, नवनाथ पसारे, बापुराव नाईकवाडी, नामदेव कांबळे, रामा कोळी, लखन रसाळ, धनंजय आंधळे, अभिमन्यू रसाळ, भारत नाईकवाडी, मज्जीद मणियार, सतीश कदम, विजयसिंह फंड, बालाजी भक्ते, रणधीर सलगर, मंगेश पागरकर, बिभीषण लोमटे, इर्शाद मुलाणी, केशव वाघमारे, लोकेश काळे, दत्ता मगर, फातिमा मणियर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### इटकळ ग्रामपंचायत कार्यालय

**इटकळ, दि.२७ जानेवारी -**

इटकळ येथे विविध ठिकाणी भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दूरक्षेत्र, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा मध्ये लोकसहभागातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची स्थापना करण्यात आली. वाचनालयास ५०० पुस्तके देण्यात आली. शाळेच्या मैदानात सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना, सुप्त गुणांना वाव देण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध स्पर्धा घेऊन, विद्यार्थ्यांना, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष, पोलीस पाटील यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक नितीन कांबळे, सरपंच साहेबा क्षिरसागर, उपसरपंच फिरोज मुजावर, पोलीस पाटील विनोद सलगरे व सर्व ग्रा.पं. सदस्य, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक व नागरिक हजर होते.

### तुळजापूर नगर परिषद कार्यालय

**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त नगरपरिषद कार्यालयांमध्ये नगरपरिषदचे कार्यालयीन अधीक्षक वैभव पाठक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सदरील कार्यक्रमास जेष्ठ नागरीक माधव कुतवळ,अशोक मगर, गोकुळ शिंदे, बाळासाहेब शिंदे, सचिन रोचकरी, पंडीतराव जगदाळे, विजय कंदले, किशोर साठे, अमर हंगरगेकर, नागनाथ भांजी, स्वातंत्र सैनिक, पत्रकार, शहरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहना नंतर स्वातंत्र सैनीक, जेष्ठ नागरीक, पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी माधव कुतवळ, अशोक मगर, गोकुळ शिंदे यांनी प्रजासत्ता दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### येरमाळा जि.प. शाळा

**येरमाळा, दि.२७ जानेवारी -**

येरमाळा ता. कळंब येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये आज भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कळंब पं.स.चे माजी सभापती विकास बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल, शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष लहु बारकुल, विलास बारकुल, येरमाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सचीन बारकुल, दत्ता बारकुल उपस्थित होते. मुलींच्या टिपऱ्या आणि लेझीम हे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांच्या कलेला दाद दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख अनिल बारकुल, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक पडवळ यांनी परिश्रम घेतले. तर विद्यार्थ्यांना जाधव, वाघमारे, देशमुख, चेचे, वणवे, बारकुल, डिडवळ, ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यकम ाचे सुत्रसंचलन शेरखाने यांनी केले.

## जिल्ह्याचे मागासलेपणा दूर करण्यासाठी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीस कटिबध्द : पालकमंत्री सरनाईक

### ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मुख्य समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय हा शेती असल्यामुळे शेतीपुरक व्यवसायाला चालना देण्यात येईल. नागरिकांना शुध्द व स्वच्छ पाणी, मुलांना दर्जेदार शिक्षण, आरोग्याच्या चांगल्या सुविधा आणि बेरोजगारांच्या हातांना काम उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कटिबध्द असल्याची ग्वाही पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी दिली.

आज २६ जानेवारी रोजी ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण पोलीस मुख्यालयाच्या मैदान क्र.२ येथे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करतांना बोलत होते. या समारंभाला खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील, कैलास पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे, जल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, पोलीस अधिक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले, राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा ३ टप्प्यामध्ये लाभ देण्यात आला आहे. या योजनेसाठी जिल्ह्यातील ४ लक्ष ३ हजार ६०० महिला पात्र ठरल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय येथे गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांचा सात कलमी कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ४८९५ प्रशिक्षणार्थी विविध शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षण घेत आहे. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग जिल्ह्यातून जाणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगून सरनाईक म्हणाले, या रेल्वे मार्गामुळे श्री क्षेत्र तुळजापूर रेल्वे मार्गाने जोडले जाणार आहे. त्यामुळे देश-विदेशातील भाविकांना तुळजापूर येथे येण्याचा मार्ग सुकर होणार आहे. श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदीर विकासाचा २१०० कोटी ७० लक्ष रूपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला असून मुख्यमंत्री यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाअंतर्गत २१ टिएमसी पाणी जिल्ह्याला सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव तालुक्यातील ३५ गावातील १४ हजार ९३६ हेक्टर आणि तुळजापूर, उमरगा व लोहारा तालुक्यातील ५४ गावातील १० हजार ८६२ हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ होणार आहे. जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये ५० नवीन बसेस लवकरच उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रवाशांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणार असल्याचे सरनाईक म्हणाले. जिल्ह्यात सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने बाधित शेतपिकांच्या नुकसानीसाठी १ लक्ष २५ हजार ४६० शेतकऱ्यांच्या बॅक खात्यावर १५९ कोटी २५ लक्ष रूपये जमा करण्यात आल्याचे सांगुन पालकमंत्री सरनाईक म्हणाले, उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट नुकसानीची रक्कम जमा करण्यात येत आहे. गाव तिथे स्मशानभूमी या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये दहन किंवा दफनभूमसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४४ हजार ७३९ शेतकऱ्यांना १३० कोटी ७७ लक्ष रूपयांचा लाभ देण्यात आल्याचे म्हणाले.



शेतकऱ्यांना समृध्द आणि सशक्त बनविण्यासाठी ग्रीस्टॅक योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगून पालकमंत्री सरनाईक म्हणाले, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सीएससी केंद्रातून मोफत ओळख क्रमांक तयार करून देण्यात येणार आहे. विविध कृषिविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी हा ओळख क्रमांक अत्यंत महत्वाचा आहे. तेव्हा जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी ओळख क्रमांक तयार करून घ्यावा, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

ध्वजारोहणानंतर पालकमंत्री सरनाईक यांनी परेडचे निरीक्षण केले. परेडमध्ये पोलीस अंमलदार पुरूष व महिला, गृहरक्षक दल पुरुष-महिला, राष्ट्रीय छात्र सेना, छत्रपती हायस्कुल, श्रीपतराव भोसले हायस्कुल, अभिनव इंग्लीश स्कूल, धाराशिव, श्री.श्री.रविशंकर हायस्कुल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सांजा, दिव्यांग कल्याण विभागाअंतर्गत जि.प. शाळेचे विद्यार्थी तसेच वज्र वाहन, क्युआरटी व्हॅन, दंगल नियंत्रण पथक, डॉग पथक, बीडीएस, आपत्ती व्यवस्थापन, अग्नीशमन दल आदीसह आरोग्य विभागाचे वाहन सहभागी होते. कार्यक्रमाला विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार हनमंत पडवळ यांनी मानले.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जळकोटच्या सुपुत्राने केले ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्याचे कार्याभिमुख आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी जळकोट येथील माजी ग्राम पंचायत सदस्य, युवा नेते अ‍ॅड. आशिष सोनटक्के यांना तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापतीपद देऊन काम करण्याची संधी दिली. तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात जळकोटच्या या सुपुत्राला पहिल्यांदाच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्याचा मान मिळाला आहे.

तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या ठिकाणी सभापती आशिष सोनटक्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, संचालक संतोष कदम, बालाजी रोचकरी, दत्ता वाघमारे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन सुनील जाधव, जय भवानी सहकारी सोसायटीचे चेअरमन अनिल हंगरगेकर, नागनाथ किलजे, राम जाधव, नानासाहेब कूराडे, धैर्यशील दरेकर, आनंद काळे, मुरली हंतागळे, राम चोपदार, बप्पा साखरे, व्यापारी विजय निंबाळकर, बाळासाहेब केसकर, अप्पा शेळके, बाजार समितीचे सचिव उमेश भोपळे, शिवानंद राठोड, नागेश देशमुख, प्रमोद पडवळ, सुनील लोमटे आदी मान्यवरासह शहरातील व्यापारी, बाजार समितीचे व्यापारी, बाजार समितीचे कर्मचारी, हमाल, नागरिक उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्याकडून शाळेस कपाट व शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ जानेवारी -**

येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथील माजी विद्यार्थी राष्ट्रीय चित्रकार सिद्धार्थ शहाजी शिंगाडे यांनी त्याला मिळालेल्या प्रेरणा पुरस्कार रकमेतील २५ टक्के वाटा न.प.प्रा.शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दिला.

यामध्ये एक लोखंडी कपाट सर्व विद्यार्थ्यांना कंपासचे वाटप सिद्धार्थचे वडील शहाजी शिंगाडे आई विजयमाला शिंगाडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच माजी विद्यार्थी कै. अ‍ॅड. किरण कुलकर्णी यांच्या यांच्या स्मरणार्थ चारुशीला किरण कुलकर्णी यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गरजवंत व होतकरू विद्यार्थिनीला आर्थिक सहाय्य स्वरूपात १ हजार रुपये रोख स्वरूपात देण्यात आले.

## पाडोळी (आ.) येथे प्रजासत्ताक दिनानिमित अ‍ॅड. व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडोळी (आ.) येथे संस्थेचे अध्यक्ष तथा रुपामाता समूहाचे प्रमुख अँड व्यंकटराव गुंड यांच्या प्रमुख उपस्थितीत ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. अँड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते प्रतिमाचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली तद्पुर्वी ग्रामीण भागात उद्योग, कृषि, दुग्धव्यवसाय, बँकिंग, शैक्षणिक, विधी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल मुंबई येथे एबीपी माझा यांच्या तर्फे अनमोल रत्न तर नाशिक येथे रिसील डॉट इन व समाचार वाणी यांच्यातर्फे महाराष्ट्राचा अभिमान, उद्योगांचा सन्मान-महाराष्ट्र उद्योग रत्न पुरस्कार २०२५ मिळाल्याबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडोळी (आ.) येथील दोन्ही मुख्याध्यापक यांनी शाळेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर गुंड माजी जि.प. उपाध्यक्ष, गणेश पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन, बेंबळी, पठाण सर पोलीस सब इन्स्पेक्टर बेंबळी, डॉ. गौरी झोरे वैद्यकीय अधिकारी पाडोळी (आ), डॉ. सुसेन गाजरे मेडिकल कॉलेज लातूर, बाबुराव पुजारी, सतीश एकंडे, भाऊसाहेब गुंड, धनंजय पाटील, बांगर उपस्थितीत होते. या कार्यक्रमासाठी पाडोळी व पाडोळी परिसरातील शिक्षक उपस्थित होते. गणेश पाटील यांनी ग्रामीण भागामध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल, व शाळेतील विविध कार्यक्रम, उपक्रम, याबद्दल गुंड साहेब यांचे कौतुक केले या कार्यक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कला सादर केल्या.

यावेळी रुपामाताचे प्राचार्य सुरेश मनसुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय व रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र सुरवसे, शिक्षक अमोल गुंड, सचिन यादव उपस्थित होते.


## सारथीकडून मिळणाऱ्या योजनांची विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सेंटरकडून माहिती

### एमकेसीएल, एसआयआयटी कॉँम्प्युटर सेंटरचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

२६ जानेवारी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त धाराशिव जिल्ह्यातील आंबेवाडी, मेडसिंगा, चिखली, राजुरी, आरणी, महाळंगी, खानापुर, बोरगांव झाडी, गोवर्धनवाडी, उंबरे कोठा धाराशिव विविध ग्रामपंचायत येथे MKCL व SIIT कॉम्पुटर सेंटरच्या वतीने विद्यार्थ्यांमार्फत सारथीकडून मराठा समाजासाठी मिळणाऱ्या विविध मोफत योजनांची माहिती ग्रामस्थांना मार्गदर्शनपर करून देण्यात आली.





ग्रामसभेत एसआयआयटी कॉम्प्युटर इन्स्टिटयूटच्या माध्यमातून मराठा समाजासाठी मोफत असलेला ६ महिन्यांचा CSMS -DEEP कॉम्प्युटर कोर्स संदर्भात माहिती दिली.

सारथी संस्थेमार्फत एमपीएससी यूपीएससी करत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण व कौशल्य विकास उपक्रम अशा विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच विविध कॉम्प्युटर कोर्स, वाढते सायबर गुन्हे याला बरेच लोक बळी पडतात. याला रोखण्यासाठी काय उपाययोजना करावी यासह विविध माहिती दिली जाते. याप्रसंगी गावातील संबंध नागरिक ग्रामस्थ सरपंच उपस्थित होते.

या उपक्रमासाठी SIIT COMPUTER सेंटरचे टीम आकाश मोरे, ऋतुराज घेवारे, अविनाश वाघमारे, शशिकांत वाघमारे यांच्याकडून आयोजन व MKCL जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर यंच्याकडून मार्गदर्शन मिळाले.

## रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ जानेवारी -**

राज्यभर सरकारकडून रस्ता सुरक्षा अभियान राबिवण्यास येत आहे. याचा एक भाग म्हणून धाराशिव जिल्ह्यातील येडशी टोल नाका येथे दि.२६ जानेवारी रोजी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव, सह्याद्री मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल व सह्याद्री ब्लड बँक धाराशिव यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच सायली नेत्रालय धाराशिव यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

त्यादरम्यान एकुण ५७ नागरिक, आयआरबी कर्मचारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी रक्तदान केले. सदर कार्यक्रमांमध्ये महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील पोलीस अंमलदार, टोल प्लाजा येडशी येथील अधिकारी व कर्मचारी, महामार्गावर वाहतूक करणारे वाहनाचे वाहन चालक तसेच महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव परिसरातील नागरिक व मृत्युंजय दूत यांची आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी करण्यात आली. सदर वेळी लायसन्स व मोटारसायकल असणाऱ्या एकूण ११० गरजू व्यक्तींना मोफत हेल्मेट वितरित करण्यात आले.

## नळदुर्ग शहरात ठिकठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जानेवारी -**

नळदुर्ग येथे दि. २६ जानेवारी रोजी भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शासकीय, निमशासकीय तसेच जि.प. शाळा, खाजगी शाळा व महाविद्यालयात राष्ट्रीय ध्वज फडकावुन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यावर सकाळी १०.१५ वा. पार पडला. याठिकाणी नळदुर्गचे अप्पर तहसिलदार अभिजित जगताप यांच्या हस्ते ध्वजरोहन करण्यात आला.

नळदुर्ग शहरात भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगरपालिका, पोलिस ठाणे, महामार्ग पोलिस केंद्र, बसस्थानक, चावडी चौक, हुतात्मा स्मारक, क्रांती चौक, शास्त्री चौक, भवानी नगर, पोष्ट ऑफिस, जि.प. प्रशाला, जि.प. कन्या प्रशाला, केंद्रीय प्राथमिक शाळा, अंजली प्रशाला,उर्दु शाळा, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कुल, श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अध्यापक विद्यालय याठिकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील सर्व शाळांमध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले, यामध्ये क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध विषयांवर विद्यार्थ्यांची भाषणे, स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना पारीतोषिक वितरणआदी कार्यक्रम घेण्यात आले. ध्वजरोहणाचा मुख्य कार्यक्रम सकाळी १०.१५ वा. नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यावर पार पडला. याठिकाणी नळदुर्गचे अप्पर तहसिलदार अभिजित जगताप यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. यावेळी नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे हेही उपस्थित होते. ध्वजरोहणानंतर याठिकाणी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि संविधानाचे वाचन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी, मुश्ताक कुरेशी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, बसवराज धरणे, विनायक अहंकारी,सय्यद तन्वीरअली खतीब,किशोर नळदुर्गकर, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले सरदारसिंग ठाकुर, मनसेचे जिल्हा सरचिटणीस ज्योतिबा येडगे, रिपाईचे दुर्वास बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, अजय बागडे, देवानंद बनसोडे, परिवर्तन सामाजिक संस्थेचे मारुती बनसोडे, सुहास येडगे, विलास येडगे, दादासाहेब बनसोडे, पुरातत्त्व विभागाचे नळदुर्ग किल्ल्याचे इन्चार्ज नागनाथ गवळी, तलाठी वायचळ यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.**
**आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**


## संविधान हा भारताचा राष्ट्रीय ग्रंथ होय - भिक्खू पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
भारत देशामध्ये विविध जाती संप्रदाय धर्म असून त्या धर्माचे पवित्र ग्रंथ प्रमुख आहेत. परंतु भारताचे संविधान हे सर्व धर्मग्रंथांचे, संस्कृतीचे, वेशभूषा परंपरा यांचे रक्षण व जोपासना करणारा राष्ट्रीय ग्रंथ असल्याचे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो केले आहे.

७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली महाविहार धम्मसेवक ग्रुपच्या वतीने सामूहिक पणे संविधान प्रास्तविकेचे वाचन करण्यात आले.



प्रारंभी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्या नंतर पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली भारतीय संविधानाच्या प्रास्तविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले, या वेळी पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांनी समस्त भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी डी. एस. नरसिंगे, भीमराव चौदंते, कुमार सोनकांबळे,राहुल शाक्यमुनी, उत्तम कांबळे, ज्योतीराम लामतुरे, सुधाकर कांबळे, शिवाजी कवठेकर आदी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## केशवराज विद्यालयातील ५०० विद्यार्थी व शिक्षकांनी केले 'ई कचरा संकलन'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२४ ,२५ ,२६ जानेवारी २०२५ या कालावधीत (ई-कचरा जनजागृती व संकलन अभियान) या उपक्रमांतर्गत कचरा संकलित करण्याचे आवाहन करण्यात आले होतेफ



त्या आवाहनास भरभरून प्रतिसाद देत ५०० विद्यार्थी व शिक्षक यांनी ई-कचरा संकलित केला.
यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांच्या माध्यमातून निरुपयोगी टी.व्ही., रिमोट,सीडी,रेडिओ, हेडफोन्स, चार्जर, मोबाईल, कॅसेट्स, सेट टॉप बॉक्स, सीडी प्लेयर, वायर्स, माऊस,कीबोर्ड अशी विविध इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक उपकरणे संकलित करण्यात आली. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री प्रवीण सरदेशमुख, श्री संजय गुरव , श्री विष्णू सोनवणे, प्रभारी मुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे , पर्यवेक्षक श्री संदीप देशमुख ,श्री बबन गायकवाड, पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, अंजलीताई निर्मळे,उपक्रम प्रमुख श्री संदीप साबणे,श्री शरद पांचाळ व इतर सहकारी शिक्षक बंधु -भगिनी उपस्थित होते.

## लातूर शहरात भाजपा युवा मोर्चाचे नोंदणी अभियान : ॲड. गोमचाळे

**तभा वृत्तसेवा**


**लातूर, दि.२७ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने २६ जानेवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती शहर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे व ग्रामीण जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांनी पत्रपरिषदेत दिली.
यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर शहर जिल्हा प्रभारी कुणाल मराठे, मराठवाडा संयोजक अजित पाटील कव्हेकर यांची उपस्थिती होती. यावेळी ॲड. गोमचाळे म्हणाले, भाजपायुमोच्या वतीने संघटन पर्व उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत १८ ते २५ वयोगटातील युवकांची सदस्य नोंदणी केली जाणार आहे.
जिल्ह्यात एकूण २१ मंडल आहेत. अभियानांतर्गत विविध उपक्रम घेऊन युवकांना सहभागी करुन घेण्यात येणार आहे आणि सदस्य नोंदणी करुन घेतली जाणार आहे. अधिकाधिक युवकांना अभियानाद्वारे जोडले जाणार असल्याचे अमोल निडवदे यांनी सांगितले.

## मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेसचे आंदोलन : पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत शहर जिल्हा व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शनिवारी महात्मा गांधी चौकात आंदोलन ईव्हीएम हटाव लोकशाही बचाव व एकच मिशन मतदाराच्या हक्काचे संरक्षण अशा जोरदार घोषणा देत जनजागृती केली. यावेळी नागरिकांना मतदाराच्या हक्काचे महत्त्व सांगण्यात आले.
आगामी निवडणुकीत निष्पक्ष व पारदर्शक प्रक्रियेची आवश्यकता पटवून देण्यात आली. करण्यात आले. तसेच मतदारांमध्ये करण्यात आली. जनजागृती लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी प्रांताध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, माजी आ. धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार आंदोलन करून मतदार जागृती करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रा. एकनाथ पाटील, ॲड. प्रवीण पाटील, ॲड. बाबासाहेब गायकवाड, सुभाष घोडके, गोरोबा लोखंडे, दगडूअप्पा मिटकरी, कैलास कांबळे, प्रा. प्रवीण कांबळे, जालिंदर बर्डे, ॲड. शरद देशमुख, राम स्वामी, ॲड. फारुख शेख उपस्थित होते.

## शंभर दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत जिल्ह्यातील महत्वाची विकासकामे गतीने पूर्ण करणार : पालकमंत्री



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाला नवी दिशा दिली जात आहे. त्यांनी सर्व प्रशासनिक विभागांसाठी शंभर दिवसांचा सात कलमी कृती आराखडा जाहीर केला आहे. या अंतर्गत १५ एप्रिल २०२५ पर्यंत जिल्ह्यातील महत्त्वाची विकासकामे गतीने पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासोबतच नागरिकांना जलदगतीने सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणे, हा देखील या उपक्रमाचा भाग असल्याचे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी येथे सांगितले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री ना. भोसले यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुल येथे राष्ट्रध्वज वंदनेचा मुख्य शासकीय समारंभ झाला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख आदिंची उपस्थिती होती.

जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानच्या टप्पा दोनमध्ये १२८ गावांमध्ये जलसंधारणाची १४३ कोटी ५९ लाख रुपयांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यापैकी २ हजार १४२ कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून होत असलेल्या कामांमुळे तलावांच्या साठवण क्षमतेत लाखो लिटरची भर पडली आहे.

जिल्ह्यात सुरु असलेली जलसंधारणाची कामे जलदगतीने पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे, असे पालकमंत्री ना. भोसले यावेळी म्हणाले.

शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा जलद आणि सोप्या पद्धतीने लाभ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजना सुरू केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येत असून त्यासाठी जिल्ह्यात मोहीम स्वरुपात शिबिरांचे आयोजन केले जात असल्याचे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले. तसेच जिल्ह्यात जवळपास १ लाख ३८ हजार शेतकऱ्यांना मुख्यमंत्री वीज सवलत योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे ते म्हणाले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि 'लेक लाडकी' योजनेचीही त्यांनी माहिती दिली.

प्रजासत्ताक दिन सोहळ्याला उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीर पत्नी, वीरमाता, वीरपिता यांची पालकमंत्री ना. भोसले यांनी भेट घेवून त्यांचा सत्कार केला, तसेच त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### माऊली विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

आंबेजोगाई रोडवरील माऊली विद्यार्थी विकास केंद्र, माऊली बालक मंदिर, माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल,लातूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.ध्वजारोहण प्रमुख पाहुणे संस्थेचे कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर यांनी उपस्थितांना उपयुक्त मार्गदर्शन केले व प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांचे स्वागत विज्ञान शिक्षक श्री गाडेकर सर यांच्या हस्ते करण्यात आले.

### मांजरा कारखाना येथे ध्वजारोहण संपन्न

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन तथा मांजरा परिवारातील साखर कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. कारखान्याचे व्हा चेअरमन श्रीशैल उटगे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे व्हा. चेअरमन लक्ष्मणराव मोरे,लातूर बाजार समिती सभापती जगदीश बावणे, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संतशिरोमणी साखर कारखाना व्हा चेअरमन शाम



भोसले, सचिन दाताळ, चांदपाशा इनामदार, संभाजी सुळ आदिंची उपस्थिती होती.

### म. बसवेश्वर महाविद्यालय

आपण भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. भारतीय संविधान हे विश्वामध्ये लोकशाहीचा पुरस्कार करते, त्यामुळे भारतातील प्रत्येक नागरिकांनी भारतीय संविधानाला अनुरूप आपले कृतिशील वर्तन करावे असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### केशवराज मा. विद्यालय

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शालेय समिती समिती सदस्य श्री नरेंद्र पाठक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर प्रकट कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भारतमाता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष श्री धनंजय तुंगीकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, विष्णू सोनवणे, शालेय समिती समिती सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक महेश कस्तुरे , प्रमुख वक्ते सुवेद सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख वक्ते श्री सुवेद सूर्यवंशी यांनी भारताच्या संविधानाचा इतिहास सोप्या भाषेत सांगितला १९२९ते १९४९ च्या कालावधीतील संविधानाच्या लेखन कार्याचा थोडक्यात आढावा मांडला. भारतीय सर्व नागरिकांसाठी समान कायदा म्हणजे संविधान होय. जगातील सर्वात मोठे लिखित स्वरूपाचे संविधान भारताचे आहे असे मत व्यक्त केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान विशद केले. चारित्र्य जपणारा व प्रामाणिकपणे काम करणारा खरा देशभक्त होय असे मत व्यक्त केले. कु. कल्याणी बडे व कु. गायत्री जाधव आणि उपस्थित सर्वांनी संविधानाचे सामूहिक वाचन केले. प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यालयात शासकीय परिपत्रका नुसार प्रजासत्ताक दिना निमित्त मुख्य रस्त्यावर प्रभात फेरी काढण्यात आली या रॅलीचे प्रमुख श्री गुरुनाथ झुंझारे व ५वी ते ७ वी च्या सर्व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. तसेच जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत गायन घेण्यात आले.देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा , भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्वरचित कविता गायन, वादविवाद स्पर्धा, नृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध क्रीडास्पर्धेमध्ये कबड्डी, थैला रेस, लंगडी, बुद्धीबळ स्पर्धा घेण्यातआल्या , चित्रकला व मराठी, इंग्रजी ,विज्ञान विषयांच्या हस्तलिखितांचे प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रदर्शन उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक पालक संघाचे सदस्य, माजी शिक्षक,विद्यार्थी,पालक, शिक्षकांनी पाहिले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय, स्वागत श्री शैलेश सुपलकर यांनी केले. आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन श्रीमती स्मिता मेहकरकर यांनी केले.श्रीमती शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

### नोबेल इंग्लिशस्कुलमध्ये खेळाच्या स्पर्धा

२६ जानेवारी निमित्ताने लातूर शहरातील बरकत नगर येथिल नोबेल इंग्लिश प्री प्रायमरी शाळेचा वार्षिक खेळ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.
मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा आणि लहान पनापासूनच मुलांना वेगवेगळ्या खेळाबद्दल माहिती मिळावी या उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापिका उम्मेहानी शेख, सचिव मुद्दसिर शेख, आणि अध्यक्ष फारूख शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडल्या.
या वार्षिक स्नेहसंमेलनात मुख्य अतिथी म्हणून माजी नगरसेवक इम्रान सय्यद, माजी नगरसेवक सचिन बंडापल्ले, प्राध्यापक युसुफ फारुकी, प्राध्यापक अनिल सूर्यवंशी, महाराष्ट्र जीवन न्यूज चैनल चे मुख्य संपादक खय्युम शेख, हारूण मोमीन, डॉक्टर ताहेर शेख, सामाजिक कार्यकर्ते जावेद शेख यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.
सदरील कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या पालकांची मोठ्या प्रमाणात हजेरी लावून विद्यार्थ्यांनचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मदत केली आणि स्पर्धेचा आनंद ही लुटला.

## लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्या

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२७ जानेवारी -**
जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी हितावह असणारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावेत. जिल्ह्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रशासनाने अधिक गतीने आणि समन्वयाने काम करावे, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत दिल्या.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, संदीप कुलकर्णी, अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून अधिकाधिक निधी मिळविण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे सांगून पालकमंत्री ना. भोसले म्हणाले की, जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना लाभदायक ठरणारी विकास कामे करण्यावर सर्व विभागांनी भर द्यावा. यासाठी लोकप्रतिनिधींना विश्वात घेवून काम करावे. जिल्ह्याच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या चांगल्या उपक्रमाला आपला पाठींबा राहील. मात्र, कोणत्याही चुकीच्या गोष्टींना पाठीशी घातले जाणार नाही. तसेच जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पालकमंत्री म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लातूर ते टेंभूर्णी महामार्गाचे रुंदीकरण, जिल्हा रुग्णालयासह जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याला आपले प्राधान्य राहणार आहे. तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाला नवीन एमआरआय मशीन घेण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. यासोबतच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी सीएसआर फंडातून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले. लातूर जिल्ह्याने शिक्षण क्षेत्रातील वेगळा पॅटर्न तयार केला आहे, याप्रमाणेच जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विकासाचा नवा पॅटर्न निर्माण करावा. आपल्या कार्यकाळात जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान देण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत, असे पालकमंत्री यावेळी म्हणाले.

बर्ड फ्लूचा प्रसार रोखण्यासाठी सतर्क राहून काम करा

उदगीर शहरातील कावळ्यांचा मृत्यू बर्ड फ्लूमुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मात्र, त्यानंतर पाठविलेले उदगीर आणि अहमदपूर तालुक्यातील कुक्कुट पक्ष्यांचे वैद्यकीय अहवाल नकारात्मक आल्याने कुक्कुट पक्ष्यांना बर्ड फ्लूची बाधा झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आपल्या जिल्ह्यातील कुक्कुट पक्ष्यांना सध्या बर्ड फ्लूची लागण झालेली नाही. मात्र, बाजूच्या जिल्ह्यांमधून बर्ड फ्लूचा प्रसार होवू नये, यासाठी पशुसंवर्धन विभागाने सतर्क राहून काम करावे. विविध पथके प्रत्यक्ष फिल्डवर पाठवून सातत्याने परिस्थितीचा आढावा घ्यावा. प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. तसेच नागरिकांनी घाबरून जावू नये, अफवांवर विश्वासू ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

## पालकमंत्री ना. भोसले यांची 'देवघर'ला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२७ जानेवारी -**
राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे नवनिर्वाचित पालकमंत्री ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी आज देवघर या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.



यावेळी त्यांचे चाकुरकर परिवाराच्या वतीने तसेच विविध संघटना व नागरीकांतर्फे लातूरच्या पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करत शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी डॉ. अर्चनाताईंनी जिल्हा रुग्णालय व स्व. विलासराव देशमुख मार्ग यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली व यासोबत इतरही काही महत्वाच्या विषयांवर चर्चा केली. पालकमंत्र्यांनी तत्काळ भाषणादरम्यान ताईंनी मागणी केलेल्या सर्व मागण्या येणाऱ्या कॅबिनेट बैठकीत मंजूर करून घेण्याचे आश्वासन दिले.

या वेळी ताईंनी राजेंच्या नेतृत्वात लातूर जिल्ह्याच्या विकासाला नवी चालना मिळेल व लातूर प्रगतीपथावर वाटचाल करेल असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संविधान हा भारताचा राष्ट्रीय ग्रंथ होय - भिक्खू पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
भारत देशामध्ये विविध जाती संप्रदाय धर्म असून त्या धर्माचे पवित्र ग्रंथ प्रमुख आहेत. परंतु भारताचे संविधान हे सर्व धर्मग्रंथांचे, संस्कृतीचे, वेशभूषा परंपरा यांचे रक्षण व जोपासना करणारा राष्ट्रीय ग्रंथ असल्याचे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो केले आहे.

७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या



मार्गदर्शनाखाली महाविहार धम्मसेवक ग्रुपच्या वतीने सामूहिक पणे संविधान प्रास्तविकेचे वाचन करण्यात आले.

प्रारंभी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्या नंतर पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली भारतीय संविधानाच्या प्रास्तविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले, या वेळी पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांनी समस्त भारतीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी डी. एस. नरसिंगे, भीमराव चौदंते, कुमार सोनकांबळे,राहुल शाक्यमुनी, उत्तम कांबळे, ज्योतीराम लामतुरे, सुधाकर कांबळे, शिवाजी कवठेकर आदी उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## केशवराज विद्यालयातील ५०० विद्यार्थी व शिक्षकांनी केले ‘ई कचरा संकलन’

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२४ ,२५ ,२६ जानेवारी २०२५ या कालावधीत (ई-कचरा जनजागृती व संकलन अभियान) या उपक्रमांतर्गत कचरा संकलित करण्याचे आवाहन करण्यात आले होतेफ



त्या आवाहनास भरभरून प्रतिसाद देत ५०० विद्यार्थी व शिक्षक यांनी ई-कचरा संकलित केला.
यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांच्या माध्यमातून निरुपयोगी टी.व्ही., रिमोट,सीडी,रेडिओ, हेडफोन्स, चार्जर, मोबाईल, कॅसेट्स, सेट टॉप बॉक्स, सीडी प्लेयर, वायर्स, माऊस,कीबोर्ड अशी विविध इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक उपकरणे संकलित करण्यात आली. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री प्रवीण सरदेशमुख, श्री संजय गुरव , श्री विष्णू सोनवणे, प्रभारी मुख्याध्यापक श्री महेश कस्तुरे , पर्यवेक्षक श्री संदीप देशमुख ,श्री बबन गायकवाड, पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, अंजलीताई निर्मळे,उपक्रम प्रमुख श्री संदीप साबणे,श्री शरद पांचाळ व इतर सहकारी शिक्षक बंधु -भगिनी उपस्थित होते.

## लातूर शहरात भाजपा युवा मोर्चाचे नोंदणी अभियान : ॲड. गोमचाळे

**तभा वृत्तसेवा**


**लातूर, दि.२७ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने २६ जानेवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती शहर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचाळे व ग्रामीण जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांनी पत्रपरिषदेत दिली.
यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर शहर जिल्हा प्रभारी कुणाल मराठे, मराठवाडा संयोजक अजित पाटील कव्हेकर यांची उपस्थिती होती. यावेळी ॲड. गोमचाळे म्हणाले, भाजपायुमोच्या वतीने संघटन पर्व उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत १८ ते २५ वयोगटातील युवकांची सदस्य नोंदणी केली जाणार आहे.
जिल्ह्यात एकूण २१ मंडल आहेत. अभियानांतर्गत विविध उपक्रम घेऊन युवकांना सहभागी करुन घेण्यात येणार आहे आणि सदस्य नोंदणी करुन घेतली जाणार आहे. अधिकाधिक युवकांना अभियानाद्वारे जोडले जाणार असल्याचे अमोल निडवदे यांनी सांगितले.

## मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेसचे आंदोलन : पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत शहर जिल्हा व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शनिवारी महात्मा गांधी चौकात आंदोलन ईव्हीएम हटाव लोकशाही बचाव व एकच मिशन मतदाराच्या हक्काचे संरक्षण अशा जोरदार घोषणा देत जनजागृती केली. यावेळी नागरिकांना मतदाराच्या हक्काचे महत्त्व सांगण्यात आले.
आगामी निवडणुकीत निष्पक्ष व पारदर्शक प्रक्रियेची आवश्यकता पटवून देण्यात आली. करण्यात आले. तसेच मतदारांमध्ये करण्यात आली. जनजागृती लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी प्रांताध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, माजी आ. धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार आंदोलन करून मतदार जागृती करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रा. एकनाथ पाटील, ॲड. प्रवीण पाटील, ॲड. बाबासाहेब गायकवाड, सुभाष घोडके, गोरोबा लोखंडे, दगडूअप्पा मिटकरी, कैलास कांबळे, प्रा. प्रवीण कांबळे, जालिंदर बर्डे, ॲड. शरद देशमुख, राम स्वामी, ॲड. फारुख शेख उपस्थित होते.

## शंभर दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत जिल्ह्यातील महत्वाची विकासकामे गतीने पूर्ण करणार : पालकमंत्री



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाला नवी दिशा दिली जात आहे. त्यांनी सर्व प्रशासनिक विभागांसाठी शंभर दिवसांचा सात कलमी कृती आराखडा जाहीर केला आहे. या अंतर्गत १५ एप्रिल २०२५ पर्यंत जिल्ह्यातील महत्त्वाची विकासकामे गतीने पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासोबतच नागरिकांना जलदगतीने सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणे, हा देखील या उपक्रमाचा भाग असल्याचे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी येथे सांगितले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त पालकमंत्री ना. भोसले यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुल येथे राष्ट्रध्वज वंदनेचा मुख्य शासकीय समारंभ झाला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख आदिंची उपस्थिती होती.

जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानच्या टप्पा दोनमध्ये १२८ गावांमध्ये जलसंधारणाची १४३ कोटी ५९ लाख रुपयांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यापैकी २ हजार १४२ कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून होत असलेल्या कामांमुळे तलावांच्या साठवण क्षमतेत लाखो लिटरची भर पडली आहे.

जिल्ह्यात सुरु असलेली जलसंधारणाची कामे जलदगतीने पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे, असे पालकमंत्री ना. भोसले यावेळी म्हणाले.

शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा जलद आणि सोप्या पद्धतीने लाभ देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी केंद्र शासनाने ॲग्रिस्टॅक योजना सुरू केली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येत असून त्यासाठी जिल्ह्यात मोहीम स्वरुपात शिबिरांचे आयोजन केले जात असल्याचे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले. तसेच जिल्ह्यात जवळपास १ लाख ३८ हजार शेतकऱ्यांना मुख्यमंत्री वीज सवलत योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे ते म्हणाले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि 'लेक लाडकी' योजनेचीही त्यांनी माहिती दिली.

प्रजासत्ताक दिन सोहळ्याला उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीर पत्नी, वीरमाता, वीरपिता यांची पालकमंत्री ना. भोसले यांनी भेट घेवून त्यांचा सत्कार केला, तसेच त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### माऊली विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

आंबेजोगाई रोडवरील माऊली विद्यार्थी विकास केंद्र, माऊली बालक मंदिर, माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल,लातूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.ध्वजारोहण प्रमुख पाहुणे संस्थेचे कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर यांनी उपस्थितांना उपयुक्त मार्गदर्शन केले व प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पाहुण्यांचे स्वागत विज्ञान शिक्षक श्री गाडेकर सर यांच्या हस्ते करण्यात आले.

### मांजरा कारखाना येथे ध्वजारोहण संपन्न

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन तथा मांजरा परिवारातील साखर कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. कारखान्याचे व्हा चेअरमन श्रीशैल उटगे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे व्हा. चेअरमन लक्ष्मणराव मोरे,लातूर बाजार समिती सभापती जगदीश बावणे, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संतशिरोमणी साखर कारखाना व्हा चेअरमन शाम



भोसले, सचिन दाताळ, चांदपाशा इनामदार, संभाजी सुळ आदिंची उपस्थिती होती.

### म. बसवेश्वर महाविद्यालय

आपण भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. भारतीय संविधान हे विश्वामध्ये लोकशाहीचा पुरस्कार करते, त्यामुळे भारतातील प्रत्येक नागरिकांनी भारतीय संविधानाला अनुरूप आपले कृतिशील वर्तन करावे असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### केशवराज मा. विद्यालय

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शालेय समिती समिती सदस्य श्री नरेंद्र पाठक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर प्रकट कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

मंचावरील मान्यवरांच्या हस्ते भारतमाता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष श्री धनंजय तुंगीकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, विष्णू सोनवणे, शालेय समिती समिती सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक महेश कस्तुरे , प्रमुख वक्ते सुवेद सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख वक्ते श्री सुवेद सूर्यवंशी यांनी भारताच्या संविधानाचा इतिहास सोप्या भाषेत सांगितला १९२९ते १९४९ च्या कालावधीतील संविधानाच्या लेखन कार्याचा थोडक्यात आढावा मांडला. भारतीय सर्व नागरिकांसाठी समान कायदा म्हणजे संविधान होय. जगातील सर्वात मोठे लिखित स्वरूपाचे संविधान भारताचे आहे असे मत व्यक्त केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान विशद केले. चारित्र्य जपणारा व प्रामाणिकपणे काम करणारा खरा देशभक्त होय असे मत व्यक्त केले. कु. कल्याणी बडे व कु. गायत्री जाधव आणि उपस्थित सर्वांनी संविधानाचे सामूहिक वाचन केले. प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यालयात शासकीय परिपत्रका नुसार प्रजासत्ताक दिना निमित्त मुख्य रस्त्यावर प्रभात फेरी काढण्यात आली या रॅलीचे प्रमुख श्री गुरुनाथ झुंझारे व ५वी ते ७ वी च्या सर्व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. तसेच जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा हे राज्यगीत गायन घेण्यात आले.देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा , भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्वरचित कविता गायन, वादविवाद स्पर्धा, नृत्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध क्रीडास्पर्धेमध्ये कबड्डी, थैला रेस, लंगडी, बुद्धीबळ स्पर्धा घेण्यातआल्या , चित्रकला व मराठी, इंग्रजी ,विज्ञान विषयांच्या हस्तलिखितांचे प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रदर्शन उपस्थित सर्व मान्यवर, शिक्षक पालक संघाचे सदस्य, माजी शिक्षक,विद्यार्थी,पालक,
शिक्षकांनी पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय, स्वागत श्री शैलेश सुपलकर यांनी केले. आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन श्रीमती स्मिता मेहकरकर यांनी केले.श्रीमती शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.


### नोबेल इंग्लिशस्कुलमध्ये खेळाच्या स्पर्धा

२६ जानेवारी निमित्ताने लातूर शहरातील बरकत नगर येथिल नोबेल इंग्लिश प्री प्रायमरी शाळेचा वार्षिक खेळ स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.
मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा आणि लहान पनापासूनच मुलांना वेगवेगळ्या खेळाबद्दल माहिती मिळावी या उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापिका उम्मेहानी शेख, सचिव मुद्दसिर शेख, आणि अध्यक्ष फारूख शेख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडल्या.
या वार्षिक स्नेहसंमेलनात मुख्य अतिथी म्हणून माजी नगरसेवक इम्रान सय्यद, माजी नगरसेवक सचिन बंडापल्ले, प्राध्यापक युसुफ फारुकी, प्राध्यापक अनिल सूर्यवंशी, महाराष्ट्र जीवन न्यूज चैनल चे मुख्य संपादक खय्युम शेख, हारूण मोमीन, डॉक्टर ताहेर शेख, सामाजिक कार्यकर्ते जावेद शेख यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.
सदरील कार्यक्रमाला विद्यार्थ्यांच्या पालकांची मोठ्या प्रमाणात हजेरी लावून विद्यार्थ्यांनचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मदत केली आणि स्पर्धेचा आनंद ही लुटला.

## लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी हितावह असणारे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावेत. जिल्ह्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रशासनाने अधिक गतीने आणि समन्वयाने काम करावे, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत दिल्या.



जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, संदीप कुलकर्णी, अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून अधिकाधिक निधी मिळविण्याचा आपला प्रयत्न राहणार असल्याचे सांगून पालकमंत्री ना. भोसले म्हणाले की, जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना लाभदायक ठरणारी विकास कामे करण्यावर सर्व विभागांनी भर द्यावा. यासाठी लोकप्रतिनिधींना विश्वात घेवून काम करावे. जिल्ह्याच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या चांगल्या उपक्रमाला आपला पाठींबा राहील. मात्र, कोणत्याही चुकीच्या गोष्टींना पाठीशी घातले जाणार नाही. तसेच जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पालकमंत्री म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लातूर ते टेंभूर्णी महामार्गाचे रुंदीकरण, जिल्हा रुग्णालयासह जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याला आपले प्राधान्य राहणार आहे. तसेच विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाला नवीन एमआरआय मशीन घेण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. यासोबतच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी सीएसआर फंडातून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले. लातूर जिल्ह्याने शिक्षण क्षेत्रातील वेगळा पॅटर्न तयार केला आहे, याप्रमाणेच जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विकासाचा नवा पॅटर्न निर्माण करावा. आपल्या कार्यकाळात जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान देण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत, असे पालकमंत्री यावेळी म्हणाले.

### बर्ड फ्ल्यूचा प्रसार रोखण्यासाठी सतर्क राहून काम करा

उदगीर शहरातील कावळ्यांचा मृत्यू बर्ड फ्ल्यूमुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मात्र, त्यानंतर पाठविलेले उदगीर आणि अहमदपूर तालुक्यातील कुक्कुट पक्ष्यांचे वैद्यकीय अहवाल नकारात्मक आल्याने कुक्कुट पक्ष्यांना बर्ड फ्ल्यूची बाधा झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आपल्या जिल्ह्यातील कुक्कुट पक्ष्यांना सध्या बर्ड फ्ल्यूची लागण झालेली नाही. मात्र, बाजूच्या जिल्ह्यांमधून बर्ड फ्ल्यूचा प्रसार होवू नये, यासाठी पशुसंवर्धन विभागाने सतर्क राहून काम करावे. विविध पथके प्रत्यक्ष फिल्डवर पाठवून सातत्याने परिस्थितीचा आढावा घ्यावा. प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. तसेच नागरिकांनी घाबरून जावू नये, अफवांवर विश्वासू ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

## पालकमंत्री ना. भोसले यांची ‘देवघर’ला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ जानेवारी -**
राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे नवनिर्वाचित पालकमंत्री ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी आज देवघर या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांचे चाकुरकर परिवाराच्या वतीने तसेच विविध संघटना व नागरीकांतर्फे लातूरच्या पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करत शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी डॉ. अर्चनाताईंनी जिल्हा रुग्णालय व स्व. विलासराव देशमुख मार्ग यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली व यासोबत इतरही काही महत्वाच्या विषयांवर चर्चा केली. पालकमंत्र्यांनी तत्काळ भाषणादरम्यान ताईंनी मागणी



केलेल्या सर्व मागण्या येणाऱ्या कॅबिनेट बैठकीत मंजूर करून घेण्याचे आश्वासन दिले.

या वेळी ताईंनी राजेंच्या नेतृत्वात लातूर जिल्ह्याच्या विकासाला नवी चालना मिळेल व लातूर प्रगतीपथावर वाटचाल करेल असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.